म. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. क्र.

नं 202 — ४०२ सन १९८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु. नाव — भाग्योदय
ले. परांजपे शि. महादेव
विष. नाटक — २०२

२०२
सं. क्र.

नाटक

म. ग्र. स. ठाणे



( मानाजीरावाचें शिर घेऊन मुकुंदराव प्रवेश करतो )

अंक २ प्रवेश ७ ( पृष्ठ ७ ).

म. ग्रं. सं. ठाणे.

# प्रस्तावना. १८५३

मानाजीराव या नाटकाच्या पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति आहे. शेक्स-पियरच्या मॅकबेथ नामक नाटकाच्या आधारानें हें नाटक लिहिलेलें असून घी पहिली आवृत्ति १८९८ सालीं छापण्यांत आलेली होती. त्यानंतर हल्लीं ,२८ सालीं ३० वर्षांनीं त्या नाटकाची ही दुसरी आवृत्ति काढण्याचा योग येत आहे. या नाटकाचे प्रयोग पूर्वीच्या सुप्रसिद्ध शाहूनगरवासी नाटक मंडळीकडून करण्यांत येत असत; व त्यांचे ते प्रयोग फार प्रेक्षणीय होत असून त्यांतील नायक व नायिका—मानाजीराव आणि दर्याबाई—यांचे अभिनय तर फारच श्रेष्ठ वठत असत. त्या नाटकमंडळींतील प्रमुख नट, कै. गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग, हे अनुक्रमें मानाजीराव आणि दर्याबाई यांचीं कामें करीत असत; व हे दोघेहि नट आपापलीं अभिनयाचीं कामें अतिशय परिणामकारक रीतीनें करीत असल्यामुळें त्यांच्या हयातींत या नाटकाच्या प्रयोगाला फारच रंग येत असे. रा. गणपतराव जोशी यांचा गंभीर आवाज आणि भयप्रद अभिनय यांच्या योगानें मानाजीराव नाटकाच्या पहिल्या एक व दोन या अंकांतलि खुनासंबंधींच्या प्रवेशांमध्यें भयानक रसाचा इतका कांहीं उत्कर्ष होत असे कीं, त्याच्या योगानें प्रेक्षकांचीं मनें अगदीं भयभीत आणि आश्चर्यचकित होऊन जात असत. आणि पुढें पांचव्या अंकांतलि पहिल्या प्रवेशामध्यें जेव्हां रा. बाळाभाऊ जोग हे दर्याबाई ( लेडी मॅकबेथ )ची भूमिका घेऊन रंगभूमीवर प्रवेश करीत असत, आणि, केस मोकळे सोडलेले, हातांत दिवा घेतलेला, अशा भयंकर स्थितीमध्यें जेव्हां दर्याबाईच्या झोंपेंतील चालण्याचा आणि बडबडण्याचा अभिनय करून दाखविण्याला ते उद्युक्त होत असत, तेव्हां रंगभूमीवर करुण आणि भयानक या रसांची अगदीं कमालच होऊन जात असे. आणि अशा प्रकारच्या अनेक कारणांनीं या नाटकाला त्यां वेळीं अतिशय लोकप्रियता प्राप्त झालेली होती. परंतु पुढें महाराष्ट्रीय रंगभूमीच्या दुर्दैवामुळें बाळाभाऊ जोग हे आपल्या अल्प वयांतच दिवंगत झाले. आणि ते गेल्यामुळें दर्याबाईसारख्या कठिण भूमिकेचें काम दुसऱ्या कोणत्याहि नटांना त्यांच्या-

इतक्या चांगल्या रीतीनें करणें अशक्य वाटल्यामुळें त्यांच्याबरोबरच मा
राव नाटकाचे प्रयोग त्या वेळीं बंद पडले. रा. बाळाभाऊ जोग यांच्या
मागें मानाजीरावाचें काम करणारे रा. गणपतराव जोशी हे कांहीं दिवस
होते. परंतु मानाजीरावाच्या नाटकांत दर्याबाईवांचून एकटा मानाजी
करणार? अशा या कारणांमुळें मानाजीराव नाटकाचे प्रयोग त्या
मागें पडले¶.

## शेक्सपियरचीं नाटकें कां मागें पडत चाललीं ?

त्या वेळीं शेक्सपियरच्या नाटकांसंबंधाची अभिरुचि लोकांमध्यें पुष्कळ ह
शेक्सपियरच्या बऱ्याच नाटकांचे प्रयोग त्या वेळीं रंगभूमीवर होत असत. रोमि
अँड ज्युलियट ( मोहनतारा ), हॅम्लेट, अथेल्लो ( झुंझारराव ), किंग लि
( अतिपीडचरित ), अँटनी अँड क्लिओपॅट्रा, सिंबेलाईन तारा, कॉमेडि अ
एरर्स ( भ्रांतिकृत चमत्कार ), टू जन्टलमेन ऑफ व्हेरोना ( कांतिपुरचे
गृहस्थ ), मर्चंट ऑफ व्हेनिस, रिचर्ड धि थर्ड ( जयाजीराव ), या व आणख
कित्येक शेक्सपियरच्या नाटकांचीं गद्यात्मक भाषांतरें मराठीमध्यें झालेलीं होतीं
व हीं नाटकें लिहून प्रसिद्ध करण्यामध्यें शंकर मोरो रानडे, विष्णु मोरेश्वर
जनी, वासुदेवराव केळकर, नारायण बापुजी कानिटकर, गोपाळ गणेश आ
गोविंदराव देवल, यांच्यासारख्या त्या वेळच्या विद्वान आणि संभावित
पुढाकार घेतलेला होता. यांपैकीं कांहीं नाटकांचे प्रयोग सांगलीकर, इचलकं
वगैरे नाटक कंपन्यांनीं प्रथमतः लोकप्रिय केले. परंतु शेक्सपियरच्या नाटकां
कौशल्याचा खरा रसास्वाद महाराष्ट्रीय प्रेक्षकांना 'आर्योद्धारक मंडळी' या नां
जी एक अॅमॅटूर नाटक मंडळी मध्यंतरीं प्रस्थापित झाली होती, तिच्या
घडवून देण्यांत आला. या कंपनीमध्यें शंकरराव पाटकर आणि ग

---

¶ त्यानंतर मध्यंतरीं इ. स. १९०३ व १९२५ या सालीं पुणें
'सोशल क्लब'च्या मंडळींनीं मानाजीराव नाटकाचे प्रयोग केले होते व
चांगले वठले होते.

§ याशिवाय, अॅज यू लाइक इट, मेझर फॉर मेझर, मच अॅडो अॅबाउट नथिं
वगैरे कांहीं नाटकांचीं संगीत रूपांतरें रा. नेवाळकर यांनीं केलीं असून त्य
प्रयोग नाट्यकलाप्रवर्तक मंडळीकडून करण्यांत येत असत.

मॅ त्या वेळचे प्रमुख आणि प्रसिद्ध नट होते. हे दोघेहि अभिनयाच्या कामांत ...नेष्णात होते. अथेल्लोच्या नाटकामध्यें अथेल्लो आणि आयागो या दोन भूमिका असून त्या अभिनयाच्या दृष्टीनें अत्यंत कठिण आहेत. कारण, त्यांत गीं बदलावयाच्या अशा परस्परविरुद्ध अनेक मनोविकारांचें एकसारखें ...य चाललेलें असतें, असें म्हणावयाला हरकत नाहीं. परंतु गोविंदराव देवल हे । आणि शंकरराव पाटकर हे आयागो, असे दोघे मिळून आपल्या अभिनयनैपु-नें त्या अथेल्लो नाटकामध्यें इतका रसपरिपाक निर्माण करीत असत कीं, त्या नाट-तील काल्पनिक गोष्टी खरोखरच आपल्यापुढें साक्षात् घडत आहेत, असा प्रत्येक काला भास होऊन त्याच्या मनोभावना उचंबळून येत असत. या आयोद्धा-मंडळीच्या पाठीमागें शेक्सपियरच्या नाटकांचे प्रयोग उत्कृष्ट रीतीनें करून रविण्याचें कार्य वर सांगितलेल्या शाहूनगरवासी मंडळीनें कित्येक वर्षेंपर्यंत या भूषणास्पद रीतीनें चालविलें होतें. परंतु पुढें पुढें लोकांच्या अभिरुचीमध्यें ा थोडा फरक पडूं लागला. मराठीमध्यें संगीत नाटकांचा याच वेळीं उदय ून तीं ज्यास्त लोकप्रिय होऊं लागलीं. गद्य नाटकांपेक्षां पद्यात्मक नाटकें ांचीं मनें आपल्याकडे आकर्षित करून घेण्याला केव्हांहि झालें तरी जास्त असणार, हें साहजिकच आहे. तसेंच या संगीत नाटकांच्या बरोबरीनेंच ध्यें स्वतंत्र रचनेचीं अशीं गद्य नाटकेंहि नवीन नवीन निर्माण होऊं ांत मराठ्यांच्या इतिहासांतील उत्कृष्ट देशभक्तांच्या आणि उज्ज्वल ...च्या कथानकांवर रचलेलीं अशीं कित्येक चांगलीं नाटकें रंगभूमीवर आलीं. ल सगळींच नाटकें शेक्सपियरच्या शोकपर्यवसायी नाटकांच्या योग्यतेचीं असें जरी नाहीं, तरी तीं स्वकीय आणि स्वतंत्र असल्यामुळें वाचकांचा आणि ा ओढा स्वाभाविकपणेंच त्यांच्याकडे जास्त वाढूं लागला. आणि या ...ठीं तेव्हांपासून शेक्सपियरची नाटकें मागें पडत चाललीं. आणि हा फक्त आपल्या इकडेच झालेला आहे, असें नसून शेक्सपियरच्या नाटकांसंबंधानें . रंगभूमीवरदेखील हल्लीं अशीच स्थिति आढळून येते. शिवाय शाहूनगर-नाटक मंडळींतील गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग या उत्कृष्ट या निधनामुळें शेक्सपियरच्या नाटकांचे प्रयोग तेव्हांपासून मागें पडले, हेंही ारण पूर्वीं सांगितलेलेंच आहे. त्या सुप्रसिद्ध नटांच्या पाठीमागून हल्लीं पुष्कळ चांगले चांगले नट निरनिराळ्या नाटक कंपन्यांतून निर्माण झालेले ..न पुणें येथील सोशल क्लबसारख्या कित्येक नाटक मंडळ्या अजूनहि

शेक्सपियरच्या नाटकांचे प्रयोग पूर्वीच्या इतक्या उठावदार रीतीनें करून मा वितात, हें येथें नमूद करणें जरूर आहे. तरी पण एकंदरींत कांहीं अंशीं चां नटांच्या अभावामुळें आणि बहुंशीं लोकांच्या अभिरुचीमध्यें फरक पडर हल्लीं मराठी रंगभूमीवर शेक्सपियरचीं नाटकें बरींच मागें पडलीं आहेत, हें खोटें नाहीं.

अशा परिस्थितीमुळें मानाजीराव नाटकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रती जरी पुष्कळ वर्षांपूर्वीच संपून गेलेल्या होत्या, तरी त्या नाटकाची दुसरी आवृत्ति छापण्याचें कांहीं विशेष प्रयोजन इतके दिवसांत उत्पन्न झालें नव्हतें. परंतु हल्लीं पुढल्या दोन तीन सालांकरितां मुंबई युनिव्हर्सिटींतील बी. ए. च्या परीक्षेंतील मराठी विषयाच्या पुस्तकांमध्यें मानाजीराव हें नाटक नेमलें गेलेलें असल्यामुळें त्याची हल्लीं ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

## मॅकबेथची गोष्ट ऐतिहासिक असून ती हॉलिन-शेडच्या बखरींतून घेतलेली आहे.

मानाजीराव हें शेक्सपियरच्या Macbeth या मूळ इंग्रजी नाटकाचें मराठींतील भाषांतर आहे, हें उघडच आहे. या मानाजीराव नाटकाचें इंग्रजींतील मूळ नाटक जें मॅकबेथ, तें शेक्सपियरनें एका जुन्या ऐतिहासिक कथानकावर रचलेलें नाटक आहे, हें मराठी वाचकांनीं मानाजीराव नाटक वाचतांना लक्षांत ठेवणें जरूर आहे. मराठींत भाषांतर करतांना आपल्या चालीरीतींना आणि कल्पनांना अनुसरून जे जरूर फेरफार करावयाला पाहिजे होते, ते सर्व या भाषांतरामध्यें करण्यांत आलेले आहेत. तरी सुद्धां या नाट सकृद्दर्शनीं मराठी वाचकांना अनवश्यक वाटणाऱ्या अशा कांहीं नाटकाच्या कथानकाशीं संलग्न होऊन राहिल्या आहेत. तेव्हां त्या या नाटकामध्यें कां व कशा आल्या आहेत, हें स्पष्ट रीतीनें समजण्याला मॅकबेथ नाटकाच्या संबंधांतील कांहीं गोष्टींची माहिती मराठी वाचकांना जरूर आहे. मराठींत आपण मानाजीराव हें एक कल्पित नाटक या दृष्टीनें वाचूं लागतों. परंतु मूळामध्यें ती एकादी कल्पित कादंबरी नसून तें प्रत्यक्ष घडून आलेलें एक ऐतिहासिक कथानक आहे. तेव्हां त्या ऐतिहासिक कथानकाशीं संलग्न असलेल्या अशा कांहीं गोष्टींचा शेक्सपियरनें स्वाभाविकपणेंच आपल्

मॅकबेथ नाटकामध्यें उल्लेख केलेला आहे. आणि म्हणून त्या गोष्टींचे पूर्वापर कसे लागत आलेले आहेत, हें मराठी वाचकांनीं समजून घेणें जरूरीचें आ

शेक्सपियरनें ज्या वेळीं मॅकबेथ हें नाटक लिहिलें, त्या वेळीं इंग्लंडमध्यें जेम्स दि फर्स्ट हा राजा राज्य करीत होता. यानें इ. स. १६०३ पासून १६२५ र्यंत राज्य केलें. त्याच्या कारकीर्दींतील इ. स. १६१० च्या सुमाराला शेक्स- पियरनें हें नाटक लिहिलें असावें, असा इंग्लिश टीकाकारांचा अजमास आहे. आपल्या डचे संस्कृत कवि आणि नाटककार जसे बहुधा कोणत्या तरी राजाच्या आश्रया- ालीं त्याची मर्जी सुप्रसन्न करून घेऊन आपल्या काव्यनाटकादिकांचा प्रसार कर- ण्याचा प्रयत्न करीत असत, तशीच स्थिति कांहीं अंशीं त्या वेळीं इंग्लंडमध्येंही ोती. शेक्सपियरला त्याच्या देशाच्या राजाकडून प्रत्यक्ष फारसा मोठा आश्रय ्वा कांहीं विशेष उत्तेजन मिळालेलें होतें असें जरी नाहीं, तरी आपल्या च्या राजाची आणि त्याच्या घराण्यांतील इतर राजपुरुषांची स्तुति करून ंची मर्जी सुप्रसन्न ठेवण्याविषयीं शेक्सपियरनें काळजी घेतलेली असल्याचीं ाहरणें त्याच्या नाटकांतून—पर्यायापर्यायानें पण मुद्दाम आणलेल्या— ती तरी उल्लेखांतून आढळून येतात. इंग्लंडचा राजा, पहिला जेम्स, हा इ. स. ०३ मध्यें इंग्लंडच्या गादीवर बसला. त्याच्यापूर्वीं इंग्लंड आणि स्कॉटलंड दोन देशांमध्यें पुष्कळ लढाया चाललेल्या होत्या. व त्या बाबतींतील मेरी, न ऑफ दि स्कॉटस, या राणीचा इतिहास सुप्रसिद्धच आहे. परंतु तिच्या णानंतर आणि इंग्लंडची राणी इलिझाबेथ हिच्या कारकीर्दीनंतर इंग्लंड आणि ॉटलंड या दोन देशांमधील तंटे मिटविण्यांत येऊन त्या दोन देशांच्या त्रित केलेल्या सिंहासनावर पहिला जेम्स याला राज्याभिषेक करण्यांत आला. पहिला जेम्स यानंतर जरी इंग्लंडचा राजा झाला, तरी मूळचा तो स्कॉट- चाच राजा होता. आणि जो स्कॉटलंडचा पूर्वीचा अनेक पिढ्यांचा वीररसा- इतिहास, तो सगळा स्वाभाविकपणेंच नेहमीं त्याच्या मनांत जागृत होता. स्कॉटलंडच्या जुन्या इतिहासांतीलच मॅकबेथची ही एक गोष्ट आहे. आपल्या जशा जुन्या काळच्या इतिहासाच्या बखरी लिहिलेल्या असतात, त्याप्रमाणें लंडच्या जुन्या इतिहासाच्या जुन्या बखरी तिकडेहि पुष्कळ उपलब्ध आहेत. ीं हॉलिनशेडच्या बखरींतून शेक्सपियरनें ही मॅकबेथची गोष्ट आपल्या काकरितां निवडून घेतलेली आहे. शेक्सपियरनें आपल्या बुद्धिकौशल्यानें

आणि आपल्या नाट्यकलेंतील नैपुण्यानें मूळच्या ऐतिहासिक गोष्टीमध्यें आपल रसनिष्पत्तीसाठीं जरी कित्येक फेरफार केलेले असले, तरी मॅकबेथच्या नाटकांत बरेच ठळक ठळक भाग हॉलिनशेडच्या बखरीमधूनच घेतलेले आढळून येत।

या हॉलिनशेडच्या बखरीवरून असें दिसून येतें कीं, डंकन (दमाजी) नांवाचा एक राजा इ. स. १०४०च्या सुमाराला स्कॉटलंड देशामध्यें राज करीत होता. त्याच्या राज्यांतील कांहीं भागावर शत्रूंनीं स्वारी केली असत त्याचा एक नातेवाईक सरदार मॅकबेथ ( मानाजीराव ) आणि दुसरा एक सर दार बँको ( व्यंकोजीराव ) या दोघांनीं मिळून त्या शत्रूंचा पराजय केला त्यानंतर त्या लढाईवरून ते दोघे माघारे येत असतां वाटेंत त्यांना तीन चेटक्य भेटतात आणि त्या या दोघां सरदारांच्या संबंधानें कांहीं भविष्य कथन करतात पुढें कांहीं वेळानें डंकन ( दमाजी ) या राजाचा खून होतो व त्याचे दो मुलगे दोहोंकडे भीतीनें पळून जातात; थोरला मुलगा मालकम ( मल्हारराव हा इंग्लंड ( मगधदेश ) मध्यें जातो व दुसरा मुलगा डोनाल्बेन ( धनाजी हा आयर्लंड ( रत्नपूर ) मध्यें आश्रय घेऊन रहातो. त्यानंतर मॅकबेथ (मानाजीरा याच्या मनामध्यें बँको ( व्यंकोजीराव ) याच्याबद्दल विकल्प उत्पन्न होऊन बँको ( व्यंकोजीराव ) आणि त्याचा मुलगा, फ्लीअन्स ( गुलाब), याहि दोघ खून करण्याचा प्रयत्न करतो. परंतु तो प्रयत्न बँको ( व्यंकोजीराव बाबतींत तेवढा सफळ होतो. पुढें मॅकबेथ ( मानाजीराव ) हा आपला मॅकडफ ( मुकुंदराव ) याला पकडण्याचा प्रयत्न करतो. परंतु तो त्याच्या न लागल्यामुळें मॅकडफ ( मुकुंदराव )च्या कुटुंबांतील माणसांची त्याच्या कत्तल करण्यांत येते. त्यानंतर पुढें काय होईल याविषयीं प्रश्न ण्याकरितां मॅकबेथ ( मानाजीराव ) त्या चेटक्यांची फिरून गांठ घेतो. मॅकडफ ( मुकुंदराव ) आपल्या किल्ल्यांतून जो निसटून निघाला होता इंग्लंड ( मगधदेश )च्या राजाच्या आश्रयाला जाऊन राहिलेल्या म ( मल्हारराव )ला भेटतो. व मॅकबेथ (मानाजीराव )च्या जुलमांतून देशाची सुटका करण्याविषयीं तो त्याचें मन वळवितो. त्याप्रमाणें ( मल्हारराव) आपल्या देशांत येऊन आपल्या बापाचा खून करणारा ( मानाजीराव ) त्याच्यावर पूर्ण सूड उगवून त्याच्या जुलमापासू आपल्या देशाला स्वतंत्र करतो.

## या जुन्या गोष्टींत शेक्सपियरनें घातलेली नवी भर.

अशा प्रकारची गोष्ट मूळच्या हॉलिनशेडच्या बखरीमध्यें आहे. पण या गोष्टीमध्यें जें सौंदर्य नाहीं, तें शेक्सपियरनें आपल्या मॅकवेथ नाटकामध्यें आपल्या प्रतिभेनें निर्माण केलें आहे. माती आणि दगड हे पृथ्वीवर वाटतील तितके पडलेले असतात, पण ते घेऊन त्यांच्यापासून जो कारागीर एखादी सुंदर इमारत निर्माण करतो, त्याच्या कर्तबगारीचें सर्व लोक जसें आश्चर्य करतात, तशीच शेक्सपियरची गोष्ट आहे. मॅकबेथ ( मानाजीराव )च्या मनांत चेटक्यांच्या प्रोत्साहनानें जेव्हां राजाच्या खुनाची कल्पना प्रथम उत्पन्न झाली, तेव्हांपासून त्याच्या मनावर उठणारे अनेक विचारतरंग, ते लोकांपासून झांकून ठेवण्याचा त्याचा प्रयत्न, राजानें आपल्या मुलाला युवराज करण्याबद्दलची इच्छा प्रकट केल्याबरोबर त्याच्या मनाला वाटणारें वैषम्य, आपल्या धन्याशीं आणि आपल्या घरीं आलेल्या पाहुण्याशीं बेइमान होऊन त्याचा खून आपण कसा करावा या विचारानें त्याच्या मनाची झालेली चलविचल, ही खुनाची कल्पना आजिवात सोडून देण्याचा त्याचा मनोदय, त्याच्या बायकोनें त्याला उत्तेजन दिल्यानंतर त्याच्या मनाचा फिरून झालेला निश्चय, खून करण्याच्या पूर्वी त्याच्या डोळ्यांपुढें दिसूं लागलेली ती कल्पनामय कट्यार, आणि खुनाच्यानंतर त्याच्या मनाला वाटूं लागलेली ती नानाविध भीति, या संबंधाचीं या नाटकांत अत्यंत कुशलतेनें रेखाटलेलीं सर्व चित्रें शेक्सपियरचीं आहेत. यांत हॉलिनशेडचा कांहीं एक संबंध नाहीं. त्याचप्रमाणें मॅकबेथ ( मानाजीराव )नें आपल्या राज्याभिषेकानंतर केलेल्या मेजवानीच्या वेळीं नुकत्याच मारून टाकलेल्या बँको ( व्यंकोजीराव)च्या भुताचें आगमन आणि त्याच्या योगानें सगळ्या मेजवानीचा झालेला बेरंग, याबद्दलची कल्पनाहि शेक्सपियरचीच स्वतःची आहे. त्याशिवाय चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशामध्यें त्या चेटक्यांच्या भूताटकीच्या सामर्थ्याच्या योगानें पुढील होणाऱ्या गोष्टी ज्या भूतांच्या तोंडून वदविल्या आहेत आणि स्कॉटलंडच्या गादीवर बसणारे राजे जे एका आरशाच्या द्वारानें दाखविले गेलेले आहेत, त्यांतील भविष्यकथनाच्या रचनेचें चातुर्य हेंही केवळ शेक्सपियरच्याच कल्पनेचें फळ आहे. परंतु शेक्सपियरच्या या नाटकामध्यें उत्कृष्ट, इतकेंच नव्हे, तर केवळ अनुपमेय, असा पांचव्या अंकांतील जो राणीचा झोपेंतील चालण्याचा पहिला प्रवेश, त्याच्यांतील कल्पनेसारखी

कल्पना हॉलिनशेडच्या बखरीमध्यें तर नाहींच नाहीं, पण अशी कल्पना दुसऱ्याहि कोणत्या नाटकांतून सांपडणें शक्य नाहीं. अशा रीतीनें ह्या मॅकबेथ नाटकाची जी ही सुंदर मूर्ति बनविण्यांत आलेली आहे, तिचा मूळ दगड हॉलिनशेडच्या खाणीमध्यें जरी सांपडलेला असला, तरी त्या दगडावर कळाकुसरचें काम करून बनविलेल्या या मूर्तीमध्यें ज्या अनेक मनोविकारांच्या अद्वितीय छटा दर्शविण्यांत आलेल्या आहेत, त्यांच्याबद्दलचें सगळें श्रेय एकट्या शेक्सपिरच्याच कल्पनेला आहे.

## चेटक्यांचे तीन प्रवेश.

अशा प्रकारचें हें नाटक इंग्रजीमधून मराठीच्या प्रांतांत आणतांना वाटेमध्यें किती तरी अडचणी आडव्या येतात. त्यांपैकीं कांहींचा उल्लेख येथें करणें जरूर आहे. या नाटकामध्यें चेटक्यांचे प्रवेश शेक्सपियरनें घातलेले आहेत. ह्या चेटक्या ह्या नाटकांत एकंदर तीन वेळां प्रवेश करितात. पहिल्या अंकांतील पहिला व तिसरा प्रवेश आणि चवथ्या अंकांतील पहिला प्रवेश, असे हे तीन प्रवेश आहेत. यांपैकीं पहिल्या अंकांतील पहिल्या प्रवेशामध्यें अत्यंत विद्रुप स्वरूपाच्या अशा तीन चेटक्या रंगभूमीवर प्रवेश करून पुढें होणाऱ्या भयंकर गोष्टींच्या प्रदर्शनासाठीं सगळीकडे एक प्रकारचा भयानकपणाचा पडदा पसरून ठेवितात. वादळ होत असतें, मेघगर्जना ऐकूं येत असतात, आणि विजा चमकलेल्या दिसत असतात. अशा भयंकर स्वरूपाच्या वातावरणामधून पुढें काय उत्पात उत्पन्न होतील आणि असल्या विलक्षण प्रारंभाचें पुढें कशामध्यें पर्यवसान होईल, या विवंचनेनें प्रेक्षकांचीं मनें पहिल्यापासूनच व्यग्र होऊन जातात; व पुढें दुसऱ्या अंकांमध्यें मानाजीरावाकडून राजाचा जो मोठ्या भयंकर रीतीनें खून होतो, त्याला साजेल असाच हा चेटक्यांचा उपोद्घात आहे, याची मागाहून प्रत्येकाला साक्ष पटते. या पहिल्या अंकांतील पहिल्या प्रवेशामध्यें या तीन चेटक्या रंगभूमीवर प्रवेश करतात आणि मानाजीरावाची गांठ घेण्याबद्दलचा आपला मनोदय व्यक्त करून त्या हवेमध्यें अदृश्य होतात; व त्याच दिवशीं संध्याकाळीं मानाजीराव आणि व्यंकोजीराव हे लढाईंत विजयी होऊन परत येत असतांना त्या वाटेंत एका माळरानावर त्या दोघांना गांठतात. त्यांच्या संभाषणामध्यें " तूं राजा होशील " असें त्या मानाजीरावाला सांगतात; व " तुझे वंशज राजे होतील " असें भविष्यकथन व्यंकोजीरावाला उद्देशून त्या करतात. या दोघां सरदारांपैकीं व्यंकोजीराव हा स्थिर आणि गंभीर वृत्तीचा असल्यामुळें

## दोन मुकुट आणि तीन राजदंड.

चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशामध्यें चेटक्यांनीं बोलाविलेलीं पहिलीं अदृश्य झाल्यानंतर भावी भूतांच्या रूपानें आठ राजांची एक रांग लागते. आणि त्यांपैकीं शेवटच्या राजाच्या हातांत एक आरसा आरशांत आणखी किती तरी राजे दिसूं लागतात. आणि या असा एक चमत्कार दृष्टोत्पत्तीस येतो कीं, त्यांपैकीं कोणाच्या डोक्यावर मुकुट आणि हातांत तीन तीन राजदंड दिसत असतात. आणि या सग- पाठीमागून त्र्यंकोजीराव दिसूं लागतो. आणि तो मानाजीरावाला कीं, " हे पाहिलेस माझे वंशज ! "

जो एको देखावा त्या चेटक्यांनीं मानाजीरावाला येथें दाखविला आहे, त्यां देव औचित्य मराठी वाचकांच्या आकलनांत येणें अशक्य आहे. मानाजीराव हें निर्दकल्पित नाटक आहे, अशा दृष्टीनें जे मराठी वाचक या नाटकाकडे पाह- ण्यास उद्युक्त होणार, त्यांच्या दृष्टीनें हे आठ राजे कोण, ते आठच कां, ते आठ तरी कशाला पाहिजे होते, आणि त्यांच्यापैकीं कोणाच्या डोक्यावर दोन दोन मुकुट आणि हातांत तीन तीन राजदंड दिसतात याचा अर्थ काय, असे प्रश्न उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. कारण, जेथें कल्पनाच करावयाची, तेथें त्या कल्पनेनें आठच राजांच्या संख्येवर कां थांबावें आणि दोन मुकुट आणि तीन राजदंड एवढ्यांवरच कां तृप्त व्हावें, हे प्रश्न स्वाभाविक आहेत. परंतु येथें मराठी वाचकांनीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ही शेक्सपियरच्या केवळ कल्पनेची निर्मिति नसून त्या वेळच्या ऐतेहासिक परिस्थितीला अनुलक्षून शेक्सपियरनें हे उल्लेख येथें केलेले आहेत. बँको ( त्र्यंकोजिराव ) पासून उत्पन्न झालेले आणि स्कॉटलंडच्या गादीवर बसलेले अनुक्रमानें पुढील राजे आहेतः— दुसरा रॉबर्ट, तिसरा रॉबर्ट, पहिला जेम्स, दुसरा जेम्स, तिसरा जेम्स, चवथा जेम्स, पांचवा जेम्स आणि सहावा जेम्स, असे हे आठ राजे आहेत. यांपैकीं स्कॉटलंडच्या गादीवरील जो सहावा जेम्स, तोच क्वीन एलिझाबेथनंतर इंग्लंडच्या गादीवर बसून इंग्लंडचा पहिला जेम्स म्हणून राजा झाला. आणि याच्याच कारकीर्दीमध्यें शेक्सपियरनें हें नाटक लिहिलें असून या राजाची थोडीबहुत खुशामत करण्याच्या इरायानें शेक्सपियरनें आपल्या या नाटकामध्यें हा उल्लेख आणिलेला आहे. तेव्हां बँकोपासून इंग्लंडच्या पहिल्या जेम्सपर्यंत हे एकंदर आठ राजे होतात, म्हणून येथें आठच राजांचा निर्देश करण्यांत

आलेला आहे. त्याचप्रमाणें या स्कॉटलंडच्या सहाव्या जेम्सला पहिल्या स्कॉटलंडमध्यें राज्याभिषेक झालेला असून तोच जेव्हां इंग्लंडचा पहिला राजा झाला, तेव्हां इंग्लंडमध्यें त्याला फिरून दुसऱ्यांदा राज्याभिषेक आला. यामुळें कोणाच्या डोक्यावर दोन दोन राजमुकुट दिसत आ वर्णन करण्यांत आलेलें आहे. त्याचप्रमाणें इंग्लंड, स्कॉटलंड आणि आ एकत्रित केलेल्या तीन देशांवर इंग्लंडच्या राजाचें स्वामित्व असल्यामु तीन राजदंड असल्याबद्दलचा उल्लेख करण्यांत आलेला आहे.

## देवडीवाल्याचा प्रवेश.

यानंतर ज्या तिसऱ्या एका गोष्टीचा येथें उल्लेख करणें जरूर आहे, म्हटली म्हणजे दुसऱ्या अंकामध्यें जो देवडीवाल्याचा म्हणून तिसरा प्रवे त्या संबंधाची होय. दुसऱ्या अंकाच्या सुरवातीला आपण असें पाह मानाजीरावानें आपल्या किल्ल्यांत आपल्या राजाला दिलेली मेजवानी आटपून जाऊन तो राजा आतां आपल्या खोलींत निजावयाला जात अ दुसऱ्या दिवशीं राजाचा मुक्काम त्या किल्ल्यांतून हलावयाचा असल्या "तुम्ही मला मोठ्या पहाटेस हांक मारायला या," असें राजानें आपल्या सरदारांपैकीं मुकुंदराव याला निजायला जाण्याच्या पूर्वी सांगितलें होतें. असें सांगून राजा आपल्या खोलींत निजावयाला जातो. परंतु राजा निजावयाला गेला, तरी त्या किल्ल्यांत मानाजीराव आणि त्याची बायको दर्याबाई हीं दोघें त्या रात्रीं जागतच राहातात. कारण, त्यांना राजाचा खून करावयाचा होता. त्याप्रमाणें त्या दोघांनीं मिळून दुसऱ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशामध्यें खुनाचें काम पार पाडलें; व त्यानंतर बहुतेक आवरासावर करून तीं दोघें आपल्या खोलींत निजायला जाण्याच्या तयारींत होतीं. इतक्या गोष्टी होत आहेत, तोंपर्यंत बरीच रात्र उलटून जाऊन पहाटेचा प्रहर जवळ जवळ येत चाललेला होता. व या वेळेच्या सुमारालाच आपल्याला उठविण्याविषयीं राजानें मुकुंदरावाला सांगितलें होतें. राजाच्या त्या आज्ञेप्रमाणें मुकुंदराव येऊन बाहेरच्या दक्षिणेकडच्या दरवाजावर धक्के मारूं लागतो. ते धक्के ऐकून, दर्याबाईच्या सल्ल्यानें आपल्या हातावरील रक्ताचे डाग धुऊन टाकून निजायला जाण्याच्या बेतांत असलेल्या मानाजीरावाची अगदीं पांचावर धारण बसते; आणि त्यामुळें साहजिकपणेंच दार न उघडतां तो आपल्या खोलींत निघून जातो. पण दार उघडलें न गेल्या-

मुळें मुकुंदरावाकडून दारावर बसणारे धक्के मात्र मधून मधून तसेच चालू राहतात. त्या वेळीं दरवाजाच्या आंतल्या बाजूच्या देवडीवर तेथील एक देवडीवाला निजलेला होता. रात्रींच्या राजाच्या मेजवानीनंतर इतर चाकरमाणसांबरोबर त्या देवडीवाल्यानेंहि दारूपाणी वगैरे जिनसांवर यथास्थित हात मारलेला असल्यामुळें व बऱ्याच रात्रपर्यंत जागत असल्यामुळें तो या वेळीं झोपेंत अगदीं गुंग होऊन गेलेला होता; परंतु हे दारावरील धक्के ऐकून तो अर्धवट जागा होऊं लागला होता. आणि अर्धवट झोंप व अर्धवट जागृति या दोन अवस्थांच्या मिश्रणात्मक स्थितीमध्येंच डोक्यांत कांहीं तरी असंबद्ध कल्पना प्रादुर्भूत होऊन त्यांनाच पुढें बहुधा स्वप्नाचें स्वरूप प्राप्त होत असतें. या सामान्य वस्तुस्थितीप्रमाणें त्या अर्धवट झोंपेंत असलेल्या आणि अर्धवट जागृत झालेल्या देवडीवाल्याच्या डोक्यांत अशी एक विलक्षण कल्पना प्रकट झाली कीं, मी मानाजीरावाच्या किल्ल्यांतील एक देवडीवाला नसून नरकाच्या दरवाजावरील देवडीवाला आहें. त्याच्या त्या अर्धवट निद्रेच्या स्थितीमध्यें त्याची अशी भावना झाल्यामुळें तो जेव्हां जेव्हां आपल्या किल्ल्यांतील दरवाजावर मुकुंदरावाकडून रात्रीच्या वेळीं धक्का बसलेला ऐकतो, तेव्हां तेव्हां नरकांत पडण्याकरितां आलेल्या कोणा तरी निरनिराळ्या पापी इसमांकडून नरकाच्या दरवाजावर हे धक्के मारण्यांत येत आहेत असें तो समजतो; व अशा या अर्धवट सुषुप्तीच्या मनःस्थितीमध्यें तो आपल्या भाषणांतील निरनिराळीं वाक्यें बोलत आहे. हा जो प्रसंग शेक्सपियरनें या ठिकाणीं घातलेला आहे, त्याच्याबद्दल बहुतेक टीकाकार शेक्सपियरच्या प्रतिभेची फारच तारीफ करितात. शेक्सपियरनें आपल्या मॅकबेथच्या नाटकामध्यें दुसरे कोणतेहि भाग हॉलिनशेडच्या इतिहासांतून जरी घेतलेले असले, तरी या औचित्यपूर्ण प्रवेशाचा उगम दुसऱ्या कोणत्याहि इतिहासांत नसून तो केवळ शेक्सपियरच्या प्रतिभेपासूनच झालेला आहे. राजाच्या भयंकर खुनासारखा अंगावर शहारे उत्पन्न करणारा प्रसंग पूर्वीं घडून आल्यानंतर प्रेक्षकांच्या मनाला बसलेला करुण आणि भयानक रसांचा ताण कमी करण्याकरितां दुसऱ्या कांहीं तरी थोडयाशा तद्भिन्न, पण बऱ्याच अंशीं तत्सम, अशा रसाच्या प्रसंगाची येथें योजना करणें अत्यंत अवश्यक होतें; आणि याच उद्देशानें शेक्सपियरनें हा देवडीवाल्याचा विनोदी प्रवेश येथें घातलेला आहे. या प्रवेशामध्यें थोडासा विनोद आहे; पण तो विनोद असा आहे कीं, त्याच्या योगानें उत्तान हास्यरसाचा उद्भव होऊन त्यापासून पूर्वीच्या करुणरसाचा भंग होईल इतका तो हास्योत्पादक नाहीं; तर त्या विनोदामध्यें उपरोधिक उद्गारांची इतकीच भर

घालण्यांत आलेली आहे कीं, त्यापासून विनोद तर वाटावा पण पूर्वीचें करुणरसाचें वातावरण फारसें बिघडून जाऊं नये. इतक्या नाजुक धोरणानें या विनोदात्मक प्रसंगाची येथें योजना करण्यांत आलेली आहे. हा विनोदाचा मंद प्रवाह वाहूं लागणें ही गोष्ट शक्य करण्याकरितां " मी नरकाच्या दरवाजावरचा एक देवडीवाला आहें, " ही जी भावना शेक्सपियरनें त्या किल्ल्यांतील देवडीवाल्याच्या मनामध्यें निर्माण केलेली आहे, तिच्या योगानें उपरोधात्मक विनोद तर शक्य झालाच आहे, पण शिवाय त्या साधनानें शेक्सपियरनें दुसरा एक अद्भुत स्वरूपाचा भावार्थ किती तरी कौशल्यानें व्यंजित केलेला आहे! त्या देवडीवाल्याला या वेळीं काय वाटत होतें? तर त्याला असें वाटत होतें कीं, मी नरकाच्या दरवाजावरचा देवडीवाला आहें! आणि हें काय त्याला खोटें वाटत होतें? तो एका अर्थानें या वेळीं नरकाच्या दरवाजावरचाच देवडीवाला नव्हता, तर काय होता? तो ज्या दरवाजावरील देवडीवाला होता, त्या दरवाजाच्या आंत प्रत्यक्ष नरक नव्हता, तर काय होतें? किंबहुना नरकांतल्यापेक्षांहि भयंकर स्थिति त्या दरवाजाच्या आंत घडून आलेली होती. आणि अशा भयंकर स्वरूपाच्या घडून आलेल्या गोष्टी आपली भयंकर छाया आपल्या आसपासच्या अंतःकरणांवर पसरवीत असतात, हा जो एक अज्ञेय सृष्टींतील अदृश्य नियम आहे, त्या नियमाच्या अनुरोधानेंहि कदाचित् त्या देवडीवाल्याच्या मनामध्यें मी नरकाच्या दरवाजावरचा देवडीवाला आहें ही कल्पना प्रतिबिंबित झालेली असणें अशक्य नाहीं. आणि असें असेल, तर यावरूनहि शेक्सपियरच्या मनाचें महनीयत्व चांगल्याच रीतीनें व्यक्त होतें.

असो. अशा अनेक विचारांनीं उद्युक्त होऊन शेक्सपियरनें हा जो देवडीवाल्याचा प्रवेश लिहिला आहे, त्यांत त्यानें त्या देवडीवाल्याच्या तोंडांत कित्येक विशिष्ट वाक्यें घातलेलीं आहेत. त्या वाक्यांचें मराठीमध्यें यथाश्रुत रीतीनें भाषांतर करणें शक्य नाहीं. शेक्सपियरला या ठिकाणीं कांहीं तरी उपरोधात्मक विनोद उत्पन्न करावयाचा होता. व त्यासाठीं त्यानें आपल्या वेळच्या कांहीं उपहासास्पद गोष्टी घेऊन त्यांचा या भाषणामध्यें उल्लेख केलेला आहे. त्या गोष्टी तशाच्या तशाच घेऊन आपल्या मराठी रंगभूमीवर उपरोधात्मक विनोद उत्पन्न करणें शक्य नाहीं. त्यासाठीं आपल्या इकडील उपहासास्पद गोष्टींचीच त्यांच्या जागीं योजना करणें जरूर होतें. तशा कित्येक गोष्टी मराठींतील या देवडीवाल्याच्या तोंडांत घालण्यांत आलेल्या आहेत. मानाजीराव हें नाटक प्रथमतः

१८९८ च्या सुमाराला लिहून रंगभूमीवर आणण्यांत आलें, हें पूर्वी सांगितलेलेंच आहे. या वेळीं आपल्या इकडे प्लेगची सांथ फार जोरानें फैलावली होती. त्या वेळीं त्याच्यावर काय उपाय योजावे, हें प्रथमतः कोणालाच कांहीं समजत नव्हतें. तरी पण सत्ता ही नेहमींच शहाणी असते! त्यामुळें अज्ञानाच्या दाट काळोखामध्येंहि सत्तेच्या शहाणपणाच्या नांवाखालीं निरनिराळ्या प्रकारचे वेडगळ हुकूम तेव्हां दररोज प्रकाशमान होत असत. अशाच प्रकारचा "रात्रीं कोणी मनुष्य मरण पावला, तर रात्रीं त्याचें दहन करूं नये," असा एक हुकूम त्या वेळीं जाहीर करण्यांत आला होता, हें पुष्कळांच्या स्मरणांत असेलच. त्या तत्कालीन गोष्टीचा उल्लेख या देवडीवाल्याच्या भाषणामध्यें करण्यांत आलेला आहे. त्याचप्रमाणें आणखीहि कित्येक तत्कालीन आणि सार्वकालीन अशा आपल्याइकडील गोष्टींचा उपयोग या भाषणामध्यें उपरोधात्मक विनोद उत्पन्न करण्याकरितां करण्यांत आलेला आहे, हें सुज्ञ वाचकांच्या दृष्टोत्पत्तीस आणून देणें जरूर आहे असें नाहीं.

## भूतांचे प्रवेश.

या नाटकांतील चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशामध्यें त्या चेटक्यांच्या कढईंतून एकंदर तीन भूतें उत्पन्न झालेलीं दृष्टीस पडतात. ही तीन भूतें तीन निरनिराळ्या प्रकारचीं आहेत. आणि त्यांपैकीं प्रत्येक भूताचा आकार मानाजीरावाच्या भावी आयुष्यांतील निरनिराळ्या तीन आगामी गोष्टींचें दिग्दर्शन करील, अशी त्यांची योजना करण्यांत आलेली आहे. प्रथमतः त्या चेटक्यांच्या कढईंतून शिरस्त्राण घातलेलें नुसतें एक डोकेंच वर आलेलें दिसतें. पुढें पांचव्या अंकांत शेवटच्या प्रवेशांत मुकुंदरावानें लढाईमध्यें मानाजीरावाचें शिरस्त्राण घातलेलें डोकें कापून जें मल्हाररावाकडे आणलें आहे, त्याचें हें सूचक आहे. दुसऱ्या खेपेला रक्तानें भरलेलें असें एक लहान मूल त्या कढईंतून वर आलेलें दिसतें. यांतील गूढार्थ इंग्लिश टीकाकारांकडून असा दर्शविण्यांत आलेला आहे कीं, मुकुंदराव हा आपल्या आईच्या पोटांतून नैसर्गिक रीतीनें जन्माला आलेला नसून त्याच्या आईचें पोट फाडून त्याला रक्तानें भरलेल्या स्थितींत बाहेर काढण्यांत आलेलें होतें, असें जें या नाटकांत अखेरीस आढळून येतें, त्याचें हें द्योतक आहे. या दुसऱ्या भूतानें "मानवी स्त्रीच्या उदरांतून जन्मलेल्या कोणत्याहि मनुष्याच्या हातून तुझ्या केंसाला देखील धक्का लागणार नाहीं," असें मानाजीरावाला आश्वासन दिलें होतें. पण असें हें बाह्यात्कारी आश्वासन ज्या भूताकडून देण्यांत आलें होतें, तीं आईचें पोट चिरून बाहेर काढलेल्या लहान-

पणच्या मुकुंदरावाचीच प्रतिमा असल्यामुळें 'तुला अखेरीस मुकुंदरावाच्या हातून मृत्यु येईल,' हें या ठिकाणीं या भूताच्या तोंडून पर्यायानें मोठ्या कौशल्यानें ध्वनित करण्यांत आलेलें आहे. यानंतर तिसऱ्या खेपेला हातांत एक लहानसें झाड घेतलेलें आणि डोकीवर मुकुट घातलेलें एक मूल दिसतें. बीरवनांतील झाडें मानाजीरावाच्या किल्ल्याजवळ चालून येईपर्यंत मानाजीरावाला भीति नाहीं, असें या तिसऱ्या भूतानें सांगितलें आहे. आणि त्या दृष्टीनें पाहतां या भूताच्या हातामध्यें एक लहानसें झाड कां देण्यांत आलेलें आहे, याचें कारण सहज लक्षांत येण्यासारखें आहे. असे या तीन भूतांमधील तीन गर्भितार्थ आहेत.

यांच्याशिवाय या नाटकामध्यें शेक्सपियरनें आणखी एक भूताचा प्रवेश घातलेला आहे. आणि तो म्हटला म्हणजे तिसऱ्या अंकांतील चवथा प्रवेश हा होय. या प्रवेशांत मानाजीरावाच्या राजवाड्यांतील दिवाणखान्यांत रात्रीं एका मोठ्या मेजवानीचा समारंभ सुरू झालेला होता. या मेजवानीला मानाजीरावानें व्यंकोजीरावालाहि बाह्यात्कारी बोलाविलें होतें; पण आंतून त्याला आणि त्याच्या मुलाला ठार मारण्याकरितां त्यानें त्याच दिवशीं संध्याकाळीं गुप्त रीतीनें तीन मारेकरी पाठविले होते. इकडे मेजवानीकरितां सर्व निमंत्रित पाहुणे जमा झाले असतां व्यंकोजीराव आलेले नाहींत असें पाहून मानाजीराव मोठ्या मानभावीपणानें असें म्हणतो कीं, " आपल्या व्यंकोजीरावांची स्वारी जर या ठिकाणीं असती, तर आपला आनंद अगदीं शिखराला जाऊन पोंचला असता." हे मानाजीरावाच्या तोंडचे शब्द संपत आहेत न संपत आहेत, तोंच नुकत्याच मारल्या गेलेल्या व्यंकोजीरावाचें भूत तेथें येऊन उभें राहतें. हा या प्रसंगींचा भूताचा प्रवेश फारच परिणामकारक होतो. हें भूत दुसऱ्या कोणाला दिसत नाहीं, पण तें मानाजीरावाला मात्र दिसतें. आणि त्यामुळें ज्यानें त्याचा खून करविला होता, त्या मानाजीरावाच्या मनावर तें भूत आपला संपूर्ण परिणाम कसा उत्पन्न करितें, आणि कृतकर्मांच्या डागण्या मनुष्याला गुप्तपणें कशा सहन कराव्या लागतात, याचें एक अतिशय उत्तम चित्र शेक्सपियरनें या प्रवेशामध्यें रेखाटून प्रेक्षकांच्यापुढें ठेविलेलें आहे. या दृश्य सृष्टीच्या पलीकडे दुसरी एक अदृश्य सृष्टि आहे, या इहलोकाच्या पलीकडे दुसरा परलोक म्हणून कांहीं तरी आहे, मनुष्याच्या शक्तीच्यापेक्षांहि श्रेष्ठ अशी परमेश्वराची शक्ति सर्वत्र नांदत आहे, आपण येथें सत्तेच्या जोरावर अगर कपटाच्या पांघरुणाखालीं कांहींहि कृत्यें केलीं तरी त्यांचें शासन आपल्याला मिळाल्यावांचून राहणार नाहीं, कृतकर्मांचें प्रायश्चित्त भोगल्यावांचून

कोणीही मनुष्य कितीहि मोठा असला तरी त्याला सुटका नाहीं, हे या परमेश्वराच्या विश्वांतील न्यायाचे नियम शेक्सपियरच्या मनावर इतक्या जोरानें ठसलेले असावेत कीं, त्या नियमांची सत्यता सिद्ध करून दाखविण्याकरितां त्याला आपल्या कित्येक नाटकांतून असले भूतांचे प्रवेश समाविष्ट करणें अपरिहार्य झालेलें आहे. There are more things in heaven and earth than are dreamt of in your philosophy, हें शेक्सपियरचें ठरलेलें तत्त्व दिसतें; व तें त्यानें हॅम्लेटच्या नाटकामध्यें वरील वाक्याच्या द्वारानें स्पष्टपणें नमूदहि करून ठेविलें आहे.अशा प्रकारचे हे भूतांचे प्रवेश शेक्सपियरच्या फक्त मॅकबेथच्याच नाटकामध्यें नसून हॅम्लेट, रिचर्ड धि सेकंड, रिचर्ड धि थर्ड, ज्युलिस सीझर, वगैरे नाटकांमधूनहि ते आढळून येतात. ज्या अन्यायांचें येथें पारिपत्य होत नाहीं, ते अन्याय काय त्यांच्या कर्त्यांना पचले म्हणून समजावयाचें ? नाहीं ! असें केव्हांहि नाहीं ! या परमेश्वराच्या न्यायी सृष्टीमध्यें असें केव्हांहि होणें शक्य नाहीं ! आणि हेच त्रिकालाबाधित न्यायाचे सिद्धांत पापी लोकांना बजावून सांगण्याकरितां मेलेल्या माणसांनाहि भूतांचीं स्वरूपें धारण करून या सृष्टीमध्यें फिरून एकवार येण्याची कधीं कधीं तसदी घ्यावी लागते. आणि या तत्त्वाच्या दृष्टीनेंच शेक्सपियरच्या नाटकांतील हे भूतांचे प्रवेश उपपन्न होऊं शकतात.

## हॅम्लेट, रिचर्ड धि थर्ड आणि मॅकबेथ, यांची तुलना.

शेक्सपियरच्या अनेक शोकपर्यवसायी नाटकांपैकीं हॅम्लेटच्या नाटकाशीं मॅकबेथच्या नाटकाची पुष्कळ टीकाकार तुलना करतात. मॅकबेथच्याप्रमाणेंच रिचर्ड धि थर्ड यानेंहि एकामागून एक असे पुष्कळ खून केलेले आहेत; पण याच्यापलीकडे मॅकबेथ आणि तिसरा रिचर्ड यांच्यामध्यें फारसें स्वभावसाम्य नाहीं. तिसरा रिचर्ड हा एक राक्षसी अंतःकरणाचाच माणूस होता, आणि त्यानें एकामागून एक निरपराधी माणसांचे बळी घेण्याचा सपाटाच सुरू केला होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण मॅकबेथची गोष्ट तशी नाहीं. मॅकबेथ हा शेवटीं जरी एखाद्या राक्षसासारखा क्रूर झाला, तरी प्रथमतः तो कांहीं राक्षस नव्हता. त्याला मनुष्यस्वभावाची चाड होती. न्याय, अन्याय, यांच्यांतील फरक तो जाणत होता. आणि जरी त्याच्या अंतःकरणामध्यें दुष्ट बुद्धीचीं बीजें थोडींबहुत कोठें असलीं, तरी शौर्य, पराक्रम, स्वामिभक्ति, प्रामाणिकपणा, मह-

त्वाकांक्षा, इत्यादि सद्गुणांच्या दडपणाखालीं तीं बीजें इतकीं अजीबात दडपून गेलेलीं होतीं कीं, मॅकबेथच्या पूर्व चरित्रामध्यें त्यांचा कोणाला कोठें मागमूसहि लागलेला नव्हता. त्या दुष्ट बुद्धीच्या बीजांवर त्या तीन दुष्ट चेटक्यांनीं प्रथमतः थोडेंसें जलसिंचन केलें; आणि तेव्हांपासून त्या बीजांतील अंकुरोन्मुखता थोडी थोडी जागृत होऊं लागली. चेटक्यांचें जलसिंचन एकच; पण तें मॅकबेथच्या नरम स्वभावाच्या अंतःकरणभूमिकेवर घडून आल्यावरोबर तेथें कुकल्पनांचा विकास सुरू झाला. पण बँको ( व्यंकोजीराव ) च्या मनोरचनेची भूमिका भिन्न आणि कणखर स्वरूपाची असल्यामुळें तेथें कोणत्याहि वाईट परिणामाचीं कांटेरी झुडपें उगवलीं नाहींत. ( मूळच्या ऐतिहासिक हकीकतीमध्यें राजाच्या खुनाशीं बँकोच्या कांहीं थोडाबहुत संबंध असल्याचा अस्पष्ट उल्लेख असला, तरी इंग्लंडचा राजा, पहिला जेम्स, याच्या वंशांतील मूळ पुरुष जो बँको तो या खुनाच्या कल्पनेपासून अगदीं आलिप्त होता, असें दाखवून शेक्सपियरनें आपल्या जेम्स राजाचें मन संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, इतकेंच नव्हे, तर एकाच गोष्टीचा दोन भिन्न मनांवर कसा भिन्न परिणाम होतो, हें दाखविण्याच्या संधीचाहि शेक्सपियरनें येथें फार चांगला फायदा घेतला आहे. ) पण मॅकबेथच्या मनांतील पापबुद्धि मात्र हळूहळू वाढूं लागली. चेटक्यांच्या भविष्यकथनावरून राज्यपदाच्या प्राप्तीची महत्त्वाकांक्षा त्याच्या मनांत उत्पन्न झाली. आणि त्या राज्यप्राप्तीकरितां कदाचित् आपल्याला आपल्या हल्लींच्या राजाचा खूनहि करावा लागेल, अशी कल्पना त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. ही कल्पना त्याला प्रियकरही वाटली आणि भयंकरही भासली. तरी पण पुढें राजानें आपल्या मुलाला युवराज ही पदवी दिलेली त्यानें ऐकिली, तेव्हां फिरून आपल्या वाटेंत ही एक नवीनच धोंड उत्पन्न झाली असें त्याला वाटलें; व त्याच्यावरून उडी मारून जाण्याचा त्यानें संकल्प केला. पण फिरून आपल्या घरीं पाहुणा म्हणून आलेल्या राजाचें संरक्षण करावयाच्या ऐवजीं आपण त्याचें प्राणहरण करण्याला उद्युक्त कसें व्हावें, याबद्दल त्याला वाईटही वाटतें. अशा विविध कल्पनांनीं त्याचें मन व्यग्र होऊन जातें. महत्त्वाकांक्षेमुळे त्याला राजाचा खून करावासा वाटतो, परंतु भीतीमुळें तसें करूं नये अशीही त्याची चित्तवृत्ति त्याला सुचविते. ज्या कट्यारीनें राजाचा खून करावयाचा ती कट्यार सुद्धां त्याच्या कल्पनासृष्टींत निर्माण होऊन त्याला खुनाच्या खोलीची वाट दाखवूं लागते. तरी पण हें कृत्य करूं कीं नको अशी त्याच्या मनाची चलबिचल चाललेलीच असते. ही अशी त्याच्या मनाची आंदोलनात्मक आणि अर्धवट स्थिति

जी त्या तीन चेटक्यांनीं निर्माण करून ठेवलेली असते, त्या स्थितीमध्यें स्थैर्य उत्पन्न करण्याचें काम या नाटकांतील चवथी चेटकी जी मॅकबेथची बायको, लेडी मॅकबेथ (दर्याबाई), ती परिपूर्णतेला नेऊन पोंचविते. तिच्या दृढ निश्चयामुळें मॅकबेथचा डळमळितपणा स्थिर होतो. तिच्या धैर्यामुळें मॅकबेथच्या भीतीला धीटपणा येतो. आणि तिच्या प्रेरणेमुळें मॅकबेथचा प्रयत्न शेवटास जातो. पण मॅकबेथ हा खुनाच्या पूर्वी जसा भीत होता, तसाच तो पुढेंहि फिरून भिऊं लागला. कोठले तरी शब्द त्याला ऐकूं येऊं लागले. देवापाशीं प्रार्थना करण्याला आपल्याला तोंड नाहीं, म्हणून त्याला वाईट वाटूं लागलें. खुनाच्या कट्यारी खुनाच्या खोलींत परत नेऊन ठेवण्याचेंहि धैर्य त्याला होईना. आणि आपल्या हातावरचे रक्ताचे डाग साता समुद्रांच्या पाण्यांनीं तरी धुतले जातील कीं नाहीं, याची त्याला शंका वाटूं लागली. अशा प्रकारचीं हीं अनेक आलंबनें आणि उद्दीपनें उपयोगामध्यें आणून खुनाच्या कल्पनेची उत्पत्ति, वृद्धि आणि परिणति कसकशी होत जाते, याबद्दलच्या निरनिराळ्या पायऱ्यांचें एक अत्यंत कौशल्यपूर्ण चित्र या ठिकाणीं शेक्सपियरनें काढून दाखविलें आहे. आणि या दृष्टीनें पाहिलें असतां खुनाच्या पूर्वींच्या मानसिक स्थित्यंतरांचें चित्र मॅकबेथमध्यें दाखविलें असून खून झाल्यानंतर त्याच्या सुडाच्या कल्पनेंतील विविधतेचें चित्र हॅम्लेट नाटकामध्यें दाखविलें आहे, असें म्हटलें असतां तें गैर होणार नाहीं. पहिल्या खुनाच्या वेळीं मॅकबेथ हा नवशिका असल्यामुळें स्वाभाविकपणेंच तो भीत होता आणि त्याला आपल्या बायकोच्या धैर्याची मदत पाहिजे होती. पण या खुनाच्या धंद्यांतील अनुभव एकदां त्याला आल्यानंतर बँको (व्यंकोजीराव) च्या दुसऱ्या खुनाच्या वेळीं त्याला तितकीशी भीतिहि वाटली नाहीं, किंवा त्यानें आपल्या बायकोची मदतही घेतली नाहीं. आणि पुढें मुकुंदरावाच्या बायकामुलांचे वगैरे त्यानें खून करविले, तेव्हां तर तो या खुनांच्या कामांत अगदीं निर्ढावूनच गेलेला होता. अशा रीतीनें प्रथमतः पापभीरु असलेल्याहि एकाद्या मनुष्याच्या मनाची खुनासारख्या पापाच्या कामामध्यें संवयीनें हळूहळू कशी प्रगति होत जाते, हें शेक्सपियरनें या मॅकबेथच्या पात्राच्या द्वारानें फार चांगल्या रीतीनें प्रदर्शित केलें आहे.

## दर्याबाई.

असल्या या अनेक खुनांच्या भयंकर कृत्यांबद्दल मॅकबेथ (मानाजीराव) ला अखे-

रीस काय शासन भोगावें लागलें, हें नाटकाच्या शेवटच्या प्रवेशामध्यें प्रत्येकाला दिसून येतच आहे. आतां मॅकबेथची बायको, लेडी मॅकबेथ (दर्याबाई), हिनें जरी कोणत्याहि खुनामध्यें प्रत्यक्षपणें भाग घेतलेला नव्हता, तरी पण पहिल्या खुनांत ती आपल्या नवऱ्याची साथीदार होती, हें अगदीं उघड आहे. ती आपल्या नवऱ्यावर प्रेम करणारी अशी एक बायको होती, पण तिला आपल्या नवऱ्याचा स्वभाव कसा आहे हें पूर्णपणें माहीत होतें. आपल्या नवऱ्याला मोठेपणा नको असें नाहीं, पण त्याच्याकरितां वाटेल तें करण्याला जें धैर्य पाहिजे तें आपल्या नवऱ्याच्या अंगांत नाहीं, हें ती जाणत होती. आणि म्हणून त्याच्यामध्यें जो उणेपणा होता, तो आपण आपल्या धैर्यानें भरून काढला पाहिजे, असा तिनें निश्चय केला. त्या तीन चेटक्यांनीं त्याला जें राज्यपद मिळेल म्हणून नुसतें भविष्यकथन केलें होतें, तें राज्यपद राजाचा खून करूनहि आपल्या नवऱ्याला मिळवून देण्याचें प्रत्यक्ष काम या चवथ्या चेटकीनें आपल्या स्वतःच्या हातांत घेतलें. ही स्त्री आकृतीनें जरी स्त्री होती, तरी धैर्यानें ती पुरुषापेक्षांहि जास्त होती. आपल्या अंगावर पीत असलेल्या स्वतःच्या लहान मुलाला आपल्या स्तनापासून ओढून काढून त्याचें डोकें जरूर पडल्यास एकाद्या दगडावर आपटून त्याचे तुकडे तुकडे करण्याला सुद्धां तयार होणारी अशी ती एक विलक्षण धाडसाची आणि क्रूरपणाची मूर्तिमंत प्रतिमा होती. आणि तिची कर्तृत्वशक्ति इतकी प्रबळ होती कीं, राजाच्या खोलींत त्याच्या संरक्षणासाठीं जे दोन चाकर निजलेले होते, त्यांना तिनें पुष्कळ दारू पाजून बेशुद्ध करून ठेविलें होतें, आणि त्यांच्या अंगाला रक्त चोपडून ठेवून त्यांच्यावर राजाच्या खुनाचा आरोप घालावयाचा ही कल्पनाहि तिनेंच सुचविली होती. शिवाय तिचा नवरा खून करावा कीं न करावा असा डळमळितपणा दाखवूं लागला, तेव्हां तिनें स्वतः देखील तो खून केला असता, इतकी तिची तयारी होती. खुनाच्या वेळीं घुबड ओरडूं लागलें, तरी पण त्यानेंहि ती घाबरली नाहीं तिच्या नवऱ्यानें खुनाच्या कट्यारी चुकून बाहेर आणल्या होत्या, त्या तिनें फिरून आंत नेऊन ठेविल्या. आणि आतां थोडयाशा पाण्यानें हातावरील रक्ताचे डाग धुवून टाकले, म्हणजे खुनाचा कांहीं एक मागमूस राहणार नाहीं, अशी त्या पातकाच्या परिमार्जनाविषयींची तिची धिटाईची कल्पना होती.

पण असल्या पातकांचें परिमार्जन तिला वाटत होतें इतकें सोपें नसतें. हातावरील रक्ताचे डाग धुऊन काढणारें पाणी हें खुनाच्या पातकाचें परिमार्जन करूं

शकत नाहीं, हें तिला मागाहून कळून आलें. दुसऱ्या अंकांतील राजाच्या खुनाचा प्रवेश झाल्यानंतर तिसऱ्या अंकांतील मेजवानीच्या प्रवेशामध्यें बँकोचें भूत दिसूं लागून नवऱ्याची चित्तवृत्ति बावरून जाते, त्या वेळीं त्याला धीर देण्याकरितां लेडी मॅकबेथ (दर्याबाई) आपल्या धोरणी मनोवृत्तींचा उपयोग करीत असलेली आपण पाहतों. पण तेव्हांहि तिच्या मनावर कृतकर्माच्या डागण्या बसतच असतात. त्यानंतर अखेरीस आपण लेडी मॅकबेथ (दर्याबाई) ला पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशामध्यें शेवटची पाहतों. या प्रवेशामध्यें प्रकट होऊन ती पर्यायानें सर्व लोकांना असें सांगते कीं, खुनाच्या पातकाचें परिमार्जन रक्ताचे डाग धुऊन टाकणाऱ्या पाण्यानें कालत्रयींहि होणें शक्य नाहीं! स्वार्थासाठीं घडवून आणलेल्या खुनाचें चित्र तो खून झाल्यापासून तिला सदोदित दिसत असतें. त्यामुळें तिचें डोकें भ्रमून जातें. ती एकांतवासाचें सेवन करते. दिवसाची तिची चित्तवृत्ति बावरलेली असते. आणि रात्रीच्या वेळीं तिला कृतकर्माचीं स्वप्नें पडतात. तिला कधीं स्वस्थ झोंप लागत नाहीं; आणि झोंप लागली असतां त्या झोंपेंतूनच उठून ती चालूं लागते. आणि ज्या गोष्टी कोणालाहि कळूं नयेत म्हणून तिनें पूर्वी अतिशय काळजी घेतली होती, त्याच खुनासंबंधींच्या गुप्त गोष्टी ती झोंपेंत आपल्या स्वतःच्या तोंडानें बडबडूं लागते ! काय हा मनुष्याचा कमकुवतपणा ! आणि काय ही परमेश्वराच्या न्यायाची कर्तबगारी ! अल्प बुद्धीच्या मनुष्या, तूं कसला गुप्तपणा बाळगणार ? आणि त्या विश्वतश्चक्षु परमेश्वरापासून तूं आपलीं पातकें किती छपवून ठेवणार ? " थोडेंसें पाणी घेऊन हे हात धुवून टाकले म्हणजे या खुनाचा मागमूस देखील राहणार नाहीं ! " असें खुनाच्या रात्रीं आपल्या नवऱ्याला शहाणपण शिकविणारी लेडी मॅकबेथ (दर्याबाई) या रात्रीं इतक्या काळानंतर अजूनहि आपल्या हातावरचे रक्ताचे डाग जात नाहींत हें पाहून किती निराश होते, आणि त्या योगानें खुनाच्या सारखीं भयंकर पातकें पाण्यानें धुतलीं जाऊं शकत नाहींत हें या जगांतील ईश्वरी नीतिमत्तेचें तत्त्व प्रेक्षकांच्या मनावर ती किती जोरानें ठसविते, याची साक्ष या प्रवेशामध्यें फारच उत्कटतेनें पटते. झोंपेंतच ती उठते, झोंपेंतच ती हातांत दिवा घेते, ती झोंपेंतच हातांत दिवा घेऊन चालूं लागते आणि ती झोंपेंतच आपल्या कृतकर्माचा पाढा वाचून दाखविते ! या सगळ्या गोष्टींवरून काय सिद्ध होतें ? तर यावरून हेंच सिद्ध होतें कीं, असल्या पातकांना देहान्तप्रायश्चितावांचून दुसरें प्रायश्चित्त नाहीं आणि असल्या मानसिक व्यथांना वैद्यशास्त्रामध्यें मरणावांचून दुसरें औषध नाहीं ! आणि याच

सृष्टीच्या नियमाच्या अनुरोधानें लेडी मॅकबेथ (दर्याबाई) नें त्या पश्चात्तापाच्या भयंकर डागण्यांना कंटाळून कंटाळून अखेरीस आत्महत्त्या करून घेतली, असें आपण पाहतों.

## या नाटकांतील कालावधीविषयीं अदमास.

या नाटकांतील गोष्टी घडून येण्याला किती कालावधि लागला असावा, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. यासंबंधानें इंग्लिश टीकाकारांनीं अन्तर्गत प्रमाणांवरून असा अदमास बसविला आहे कीं, पहिल्या अंकांतील पहिल्या प्रवेशापासून तों दुसऱ्या अंकांतील चवथ्या प्रवेशाच्या अखेर पर्यंतच्या—म्हणजे राजाच्या खुनासंबंधींच्या—सर्व गोष्टी एकापाठीमागून एक तावडतोब घडून आलेल्या असून त्या दोन किंवा तीन दिवसांच्या अवधीमध्यें घडल्या असल्या पाहिजेत. त्यानंतर मध्यंतरीं कांहीं दिवस जाऊन मानाजीरावाला राज्याभिषेक होतो व तन्निमित्त तो सर्वांना एक मेजवानी देण्याचें ठरवितो. तो जो मेजवानीचा दिवस त्या एकाच दिवशीं तिसऱ्या अंकांतील सर्व गोष्टी घडून आलेल्या असल्या पाहिजेत, हें उघड आहे. तेव्हां पहिल्या दोन अंकांमिळून जर आपण तीन दिवस धरले, तर त्यांत हा तिसऱ्या अंकाचा एक दिवस मिळविला असतां ही चार दिवसांची अवधि होते. तिसऱ्या अंकांतील चवथ्या प्रवेशाच्या शेवटीं मानाजीराव "उद्यां मी त्या चेटक्यांची गांठ घेण्याला जाणार," असें म्हणतो; यावरून तिसऱ्या अंकाच्या नंतर लगेच त्याच्या पुढच्याच दिवशीं चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांतील गोष्टी घडून आलेल्या असल्या पाहिजेत, हें अगदीं उघड आहे. तेव्हां हा चेटक्यांचा प्रवेश म्हणजे पांचवा दिवस होय. आणि याच प्रवेशाच्या शेवटीं "मनांत आलेल्या गोष्टी तावडतोब घडवून आणल्या पाहिजेत," अशा अर्थाचा आपला निश्चय मानाजीराव व्यक्त करतो. यावरून मुकुंदरावाच्या बायकामुलांची कत्तल करण्याची चवथ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांतील गोष्ट सहाव्या दिवशीं घडून आलेली असली पाहिजे, असें प्राप्त होतें. यानंतर ही हकीकत सांगण्याकरितां मगध देशांत असलेल्या मुकुंदरावाकडे राणोजी जातो. तिकडे जाण्याला त्याला कांहीं तरी दिवस लागलेले असले पाहिजेत. त्या कांहीं तरी आठपंधरा दिवसांच्या अवधीनंतर चवथ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांतील मल्हारराव आणि मुकुंदराव यांच्या मुलाखतीच्या वगैरे गोष्टी मागील सहाव्या दिवसाच्या पुढील सातव्या दिवशीं घडून आल्या असल्या पाहिजेत. हा

चवथ्या अंकांतील शेवटचा प्रवेश आणि पांचव्या अंकांतील दर्यावाईचा झोंपेंत चालण्याचा प्रवेश यांच्या दरम्यानही कांहीं तरी अनिश्चित काल गेला असला पाहिजे. तेव्हां त्यानंतरचा या प्रवेशाचा अर्थातच आठवा दिवस होय. त्या नंतर पांचव्या अंकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रवेशानें नववा दिवस घेतला असला पाहिजे, व चवथ्या प्रवेशापासून तों शेवटच्या लढाईच्या संबंधींच्या सातव्या प्रवेशापर्यंतच्या सर्व गोष्टी दहाव्या दिवशीं झालेल्या असल्या पाहिजेत. याप्रमाणें मध्यंतरीं गेलेले अवकाश सोडून देऊन या नाटकांतील निरनिराळ्या गोष्टी ज्या निरनिराळ्या दिवशीं झाल्या, त्याच नुसत्या दिवसांची बेरीज केली असतां ती बेरीज दहा होते, हें वरील विवेचनावरून दिसून येतें. परंतु या दहा दिवसांच्या मध्यंतरीं तीन चार प्रसंगीं जो अनिश्चित काल लोटलेला आहे, तो निश्चित करण्याला निश्चयात्मक असें कांहीं एक साधन आपल्यापाशीं नाहीं. स्कॉटलंडच्या इतिहासांतील मॅकबेथच्या कारकीर्दीकडे पाहिलें असतां तेथें ऐतिहासिक माहिती अशी दिसून येतें कीं, मॅकबेथनें आपल्या राजाचा खून इ० स० १०४० मध्यें केलेला असून तो इ० स० १०५७ मध्यें झालेल्या लढाईंत मारला गेला यावरून प्रत्यक्ष ऐतिहासिक कालगणनेप्रमाणे राजाच्या खुनापासून तों शेवटच्या लढाईपर्यंत एकंदर सतरा वर्षांचा कालावधि मध्यंतरीं लोटला असला पाहिजे, हे उघड होतें. व या दीर्घ कालावधीचे सूचक असे उल्लेख या नाटकामध्यें मधून मधून आलेलेहि आहेत. नाटकाच्या सुरुवातीला मॅकबेथ हा आपल्या वयाच्या भर उमेदींत असला पाहिजे, असें दिसतें. पण पांचव्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशामध्यें त्याच्या तोंडून जे उद्गार निघाले आहेत, त्यांवरून तो या वेळीं बराच वयातीत झालेला असावा, असें दिसतें. राजाचे मुलगे मल्हारराव आणि धनाजीराव हे निरनिराळ्या देशांत जाऊन तेथें ते बरेच दिवस राहिलेले असल्याचे जे उल्लेख आहेत, त्यांवरूनहि दीर्घ कालाची कल्पना दृढ होते. त्यानंतर मुकुंदराव हा मगध देशांत जाऊन राहिलेल्या मल्हाररावाला तेथें जाऊन भेटतो व आपल्या देशावर चालू असलेल्या जुलमांचें त्याच्या जवळ वर्णन करतो. त्या वर्णनावरूनही हे जुलूम बरेच दिवसपर्यंत चालू असले पाहिजेत, असें दिसून येतें. आणि अखेरीस पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशामध्यें लेडी मॅकबेथचा झोंपेंतून चालण्याचा जो एक प्रसंग दाखविला आहे, तसा तिचा क्रम त्याच्या पूर्वींही कित्येक दिवसांपासून चालू होता, असें त्या प्रवेशांतील उल्लेखावरून स्पष्ट होतें. हे कित्येक उल्लेख जसे दीर्घ कालावधि-

त्याचें द्योतक आहेत, त्याचप्रमाणें " ही गोष्ट ताबडतोब झाली पाहिजे, " " हें काम उद्यांच्या उद्यांच करणें जरूर आहे, " वगैरेसारखे जे दुसरे कित्येक उल्लेख या नाटकामध्यें मधूनमधून आलेले आहेत, त्यांवरून या नाटकांतील गोष्टींची गति फार त्वरित रीतीनें चाललेली आहे, असाहि भास उत्पन्न होतो. अशा रीतीनें शेक्सपियरनें या नाटकामध्यें दीर्घ काल आणि अल्प काल या दोघांच्याहि कल्पना तुल्यबलत्वानें ध्वनित केल्या आहेत. व या त्याच्या कौशल्याबद्दल शेक्सपियरचे टीकाकार त्याची फार स्तुति करतात. हें शेक्सपियरचें कौशल्य स्तुतीला पात्र आहे, यांत तर संशय नाहींच. पण हें कौशल्य शेक्सपियरला त्याच्या या नाटकांतील अवश्यकतेनें शिकविलें, हेंहि त्याच्याच बरोबर आपण विसरतां कामा नये. ऐतिहासिक सत्यतेप्रमाणें सतरा वर्षांच्या दीर्घ कालाकडे दुर्लक्ष करणें अशक्य होतें. त्याचप्रमाणें खुनाच्या नंतरचे खुनाचे परिणाम आणि जुलुमाचे प्रकार परिणत अवस्थेला येऊन पोंचण्यालाहि बऱ्याच दीर्घ कालाची अवश्यकता होती. तरी पण कोण-त्याहि नाटकांतील सतरा वर्षांची दीर्घावधि ही त्या नाटकामध्यें रसहानि उत्पन्न करण्याला कारणीभूत झाल्यावांचून केव्हांहि रहावयाची नाहीं. कारण आणि त्याचें कार्य यांच्यामध्यें जितका त्वरितपणा व तात्कालिकपणा असेल, तितका तो परिणामकारकतेच्या दृष्टीनें जास्त चांगला. मॅकबेथनें आज खून करावा आणि त्याबद्-लचें प्रायश्चित्त त्याला कधीं मिळणार याची प्रत्येक क्षणीं वाट पहात असणाऱ्या प्रेक्षकांना सतरा वर्षे थांबणें भाग पडावें, अशानें रसोत्पत्ति कशी व्हावी? तेव्हां हीं दोन्हीहि धोरणें संभाळण्यासाठीं दीर्घकालीन अवधीबरोबरच स्वल्प कालाचा आभास उत्पन्न करणें शेक्सपियरला कां अवश्यक होतें, हें वाचकांच्या लक्षांत येईल. आणि या अवश्यकतेलाच कौशल्य हें नांव प्राप्त झालेलें आहे. या शेक्सपियरच्या कौशल्याशीं आपल्या इकडीलहि एका उत्कृष्ट कवीचें कौशल्य तुलना करून पहाण्यासारखें आहे. संस्कृत भाषेंतील भास कवीचें "प्रतिमा" या नांवाचें जें एक अप्रतिम नाटक आहे, त्यांतील इतर अनेक गुणांसाठीं तर तें चित्ताकर्षक झालेलें आहेच; पण त्यामध्यें दीर्घकालाचें अल्पावकाशत्व भासविण्याचें हें प्रस्तुतचें कौशल्यहि वाचकाला अनुभवावयाला सांपडतें. या प्रतिमा नाटकाच्या चवथ्या अंकामध्यें भरतभेटीचा प्रसंग होऊन जाऊन पांचव्या अंकामध्यें रावणानें सीता चोरून नेल्याचें वर्णन आलेलें आहे. या दोन गोष्टींमध्यें अर्थातच बारा तेरा वर्षांचें अंतर आहे. पण इतकें अंतर असल्याचें

स्पष्ट रीतीनें बोलून दाखवावें, तर करुणरसाच्या वाढत्या परिपोषाचा परिणाम कमी होऊन रसहानीचा प्रसंग येतो. म्हणून भरतभेटीच्या पाठीमागून लगेच अगदीं थोड्या अवधीमध्यें सीताहरणाचा प्रसंग रामावर ओढवलेला आहे, असें भासानें या प्रतिमा नाटकाच्या पांचव्या अंकामध्यें कित्येक ठिकाणीं भासवून करुणरसाचा ओघ कायम टिकविला आहे. या भासाच्या कौशल्याप्रमाणेंच शेक्सपियरचेंहि वर प्रदर्शित केलेलें कौशल्य पूर्ण मार्मिकपणाचें आहे, असें कोणत्या सहृदय वाचकाला वाटणार नाहीं ?

## नटांचें अभिनयनैपुण्य.

शेक्सपियरचें हें शोकपर्यवसायी नाटक त्याच्या सर्व नाटकांत लांबीच्या दृष्टीनें अत्यंत लहान आहे, पण गुणांच्या दृष्टीनें तें सर्वांत मोठें आहे, यांत शंका नाहीं. या नाटकांतील करुण आणि भयानक हे रस नुसतें पुस्तक वाचल्यानेंहि मनावर अतिशय उत्कटतेनें उमटतातच. पण या नाटकाचा प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्यानें ती उत्कटता शंभर पटीनें जास्त वाढते. इतका या नाटकाच्या प्रत्यक्ष प्रयोगाचा परिणाम आहे. आणि हा परिणाम मुख्यत्वेंकरून मॅकबेथ आणि लेडी मॅकबेथ यांच्या अभिनयांपासुनच उत्पन्न होतो, यांचीं कामें जितकीं चांगलीं, तितका नाटकाला उठाव जास्त. प्रारंभीं हें सांगितलेंच आहे कीं, मानाजीराव नाटकाचे मराठी रंगभूमीवर पूर्वीं जेव्हां प्रयोग होत होते, तेव्हां महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध नट, गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग, हे अनुक्रमें मॅकबेथ ( मानाजीराव ) आणि लेडी मॅकबेथ ( दर्याबाई ) यांचीं कामें करीत असत. हे दोघेही नट आपल्या कामामध्यें स्वभावतः आणि पुष्कळ दिवसांच्या संवयीनेंही आधींच निष्णात झालेले होते. परंतु हें मानाजीराव नाटक बसविण्याच्या वेळीं यांतील विशिष्ट अभिनय कसे करावेत याबद्दलचें विशेष शिक्षण त्यांना कित्येक तज्ज्ञ अशा सद्गृहस्थांकडून मिळाल्यामुळें त्यांचे अभिनय अत्यन्त शास्त्रशुद्धतेला आणि परिणामकारकतेला जाऊन पोंचलेले होते. रा. रा. भाऊसाहेब सोमण ( किरात ), रा. रा. कृष्णाजीपंत खाडीलकर आणि नामदार दादासाहेब खापर्डे, यांच्या शिक्षणाचा या नाटकाच्या प्रयोगाच्या वेळीं शाहूनगरवासी नाटक मंडळींतील नटांना फार फायदा मिळाला. कै. प्रो. वासुदेवराव केळकर व रा. रा. नारायणराव फाटक या दोघांनीं आपल्या अभिनयाशिक्षणाच्या नैपुण्यानें सदर मंडळींतील प्रमुख नटांना आधींच अभिनयाच्या बाबतींत फार सुसं-

स्कृत करून ठेविलें होतें. परंतु हें प्रस्तुतचें नाटक बसविण्याचे वेळीं ते उभयतांहि दिवंगत झालेले असल्यामुळें त्यांच्या शिक्षणाचा फायदा या नाटकाच्या प्रयोगाला मिळूं शकला नाहीं. तरी पण त्याची उणीव सुदैवानें सुप्रसिद्ध, सुसंस्कृत आणि सुप्रतिभासंपन्न अशा श्रीमंत दादासाहेब खापर्ड्यांच्या कडून त्या वेळीं भरून निघाली. पहिल्या व दुसऱ्या अंकांतलि मानाजीरावाचे आणि दर्याबाईचे प्रवेश, दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांतलि अदृश्य कट्यारीचें साक्षात् दर्शन, व्यंकोजीरावाचें भूत मेजवानीचे वेळीं प्रकट झालें असतां त्या वेळची मानाजीरावाची चलबिचल, दर्याबाईच्या झोंपेंतील चालण्यामधील नितांत गंभीर असा भयंकरपणा, इत्यादि सर्व ठिकाणच्या अभिनयांमध्यें जें एक प्रकारचें उत्कृष्टत्व उत्पन्न झालेलें होतें, तें श्रीमंत दादासाहेब यांच्याच केवळ सूचनांपासून उत्पन्न झालेलें होतें. फार काय, पण दर्याबाई हें तेजस्वी आणि तुफानी स्वरूपाचें यथार्थ नांवहि त्यांच्याच सूचनेवरुन या नाटकांत समाविष्ट करण्यांत आलेलें आहे. हल्लीं मोडकळीस आलेलें पुण्याच्या गणेश पेठेंतील जें जुनें आर्यभूषण थियेटर, त्या थियेटरमध्यें त्या वेळीं या नाटकाचे प्रयोग होत असत. त्या थियेटरमध्यें त्या वेळीं हल्लींच्या इतर नाटकगृहांतल्या प्रमाणें फारशा सोयी नव्हत्या, व निरनिराळ्या प्रकारचे पडदे आणि सीनसीनरी यांचीहि फारशी मदत नव्हती. तरी पण असें असतांनाहि वरील शिक्षणाच्या योगानें मिळविलेल्या आणि स्वतःच्या अंगांत मूळच्या असलेल्या अभिनयनैपुण्यानें गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग हे या नाटकामध्यें इतका ओतप्रोत परिणाम उत्पन्न करीत असत कीं, तसल्या मनःस्थितीचें शब्दांनीं वर्णन करणें केव्हांही अशक्यच होय. इचलकरंजी संस्थानचे अधिपति, श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, हे १९१३चे सुमारास विलायतेस गेले होते. त्या वेळीं ते तेथें शेक्सपियरच्या कांहीं नाटकांचे प्रयोग पहात असतांना आपल्या इकडे पूर्वी पाहिलेल्या शाहूनगरवासी नाटकमंडळीच्या त्याच प्रयोगांची त्यांना आठवण झाली. आणि अन्योन्य तुलनेच्या दृष्टीनें पाहिलें असतां आपल्या इकडील गणपतरावांच्यासारखे नट हे अभिनयाच्या बाबतींत इंग्लिश नटांपेक्षां कोणत्याही प्रकारानें कमी नाहीत, अशी त्यांची खात्री झाली. आणि म्हणून इकडे परत आल्यावर एके प्रसंगीं हेच विचार जाहीर रीतीनें व्यक्त करून त्यांनीं गणपतरावांना सोन्याचीं सलकडीं बक्षीस दिलीं. यावरूनही गणपतरावांच्या गुणाचें गौरव वाचकांच्या लक्षांत येण्यासारखें आहे

शेक्सपियरच्या या नाटकांतील मॅकबेथ आणि लेडी मॅकबेथ यांचीं कामें ज्या सुप्रसिद्ध पाश्चिमात्य नटांनीं आणि नटींनीं केलेलीं आहेत, त्यांच्याही अभिनयकौशल्याच्या कमालीचीं अशाच प्रकारचीं वर्णनें इंग्रजी रंगभूमीच्या इतिहासामध्यें आपल्याला वाचावयाला सांपडतात. गॅरिक, मॅकरेडी, आयर्व्हिंग, मिसेस प्रिचर्ड, मिसेस सिडॉन्स, एलन् टेरी, वगैरे नांवें या बाबतींत सुप्रसिद्ध आहेत. व यांच्यासारख्यांनीं आपल्या या पात्रांच्या अभिनयांतील अनुभवांच्या ज्या कित्येक गोष्टी नमूद करून ठेविलेल्या आहेत, त्यांचें वाचन हें या नाटकांतील अभिनयसौष्ठवाचें बीज आणि गूढ स्थलांचें मर्म समजावून देण्याला अत्यन्त उपयोगी पडण्यासारखें आहे. कारण, कॉलेजांतील प्रोफेसरांना आपल्या खुर्चीवरून ज्या गोष्टी समजावून सांगण्याला प्रयास पडतात, त्या गोष्टी चांगले नट आपल्या रंगभूमीवरून तेव्हांच स्पष्ट करूं शकतात, असें पुष्कळ वेळां होतें.

या नाटकाच्या दुसऱ्या अंकांतील खुनाच्या प्रवेशामध्यें किती भयंकरपणा भरलेला आहे, याची कल्पना मिसेस सिडॉन्स हिनें दिलेल्या पुढील गोष्टींवरून होण्यासारखी आहे. एका प्रयोगांत मिसेस सिडॉन्स हिला लेडी मॅकबेथचें काम पहिल्या प्रथमच करावयाचें होतें. आपल्याला जें काम करावयाचें त्यांतील भाषण पाठ करण्याचें वगैरे काम प्रयोगाचे आदले दिवशीं रात्रीं बहुधा रात्रीच्या वेळीं करावयाचें, असा तिचा परिपाठ असे. त्याप्रमाणें तिचें जेवणखाण आटोपल्यावर लेडी मॅकबेथचें भाषण पाठ करिण्याकरितां व तें काम कसें काय करावयाचें याविषयीं विचार करण्याकरिता ती आपल्या खोलीला कडी घालून एकांतांत जाऊन बसली. लेडी मॅकबेथचें एकंदर भाषण फारसें कांहीं मोठें नाहीं, म्हणून तें आपण तेव्हांच संपवून टाकूं, असें तिला वाटत होतें. त्या वेळीं तिचें वय सुमारें वीस वर्षांचें होतें. या अल्प वयाच्या मानानें–आपलें भाषण पाठ झालें म्हणजे लेडी मॅकबेथच्या पात्राचें काम संपलें–अशीच तिची कल्पना होती. त्या पात्राच्या भाषणामध्यें कवीनें काय करामत करून ठेविली आहे आणि त्या भाषणांतून त्या पात्राच्या स्वभावाचा परिपोष आणि रसाचा परिपाक विलक्षण रीतीनें कसकसा होत जातो, याची त्या वेळीं तिला कांहीं एक कल्पना नव्हती. अशा मनःस्थितींत ती लेडी मॅकबेथचें हें भाषण थोडें थोडें पाठ करूं लागली, व भाषण मुखोद्गत करतां करतां ती दुसऱ्या अंका-

तील त्या खुनाच्या प्रवेशापर्यंत आली. परंतु त्या खुनाच्या प्रवेशाचें जेव्हां ती अध्ययन करूं लागली, तेव्हां त्या प्रवेशांतील भयंकरपणाचें चित्र तिच्या डोळ्यापुढें उभें राहूं लागलें. त्या वेळीं रात्र बरीच झालेली होती. रात्रीची शांतता चोहोंकडे पसरून जिकडे तिकडे अगदीं शुक झालेलें होतें. ती आपल्या खोलींत एकटी होती. आणि खून करण्याच्या तयारीचे विचार तिच्या मनांत प्रादुर्भूत होऊं लागले होते. या सगळ्या परिस्थितीच्या भयंकरपणाचा तिच्या मनावर इतका भयंकर परिणाम झाला कीं, ती अगदीं घाबरून गेली. तिच्यानें पुढें काम करवेना. तिनें त्या खोलींतलि दिवा आपल्या हातांत घेतला व भीतीनें ग्रस्त होऊन ती त्या खोलींतून निघाली आणि आपल्या निजावयाच्या खोलींत गेली. त्या वेळीं आपल्या पाठीमागून कोणी तरी भूत आपला पाठलाग करीत येत आहे, असें तिला वाटलें, इतकी ती भिऊन गेली होती. आपल्या हातांतील दिवा आपल्या निजावयाच्या खोलींत तसाच जळत ठेऊन ती आपल्या अंथरुणावर निजली. अशा प्रकारची ही रात्र तिला त्या वेळीं इतकी भयंकर भासली कीं, " ही रात्र मी कधींही विसरणार नाहीं ! " असे तिच्या तोंडून उद्गार निघालेले आहेत.

पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशामध्यें झोपेंतून उठून चालत असतांना लेडी मॅकबेथनें हातांत दिवा घेऊन चालावें किंवा न घेऊन चालावें, हा एक अभिनयविषयक परिणामाच्या दृष्टीनें महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या संबंधाची एक मनोवेधक हकीकत मिसेस सिडॉन्स हिच्या चरित्रामध्यें आढळून येते. वरील पहिल्या रात्रीची गोष्ट घडून आल्यानंतर पुढें सुमारें सहा वर्षांनीं फिरून एकदां लंडनमधील एका थियेटरमध्यें मिसेस सिडॉन्स हिला लेडी मॅकबेथचें काम करण्याचा योग आला. त्या वेळीं लेडी मॅकबेथच्या सोंगाचा सर्व पोषाख वगैरे घालून ती रंगभूमीच्या आंतील आपल्या खोलीमध्यें आपल्या अभिनयाविषयीं विचार करीत बसलेली होती. इतक्यांत मि. शेरिडन् हा आपल्याला तिची नाटकाच्या सुरवातीच्या आधीं गांठ घ्यावयाची आहे असें म्हणून तिच्या खोलीच्या जवळ आला. शेरिडन् हा त्या वेळेचा एक उत्कृष्ट नाटककार, एक मार्मिक प्रेक्षक आणि पार्लमेंटमधील एक सुप्रसिद्ध वक्ता होता; व लेडी मॅकबेथच्या कामांतील अभिनयाविषयीं मिसेस सिडॉन्स् हिला त्याच्या मनांतून कांहीं सूचना करावयाच्या होत्या. परंतु मिसेस सिडॉन्स हिला त्या वेळीं आपल्या अभिनयाचा विचार करण्याकरितां एकांताची फार जरुरी होती; व अशा वेळीं कोणी तेथें येऊन आपल्या भलत्याच भाषणानें आपल्या मनाच्या एकाग्र

त्तीचा उच्छेद करावा, हें तिला बिलकूल पसंत नव्हतें. म्हणून ती शेरिडन्‌ला आपल्या खोलींत येण्याची परवानगी देण्याला यत्किंचितही कबूल नव्हती. तरी पण शेरिडन्‌ही आपला आग्रह सोडीना. तेव्हां निरुपायास्तव तिनें त्याची भेट घेतली. मि. शेरिडन् आंत आल्यावर तिला म्हणालाः— आतांपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं लेडी मॅकबेथचें काम केलेलें आहे, त्यांनीं त्यांनीं पांचव्या अंकांतील पहिल्या प्रवेशामधील झोंपेंतून चालण्याचें काम हातांत मेणबत्तीचा दिवा घेऊनच केलेलें आहे. पण तुम्ही आज तें काम हातांतील दिवा खालीं ठेवून करणार आहां असें मी ऐकलें. यावर मिसेस सिडॉन्स यांनीं असें सांगितलें कीं, त्या प्रवेशामध्यें हातावरील रक्ताचा डाग धुवून टाकण्याचा अभिनय करावयाचा आहे. व तो अभिनय जोरानें दोन्ही हात चोळूनच केला पाहिजे. तेव्हां हातांत दिवा धरून तसा अभिनय कसा करतां येईल? शिवाय, पूर्वी बसवून ठेविलेली अभिनयाची तऱ्हा सोडून आयत्या वेळीं दुसरी नवीन पद्धती स्वीकारणें हें मिसेस सिडॉन्स् हिला शक्य नव्हतें. म्हणून तिनें शेरिडन्‌चें म्हणणें मान्य केलें नाहीं. व तिनें पूर्वी ठरविलें होतें त्याप्रमाणेंच त्या प्रवेशांतील आपला अभिनय केला; व तो इतका चांगला वठला कीं, नाटक संपल्यावर खुद्द शेरिडन् यानेंही येऊन त्या अभिनयाबद्दल मिसेस सिडॉन्स् हिची अत्यंत तारीफ केली.

रंगभूमीवरील हा प्रयोग संपल्यानंतर मिसेस् सिडॉन्स् ही आपल्या रंगाच्या खोलींतील आरशासमोर उभी राहून आपल्या अंगावरील कपडे वगैरे काढीत होती. तरी पण लेडी मॅकबेथच्या कामाशीं तिचें जें तादात्म्य झालेलें होतें, त्याचे परिणाम तिच्या मनावरून अजूनही नाहींसे झालेले नव्हते; आणि तिच्या शेवटच्या प्रवेशांतील कांहीं वाक्यें अजूनही त्याच स्वरांत तिच्या तोंडून निघत होतीं. त्यांत ती एकदां अगदीं हुबेहुब रंगभूमीवरच्याप्रमाणें म्हणाली कीं, " अजूनसुद्धां माझ्या हाताला रक्ताची घाण येतेच आहे!" वास्तविक पाहिलें असतां तिच्या हातावर जर रक्तच नव्हतें, तर त्याची घाण तरी तिला कोठून यावी! तिला रंगविणारीं जीं माणसें जवळ होतीं, त्यांनीं तिला सांगितलें कीं, " बाईसाहेब, गुलाबी रंगांत पाणी घालून तो रंग आपल्या हाताला लावलेला आम्ही प्रत्यक्ष पाहिलेला असतां तुमच्या हाताला रक्ताची घाण येणार कोठून?" पण अत्यंत उत्कटतेनें उद्दीपित झालेल्या मनोभावना गुलाबपाण्याच्या लाल सुगंधी रंगामध्यें देखील रक्ताच्या डागांची घाण भासवूं शकतात, हें नाट्यशास्त्रांतील गूढ रहस्य

रंगांत पाणी मिसळून रंग तयार करणाऱ्या त्या गरीब बिचाऱ्या नोकरांना कोठून माहित असणार ?

असो. अशा प्रकारचे मनोविकार आत्मैकतानतेनें प्रकट करण्याला ज्या नाटकामध्यें अवकाश आहे, असें हें मानाजीराव नाटक फिरून एकदां या दुसऱ्या आवृत्तीच्या स्वरूपानें महाराष्ट्र वाचकांच्या पुढें ठेवण्याचा हा जो योग येत आहे, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून ही प्रस्तावना येथें संपविण्यांत येत आहे.

पुणें.
१ आक्टोबर १९२८.

शि. म. परांजपे.

---

# मानाजीराव.

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला.

स्थळ—एक मैदान.

( मेघगर्जना होत आहेत व विजा चमकत आहेत. तीन चेटक्या प्रवेश करतात. )

१ चेटकी—आतां फिरून आपण केव्हां जमायचें ?

२ चेटकी—ही गडबड संपली आणि ह्या लढाईचा काय तो निकाल लागला कीं आपण जमूंच एका ठिकाणीं.

३ चेटकी—लढाई काय आतां दिवस मावळला नाहीं तो संपेल.

१ चेटकी—बरें जागा कोणती ?

२ चेटकी—त्या माळावर.

३ चेटकी—तेथें आपण सगळ्यांनीं जमून मानाजीरावाला गांठायचें.

१ चेटकी—ठीक आहे.

सर्व— पद.

जाऊं या साऱ्या जणी आतां जाऊं या ।। ।। ध्रु० ।। बऱ्याचें वाईट वाइटाचें बरें टाकूं क्षणामध्यें करूनियां ।। खऱ्याचें खोटें खोटयाचें खरें करूनि दाखवूं फिरूनियां ।। जाऊं० ।। हवेंत पोहूं पाण्यावर चालूं जमिनींत जाउं बुडी मारूनियां ।। भविष्य सांगूं कुत्र्याचें रडणें पाखरांचें बोलणें ऐकुनियां ।। जाऊं० ।।

( सर्व जातात. )

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—परशुपुराच्या जवळील छावणी.

( पडद्याचे आंत शिंग वाजतें व नंतर राजा **दमाजी, मल्हारराव, धनाजी, लक्ष्मणसिंग** व हुजरे प्रवेश करतात. इतक्यांत एक जखमी झालेला शिलेदार त्यांना भेटतो. )

**दमाजी**—ह्याचें सगळें अंग रक्तानें भरलें आहे. कोण बरें असावा हा ? ह्याच्या ह्या स्थितीवरून मला असें वाटतें, याला लढाईची अगदीं ताजी बातमी माहीत असली पाहिजे.

**मल्हारराव**—हाच तो रणशूर शिलेदार. मी मघाशीं शत्रूच्या हातांत सांपडत होतों, तेव्हां शौर्यानें लढून मला ज्यानें सोडवलें, तोच हा. या, दिलदार दोस्त, कसें काय? बरें आहेना ? तूं जेव्हां तिकडून आलास, तेव्हां लढाईचा रंग कसा काय दिसत होता, हें आमच्या महाराजांना सांग पाहूं.

**शिलेदार**—दोघेही पोहणारे थकून गेले म्हणजे एकमेकांच्या गळ्याला मिठ्या मारतात,आणि मग त्यांतून एकालाही धड पोहतां येईनासें झालें म्हणजे त्यांतला कोण तरेल आणि कोण बुडेल हें जसें सांगतां येत नाहीं, तशी मी निघालों तेव्हा युद्धाची स्थिति होती. तो क्रूर प्रतापराव—तो पहा बंड करण्यासाठींच निर्माण झालेला असावा, कारण कीं, जगातले सगळे दुर्गुण त्याच्या अंगांत कसे खचून भरले आहेत—त्या प्रतापरावाला पश्चिमेकडच्या मुलखांतून सैन्याचा यथास्थित पुरवठा झालेला आहे; आणि त्यानें हातीं घेतलेल्या ह्या कृत्यावर दैवाचीही बरीच कृपादृष्टि आहे. पण ह्या सगळ्याचा कांहीं उपयोग नाहीं. कारण, तो शूर मानाजीराव—मानाजीरावच तो—त्या मानी पुरुषाला मानाजीराव हें नांव अगदीं योग्य आहे—त्यानें दैवाची किंवा कोणाचीही पर्वा न करतां शत्रूच्या रक्तानें माखलेली समशेर हातांत घेतली आणि मोठ्या शौर्यानें शत्रूचें सैन्य कापीत कापीत त्यामधून वाट करीत तो पुढें चालला. तेव्हां अखेरीस त्या गुलामाची आणि ह्याची गांठ पडली. पण त्याच्याशीं एक शब्दही न बोलतां आपल्या मानाजीराव सेनापतींनीं त्याच्या अंगावरील कातडी सोलून काढून आपल्या तटाच्या भिंतीवर त्याचें डोकें टांगून ठेविलें.

**दमाजी**—वाहवा रे मानाजीराव ! मर्द असावा तर असा असावा !

**शिलेदार**—पण जेथून सूर्याचा प्रकाश निघतो, तेथूनच गलबतें फोडून टाकणारीं वादळें आणि भयंकर मेघगर्जना उत्पन्न होतात, त्याप्रमाणें जेथें आनंद होईल असें वाटत होतें, तेथें मोठा दुःखाचा प्रसंग कोसळला. न्याय आणि पराक्रम हीं एकत्र झाल्यामुळें ते बंडवाले लोक पळून जात होते; पण इतक्यांत विलासपुरच्या राजानें संधि साधून, हत्यार धरून, आणि नवीन लोकांची कुमक मिळवून, फिरून लढाईला तोंड दिलें.

**दमाजी**—तर मग हें पाहून आमचे सेनापति मानाजीराव आणि व्यंकोजीराव भिऊन गेले कीं काय ?

**शिलेदार**—होय ! ज्याप्रमाणें चिमण्यांना पाहून गरुडपक्षी भितात किंवा ससांना पाहून सिंह भितात, त्याप्रमाणें ते भ्याले खरे ! सरकार, भ्यायचें तर लांबच राहिलें, पण ते तोफेसारखे गर्जू लागले, शत्रूवर त्यांनीं शस्त्रांचा भडिमार चालू केला, आणि शत्रूच्या रक्तांत त्यांनीं साक्षात् स्नानें केलीं. सारांश, त्या वेळीं हें कुरुक्षेत्रांतील दुसरें भारतीय युद्धच आहे कीं काय, असा भास होत होता.—पण माझा जीव कासावीस होत चालला आहे. ह्या माझ्या जखमांना कांहीं तरी उपाय केलाच पाहिजे.

**दमाजी**—ह्या तुझ्या लढाईतील जखमा आणि हें तुझें लढाईचें वर्णन ह्या दोन्ही गोष्टींवरून तुझी योग्यता स्पष्ट दिसून येते. जा रे कोणी तरी आणि ह्याला वैद्याकडून औषधोपचार करवा.

( हुजऱ्याबरोबर शिलेदार जातो. )

( राणोजी प्रवेश करतो. )

**दमाजी**—हा इकडे कोण येत आहे ?

**मल्हारराव**—हा राणोजी.

**लक्ष्मणसिंग**—ह्याच्या मुद्रेवरून हा अतिशय त्वरेच्या कामासाठीं येत असावा असें वाटतें. ज्याला कांहीं अद्भुत गोष्टी कळवायच्या असतात त्याच्या मुद्रेवर असली त्वरा दिसत असते.

**राणोजी**—महाराजांचा जयजयकार असो.

**दमाजी**—तुम्ही कोणाकडून आलां ?

**राणोजी**—महाराज, जेथें विलासपुरच्या राजाचीं निशाणें फडकत

आहेत आणि त्यामुळें जेथें आपल्या लोकांचा शौर्याग्नि अगदीं गारठून गेला आहे, अशा त्या समरांगणांतून मी आलों. पराकाष्ठेचा राजद्रोही जो कठोरपूरचा ठाकूर त्याच्याकडून कुमक आणवून आणि दुसरेंही असंख्य सैन्य जमवून त्या विलासपुरच्या राजानें मोठें घनघोर युद्ध आरंभिलें. पण अखेरीस अंगांत चिलखत घालून सज्ज झालेला संग्रामदेवतेचा प्रियकर—आपला मानाजीराव—ह्याची आणि त्याची लढाई जुंपली. त्यानें तरवार उपसली कीं हा उपसी, त्यानें दुसरें एखादें हत्यार काढलें कीं हा तें काढी. अशा रीतीनें लढाई करून मानाजीरावानें त्याची अगदीं खोडकी जिरवली. आणि शेवटीं आपल्या पक्षाला जय मिळाला.

**दमाजी**—वाः वाः ! फार आनंदाची गोष्ट झाली !

**राणोजी**—आतां त्या विलासपुरच्या राजानें तहाचें बोलणें लावलें आहे. पण आपल्याला त्यानें दहा हजार मोहरा दिल्यावांचून आपण त्याच्या मेलेल्या लोकांना मुठमाती देखील देण्याची परवानगी देऊं नये.

**दमाजी**—इतःपर त्या कठोरपुरच्या ठाकराच्या गोडगोड भाषणावर विश्वास ठेवून मुळींच फसतां कामा नये. जा रे कोणी तरी आणि त्या ठाकराला आतांच्या आतां देहांत शासन करण्याचा हुकूम दिला आहे असें प्रसिद्ध करा. आणि कठोरपुरचा ठाकूर ही त्याची पदवी आपल्या मानाजीरावाला दिली आहे असें त्यांना जाहीर करा.

**राणोजी**—महाराज, मी या कामाची व्यवस्था लावतों.

**दमाजी**—जें त्या ठाकरानें गमावलें तें मानाजीरावानें कमावलें, हें बरें झालें.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—माळरान.

( मेघगर्जना चालली असतां तीन चेटक्या प्रवेश करितात. )

**१ चेटकी**—अक्का, तू एवढा वेळ कोणीकडे गेली होतीस ?

**२ चेटकी**—त्या किल्लेदाराची बायको बाळंतीण झाली आहे ती—तिनें

साह्वीच्या दिवशीं साऱ्यांना घुगऱ्या चारल्या आणि मी तिच्या शेजारींच रहात असून तिनें मला कांहीं सुद्धां दिलें नाहीं. म्हणून मी तिचें तें कारटें बाजेवरून पटकन् उचलून घेतलें. आणि जातां जातां बाजेखालची रसरसलेली शेगडी खोलीच्या दरवाज्यांत मधोमध अधांतरीं दिली टांगून आणि गेलें तें पोर घेऊन त्या पडक्या बुरुजावर. आणि तिथल्या त्या फड्या निवडुंगाच्या एका कांट्याला दिलें तें वाघळासारखें उरफाटें टांगून.

३ चेटकी—अस्सं अस्सं! तर मग एकूण आपण ह्या कामांत गुंतलां होता काय? बरें पण, ताई, तूं ग कोठें इतका वेळ गडप झाली होतीस?

१ चेटकी—मी होय? ( वेडें विद्रें हसते. )

३ चेटकी—हो, हो, तूंच. अशी हसतेस कां? आणि डोक्यावर हे कडू लिंबाचे टहाळे, गळ्यांत हीं सुया टोंचलेली लिंबाची माळ, आणि कानावर हीं पिसें कां दिलीं आहेस ठेवून? आणि तसेंच हें तुझें तोंड कशानें बरबटलें आहे इतकें?

१ चेटकी—तुला नव्हतें का मी एकदां सांगितलें?

३ चेटकी—काय तें?

१ चेटकी—कीं त्या पाटलाची नुकतीच लग्न झालेली सून एक दिवस भर दोनप्रहरीं नदीवर पाण्याला आली होती.

२ चेटकी—मग आली म्हणून? तुझें ग काय तिनें गाठोडें बुडवलें होतें?

१ चेटकी—अग, तिचें आणि माझें तर हाडवैर.

३ चेटकी—हं! हं! आतां मला आठवलें खरें. ती एकटी सांपडल्या-बरोबर तूं तिच्यावर कायसें चेटुक केलेंस म्हणून तूं सांगितलें होतेंस खरें.

२ चेटकी—मग तिला तूं आतां कसें तें चैन पडूं देत नसशील?

१ चेटकी—चैन? ती जेवायला बसली कीं तिच्या पानांत मी विष्ठा कालवितें. तिनें दहीं विरजलेलें असलें तर तें सारें दह्याचें मडकें शेणखळ्यानें भरून टाकतें. खुंटीवर चिरगुटांचें गांठोडें असलें तर त्यांतली तिच्याच लुग-ड्याची घडी तेवढी नेमकी मी जाळून टाकतें. आणि नवरा अंगाला हात लावायला आला कीं तिला किंकाळ्याच फोडायला लावतें. कीं तो बापडा जातो माघारा भिऊन.

३ चेटकी——पण आपलें हें तोंड कशानें लडबडलें आहे ? कांहीं तरी नैवेद्य मिळाला वाटतें त्या पाटलाकडून.

१ चेटकी——अग हो. तर मी सोडतें कीं काय ? त्यानें गांवदेवीपुढें एक बकरें कापलें होतें. त्याचें रक्त मी ढेंकर येईपर्यंत प्यायलें. त्याचे शितोडे कुठे माझ्या तोंडावर उडाले असतील.

२ चेटकी——वाहवा ग वाहवा ! बरीच आहेस कीं ग ! तूं तेवढं रक्त रगडलेंस. आणि आम्हांला कांहीं आणलें नाहींसना ?

१ चेटकी——अग हो. नाहीं कसें ? हीं घ्या तुम्हांला ( हाडें देतें. )

३ चेटकी——मांस सोलून खाललेलीं नुसतीं हीं हाडें आम्हांला देतेस का?

२ चेटकी——हें तुला चांगलें दिसतें का ? चल ग आपण जाऊं या.

( पडद्यांत नगारा वाजतो. )

१ चेटकी——अग, अशा रागावून जातां कोठें ? हीं पहा वाद्यें वाजूं लागलीं भारी, आणि आली मानाजीरावाची स्वारी. आतां सोडा सारा हट्ट आणि व्हा जराशा धट्ट.

२ आणि ३ चेटकी——खरेंच. तर मग आतां ही रुसण्याची वेळ नाहीं.

सर्व—— पद

आपण साऱ्या चेटकिणीग ॥ एकीमेकींच्या बहिणीग ॥
हात हातांत घालून ॥ गाणीं मंजुळ गाऊन ॥
नाचूं आपण मौजेनें ॥ नाचूं आपण मौजेनें ॥
एक दोन तीन. तीन त्रिक नऊ, कापूस मऊ, कुणी केला ?
आम्ही केला ॥

( मानाजीराव आणि व्यंकोजीराव प्रवेश करतात. )

मानाजीराव——इतका चांगला आणि इतका वाईट दिवस मी कधीं पाहिला नव्हता.

व्यंकोजीराव——अजून आपली छावणी किती लांब आहे बरें ?—— अरे ! ह्या कोण असाव्यात ? ह्या किती तरी खप्पड दिसत आहेत व यांचा पोषाख देखील मोठा विलक्षण दिसतो आहे ! पृथ्वीवर राहणाऱ्या प्राण्यां-पैकीं ह्या कोणी नसाव्यात. तरी पण आश्चर्य हें कीं ह्या हल्लीं पृथ्वीवर आहेत.——तुम्ही कोणी सजीव प्राणी आहां काय ? मनुष्यानें विचारलेले प्रश्न



मानाजीराव:—जर तुम्हांला वाचाशक्ति असेल, तर तुम्ही कोण आहां तें सांगा.

अंक १, प्रवेश ३ ( पृष्ठ ७ ).

समजण्याची तुम्हांला शक्ति आहे काय ? तुमच्यापैकीं प्रत्येक जण आपलें ओट ओंठावर ठेविते यावरून माझें म्हणणें तुम्हांला समजतें आहे असें दिसतें. तुम्ही बायका असाव्यात असें वाटतें. तरी पण तुमचा पोषाख कांहीं चत्मकारिकच दिसतो, त्यामुळें तसेंही म्हणतां येत नाहीं.

**मानाजीराव**—जर तुम्हांला वाचाशक्ति असेल तर तुम्ही कोण आहां तें सांगा.

**पहिली चेटकी**—माणिकपूरचे जहागिरदार मानाजीराव यांचा जयजयकार असो.

**दुसरी चेटकी**—कठोरपूरचे ठाकूर मानाजीराव यांचा जयजयकार असो.

**तिसरी चेटकी**—या देशाचा भावी राजा, मानाजीराव, याचा जयजयकार असो.

**व्यंकोजीराव**—मानाजीराव, हें भविष्य शुभसूचक असून तुम्ही असे दचकतां कां ? आणि असे भ्यायल्यासारखे कां दिसतां ?—(चेटक्यांकडे वळून) तुम्हांला शपथ आहे, खरें सांगा. तुमची ही सगळी माया आहे किंवा तुम्ही जशा दिसतां तशाच खरोखर तुम्ही आहांत ! आतांच्या आतां मिळणारा सन्मान आणि पुढें मिळणारें राज्यपद ह्यांविषयीं भविष्य कथन करून तुम्ही माझ्या स्नेह्याचें अभिनंदन केलें.—आणि त्या राज्यपदाच्या आशेंत हा अगदीं गर्क होऊन गेलेला दिसत आहे.—पण तुम्ही माझ्याविषयीं कांहींच भविष्य सांगत नाहीं तें कां ? जर तुम्हांला कालाच्या अनंत अवकाशांतलि बीजांचें अवलोकन करण्याचें सामर्थ्य खरोखर असेल, तर माझ्या बाबतींत त्यांपैकीं कोणत्या बीजाला अंकुर फुटेल आणि कोणत्याला फुटणार नाहीं हें तुम्हीं सांगा. तुम्हीं शुभ सांगितलें तरी त्याच्यापासून मला आनंद होणार नाहीं किंवा अशुभ सांगितलें तरी त्याचें मला दुःख वाटणार नाहीं. तेव्हां काय असेल तें स्पष्ट सांगा.

**पहिली चेटकी**—तुझा जयजयकार असो.

**दुसरी चेटकी**—तुझा जयजयकार असो.

**तिसरी चेटकी**—तुझा जयजयकार असो.

**पहिली चेटकी**—तुझी योग्यता मानाजीरावापेक्षां कमी असेल पण जास्तीही होईल.

**दुसरी चेटकी**—तुला मानाजीरावाइतकें सुख मिळणार नाहीं, पण त्यापेक्षां तूं अधिक सुखी होशील.

**तिसरी चेटकी**—तूं स्वतः राजा होणार नाहींस. पण तूं राजे निर्माण करशील. तेंव्हां मानाजीराव आणि व्यंकोजीराव यांचा जयजयकार असो.

**पहिली चेटकी**—व्यंकोजीराव आणि मानाजीराव यांचा जयजयकार असो.

**मानाजीराव**—थांबा, तुम्ही अर्धवट बोलतां हें पुरें नाहीं. मला आणखी सांगा. माझ्या बापाच्या मरणानंतर मी माणिकपुरचा जहागिरदार झालों हें मला ठाऊक आहे. पण मी कठोरपूरचा ठाकूर कसा झालों ? कारण कठोरपूरचा ठाकूर तर जिवंत आहे व त्याचा चांगला उत्कर्ष होत चालला आहे. आणि जसें कठोरपूरचा ठाकूर होणें हें असंभवनीय आहे, त्याप्रमाणेंच राजा होणें हें देखील असंभवनीय दिसतें. तेंव्हां तुम्हीं हें अद्‍भुत भविष्य कशावरून सांगितलें हें मला कळूं द्या. तसेंच ह्या माळावर आमची वाट अडवून असलें भविष्य सांगून आमचें अभिनंदन करण्याचें तुम्हांला काय प्रयोजन होतें ? सांगा, तुम्हांला शपथ आहे.

( सर्व चेटक्या अदृश्य होतात. )

**व्यंकोजीराव**—जसे पाण्यावर बुडबुडे दिसतात, तसे हे पृथ्वीवरचे बुडबुडेच म्हणायचे. ह्या कुठे बरें अदृश्य झाल्या असाव्यात ?

**मानाजीराव**—या हवेंत. आणि दुसरीकडे कोठें ? आणि त्यांचीं शरीरें म्हणून जीं दिसत होतीं तीं आपल्या श्वासोच्छ्वासाप्रमाणें वातावरणांत वितळून नाहींशीं झालीं. जर त्या थांबल्या असत्या, तर बरें झालें असतें.

**व्यंकोजीराव**—आपण ज्यांच्याबद्दल बोलतों आहों त्या येथें खरोखर होत्या का ? किंवा आपल्या बुद्धीला भ्रम तर झाला नाहीं ना ?

**मानाजीराव**—तुमचीं मुलें राज्यपदावर बसणार.

**व्यंकोजीराव**—आणि तुम्ही तर स्वतःच बसणार ?

**मानाजीराव**—आणि कठोरपूरचे ठाकूर पण होणार, असें नाहीं का त्या म्हणाल्या ?

**व्यंकोजीराव**—होय. असेच त्यांचे शब्द होते. हे कोण येत आहेत !

( राणोजी आणि अंग्रे प्रवेश करितात. )

**राणोजी**—मानाजीराव, तुमच्या विजयाची बातमी ऐकून आपल्या महाराजांना फार आनंद झाला. आणि त्या बंडखोराशीं लढत असतांना तुम्हीं जो आपल्या अंगचा पराक्रम प्रकट केला तो त्यांनीं ऐकला, तेव्हां तर त्यांना असें झालें कीं ह्या गोष्टीबद्दल आश्चर्य मानावें किंवा तुमची स्तुति करावी हें त्यांना कांहींच सुचेना. त्या कारणानें त्यांची चित्तवृत्ति अगदीं स्तब्ध होऊन गेली. तसेंच आजच्या लढाईतील आपल्या दुसऱ्या कृत्यांचा ते विचार करीत असतां त्यांना असें कळून आलें कीं विलासपूरच्या राजाच्या टोळींत शिरून तुम्ही स्वतः हजारों लोकांचीं डोकीं निर्भयपणें उडवीत होतां. एका पाठीमागून एक जशा पावसाळ्यांत गारा पडतात त्याप्रमाणें जासुदावर जासूद येत होते आणि त्यांपैकीं प्रत्येक जण आपल्या राज्याच्या संरक्षणासाठीं आपण जो पराक्रम करित होतां त्याचे पोवाडे आपल्या महाराजांसमोर गात होता.

**अंग्रे**—महाराजांनीं आपले आभार मानण्यासाठीं आम्हांला पाठविलें आहे. आणि आम्ही आपल्याला महाराजांकडे नेण्याला मात्र आलों आहों; आपल्याला बक्षीस काय देणें तें महाराज देतील.

**राणोजी**—आणि पुढें तुम्हांला जो मोठा मान मिळणार आहे त्याचा सत्कार म्हणून आपल्याला कठोरपूरचा टाकूर असा किताब त्यांनीं दिला आहे. तेव्हां, अहो कठोरपूरचे टाकूर साहेब, तुमचा जयजयकार असो.

**व्यंकोजीराव**—काय ! त्या भुतांनीं खरें सांगितलें काय ?

**मानाजीराव**—कठोरपूरचा टाकूर तर जिवंत आहे. मग लोकांच्या वस्त्रांनीं माझें शरीर तुम्ही काय म्हणून भूषित करतां ?

**अंग्रे**—जो कठोरपूरचा ठाकूर होता, तो अद्यापि जिवंत आहे, हें खरें. पण त्याला योग्य अशी देहान्तशिक्षा देण्याचें ठरलें आहे. विलासपुरच्या राजाशीं त्यानें सख्य ठेविलें, किंवा त्या बंडखोराला त्यानें गुप्त मदत केली, किंवा ह्या दोन्ही उपायांनीं तो आपल्या देशाचा नाश करण्यासाठीं खटपट करीत होता, हें कांहीं मला माहीत नाहीं. परंतु राजद्रोहाचा गुन्हा

त्याजवर शाबीत झाला व त्यानेंही तो कबूल केला, आणि अशा रीतीनें त्याचा उच्छेद झाला आहे.

**मानाजीराव**—मी माणिकपूरचा जहागिरदार आणि कठोरपूरचा टाकूर तर झालोंच. पण मुख्य तें अजून मागेंच राहिलें आहे.—तुम्हीं माझ्या-साठीं जे श्रम घेतले त्याबद्दल मी तुमचा आभारी आहें.—ज्यांनीं मला तूं कठोरपूरचा टाकूर होशील म्हणून सांगितलें होतें, त्यांनींच तुमचे मुलगे राजे होतील म्हणून सांगितलें होतें. तर आतां तेंही भविष्य खरें होईल, असें तुम्हांला वाटत नाहीं काय ?

**व्यंकोजीराव**—हें जर खरें मानूं लागलों तर कठोरपूरचा टाकूर हा किताब मिळाल्यावर राज्यपदाची आशा तुमच्याही मनांत जागृत झाली पाहिजे. पण हें कांहीं विलक्षण दिसतें. आणि आपली पापाकडे प्रवृत्ति करण्यासाठीं हे पिशाचयोनींतील प्राणी पुष्कळ वेळां आपल्याला खरें भवि-ष्यही सांगत असतात. क्षुल्लक गोष्टींत खरेपणा दाखवून आपलें मन वळवून घेऊन अखेरीस भयंकर प्रसंगीं हे आपल्याला तोंडघशीं पाडतात.—मित्रांनों, जरा इकडे या. मला तुमच्यापाशीं कांहीं बोलावयाचें आहे.

**मानाजीराव**—दोन भविष्यें तर खरीं ठरलीं. आणि पुढें जें राज्य-प्राप्तीचें मोठें भव्य नाटक व्हायचें आहे, त्याची ही मंगलसूचक नांदीच म्हणायची.—मित्रहो, मी तुमचा फार आभारी आहें.—हें जें चेट-क्यांनीं केलेलें भाकित त्याचा हेतु वाईट आहे असें म्हणतां येत नाहीं आणि चांगला आहे असेंही म्हणतां येत नाहीं. जर वाईट आहे असें म्हणावें, तर पुढें जें काम फत्ते होणार त्याचा हा सत्कार मला आधीं कां मिळावा ? प्रारंभ तर प्रामाणिकपणाचा झाला आहे.कारण,मी कठोपुरचा टाकूर झालों.बरें त्यांचा हेतु चांगला असावा असें म्हणावें,तर असले विचार पूर्वीं कधींही माझ्या मनांत आले नव्हते.—किती तरी भयंकर विचार हे ! ह्यांच्या योगानें माझ्या अंगावर शहारे उभे राहताहेत, आणि माझें नेहमीं स्थिर असलेलें हृदय ह्या बरगड्या फोडून बाहेर येत आहे कीं काय असें वाटतें ! असले भयंकर विचार माझ्या मनांत अधिकाधिक कां बरें येतात ? प्रत्यक्ष भीतीपेक्षां भयंकर कल्प-नाच अधिक भयप्रद असतात. माझ्या मनांत खून करण्याची कल्पना अजून मुळींच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. तरी पण त्या विचारांनीं माझें अंतः-

करण असें कांहीं खवळून सोडलें आहे कीं त्या विचारांत गुंग झाल्यामुळें पुढें काय करावें हें मला कांहींच सुचत नाहीं. आणि हल्लीं माझ्या मनात भावी कल्पनांवांचून दुसरें कांहीं येतच नाहीं.

**व्यंकोजीराव**—पहा, आपले स्नेही विचारांत कसे गर्क झाले आहेत ते !

**मानाजीराव**—मी राजा होणार असें जर दैवानें ठरविलेलें असेल, तर मग मी खटपट केली नाहीं तरी देखील तेंच दैव मला राज्यपदावर बसवील.

**व्यंकोजीराव**—नवीन केलेले कपडे प्रथम आपल्या अंगाला चांगले बसत नाहींत. पण तेच जुने झाले म्हणजे सवईनें चांगले बसतात. त्याप्रमाणेंच नवीन मिळालेल्या सन्मानामुळें ह्यांना कसेंसेंच वाटत आहे. पण कांहीं दिवसांनीं सर्व ठीक जमेल.

**मानाजीराव**—कांहींही होवो आणि कितीही अडचणी येवोत, जें व्हायचें तें होणारच.

**व्यंकोजीराव**—ठाकूरसाहेब, आम्ही आपल्यासाठीं थांबलों आहों.

**मानाजीराव**—मेहरबानीनें एवढा गुन्हा माफ करा. कांहीं गोष्टीची मला विस्मृति झाली होती, त्याची मी आठवण करित होतों. मित्रहो, तुम्ही माझ्यासाठीं घेतलेले श्रम मी आपल्या हृदयावर लिहून ठेविले आहेत. व तेथें मी त्यांचें नित्य अवलोकन करीत जाईन. चला, आपण आतां महाराजांकडे जाऊं या.—आज ज्या गोष्टी घडून आल्या त्यांचा तुम्ही चांगला विचार करा. आणि तसा विचार केलात म्हणजे फिरून केव्हां तरी आपण अगदीं मन मोकळें करून ह्याविषयीं बोलूं.

**व्यंकोजीराव**—मोठ्या खुषीनें.

**मानाजीराव**—तर मग तेथपर्यंत हा विषय बंद असूं द्या.—चला मित्रांनो, या.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

( **दमाजी, मल्हारराव, धनाजी, लक्ष्मणसिंग** आणि हुजरे येतात. )

**दमाजी**—कठोरपुरच्या ठाकुराला देहांतशिक्षा दिली नाहीं ? ज्यांना हें काम सांगितलें होतें ते अजून परत आले नाहींत काय ?

**मल्हारराव**—महाराज, ते अजून माघारे आले नाहींत. पण ज्यानें त्याला मरतांना पाहिलें अशा एका गृहस्थाशीं माझें बोलणें झालें. त्यानें असें सांगितलें कीं, त्या ठाकुरानें आपल्या राजद्रोहाचें पातक उघड उघडपणें कबूल केलें, त्यानें आपली क्षमा मागितली, आणि आपल्या मनाला झालेला पश्चात्ताप त्यानें प्रकट करून दाखविला. प्राण सोडण्याइतकें चांगलें कृत्य त्याच्या कुडींत प्राण होता तेथपर्यंत त्याच्या हातून कोणतेंच झालें नव्हतें. त्यानें इतक्या शांतपणानें प्राण सोडला कीं अतिशय प्रियकर वस्तु असूनही ती कवडीमोल आहे असें समजून तिचा त्याग करण्याची जणूं काय त्याला संवयच झालेली होती.

**दमाजी**—अशी एखादी कला कोठेंही उपलब्ध नाहीं कीं जिच्या योगानें चेहऱ्यावरून मनांत काय काय विचार चालले आहेत हें ओळखतां येईल. तो चांगला सभ्य माणूस दिसत असे आणि त्याच्यावर माझा पूर्ण विश्वास बसला होता.

( मानाजीराव, व्यंकोजीराव, राणोजी आणि अंग्रे येतात. )

या, आमचे शूर सेनापतिसाहेब, या. तुमच्या उपकाराबद्दल मी उतराई झालों नाहीं, ह्या माझ्या कृतघ्नपणाचें पाप माझ्या मनांत आतांपर्यंतही डांचत होतें. तुमचे उपकार इतके कांहीं थोर आहेत कीं त्यांच्या मोबदला कांहीं केलें तरी त्यांची फेड होणारच नाहीं. एखाद वेळ मला असें देखील वाटतें कीं तुमचीं सत्कृत्यें झालीं त्याच्यापेक्षां कमी झालीं असतीं, तर फार बरें झालें असतें. कारण मग तुमचे आभार मानणें आणि तुम्हांला बक्षीस देणें ह्या गोष्टी मला सहज करतां आल्या असत्या. सध्यां अं[illegible] सगळ्या जणांना जें देतां येईल त्याच्यापेक्षां शतपटीनें आपल्याला आम्ही अधि[illegible] पाहिजे होतें, हे शब्द मात्र माझ्यापाशीं आपल्याला द्यायला आ[illegible]

**मानाजीराव**—सेवा आणि राजनिष्ठा हा माझा धर्मच आहे. आणि तो मी पाळला म्हणजे यांतच माझें बक्षीस मला मिळालें. आपली गादी, आपलें राज्य, आपलीं मुलें, आणि आपले अधिकारी, यांची चाकरी आमच्या हातून करून घेणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे. आपली प्रीति

आणि मान हीं राखण्याकरितां आम्ही जें जें कांहीं करतों तें सर्व आम्ही करायला पाहिजेच असतें.

**दमाजी**—फार उत्तम आहे. आपल्या उपकाराचें बीज मीं आपल्या हृदयांत पेरलें आहे. आणि त्याचा अंकुर चांगला वाढून उत्कर्षास यावा अशी मी नेहमीं खटपट करीन.—व्यंकोजीराव, तुम्हींही मानाजीरावासारखीच फार मोठी कामगिरी बजाविली आहे. आणि त्यांच्याप्रमाणेंच तुम्हीही स्तुतीला पात्र आहां.

**व्यंकोजीराव**—माझ्यावर आपली इतकी प्रीति असली, म्हणजे मग माझ्या हातून असलीं कामें होण्याला काय हरकत आहे !

**दमाजी**—मला हल्लीं इतका कांहीं पराकाष्ठेचा हर्ष होत आहे कीं त्यामुळें माझे नेत्र अश्रूंनीं भरून आले आहेत.—माझे मुलगे, माझे बंधु, माझ्या पदरचे सरदार, आणि जे जे कोणी माझ्या प्रीतींतले लोक आहेत, त्यांना माझी अशी विनंति आहे कीं माझ्या पश्चात् माझें राज्य माझा वडील पुत्र मल्हारराव ह्याला देण्याचा माझा इरादा आहे. म्हणून त्याला आजपासून युवराज ही पदवी मी दिली आहे. पण ही पदवी देऊन त्याला एकट्यालाच संतोषित करावें असें माझ्या मनांत मुळींच नाहीं. तर सरदारीच्या वगैरे दुसऱ्या पदव्या जे जे कोणी सन्मानाला पात्र असतील त्यांनाही द्यावयाच्या माझ्या मनांतून आहेत. तेव्हां आतां आपण येथून तुमच्या इंद्रापुराला जाऊं या आणि मग तेथेंच हा पदव्या देण्याचा समारंभ करूं.

**मानाजीराव**—महाराज, ह्याच्या पुढील व्यवस्था करायची हें श्रमाचें काम आहे व तें करणें आपल्याला योग्य नाहीं. म्हणून मी ती सर्व व्यवस्था करण्याकरितां पुढें जातों. सरकारस्वारी आमच्या घरीं येणार हें ऐकून माझ्या पत्नीला किती तरी आनंद होईल ! मी आपली रजा घेतों.

**दमाजी**—ठीक आहे. ( **मानाजीरावा**शिवाय सर्व जातात. )

**मानाजीराव**—काय ! त्यानें आपल्या मुलाला युवराज केलें ! ही एक माझ्या वाटेंत धोंडच येऊन पडली. हिच्यावरून उडी मारून गेलें पाहिजे. नाहीं तर घडघडत खालीं पडावें लागणार.—हे ताऱ्यांनों, तुम्ही आपलें तेज कांहीं वेळ झांकून ठेवा. माझ्या मनांत अगदीं खोल खोल असलेली

अतिशय अधमपणाची इच्छा प्रकाशाच्या देखील दृष्टीस पडतां कामा नये. आणि तें काम या हातानें घडून येत असतां या डोळ्यांनीं त्याच्याकडे किलकिल्या दृष्टीनें देखील पहातां उपयोगी नाहीं. पण जें कृत्य घडून आलें असतां त्याच्याकडे पाहण्याची डोळ्यांना देखील भीति वाटेल, तें कसेंही करून झालेंच पाहिजे. (जातो.)

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—इंद्रपूर. मानाजीरावाच्या किल्ल्यांतील एक दिवाणखाना

( मानाजीरावाची स्त्री दर्याबाई पत्र वाचीत प्रवेश करते. )

**दर्याबाई**—" ज्या दिवशीं मला जय मिळाला त्याच दिवशीं त्या मला भेटल्या आणि मी पुरी चौकशी केल्यावरून मला असें कळून आलें आहे कीं त्यांना मनुष्यापेक्षां कांहीं तरी अधिक ज्ञान आहे. आणखी कांहीं प्रश्न विचारण्याचें माझ्या मनांतून फार होतें. पण त्या एकाएकीं हवेंत नाहींशा झाल्या. पुढें त्या आश्चर्यकारक स्थितीचा विचार करण्यांत मी कांहीं वेळ गर्क झालों होतों, इतक्यांत राजाकडून कांहीं गृहस्थ आले आणि 'कठोपूरच्या ठाकूर साहेबांचा जयजयकार असो!' असें त्यांनीं मल म्हटलें. आणि हाच किताब मला प्राप्त होईल असें थोड्या वेळापूर्वी त्या चेटक्यांनीं मला आश्वासन दिलें होतें. आणि कांहीं काळानें तूं राजा होशील, असेंही त्यांनीं भविष्य सांगितलें आहे. माझ्या भाग्याची तूं वांटेकरीण असल्यामुळें ही गोष्ट तुला कळविणें अवश्य आहे असें मला वाटलें. मी असें केलें नसतें तर तुझ्या कपाळीं केवढें सुख लिहिलेलें आहे हें न कळल्यामुळें तुला आनंदसुखाचा अनुभव घेतां आला नसता. [illegible]न, मीं, तुला कळविलें आहे. ह्याचा नीट विचार कर. कळावें. " माणिक[illegible] जहागिरदार आणि कठोरपूरचे ठाकूर तर हे झालेच. आणि बहुतक[illegible]पुढें जें भाकित आहे त्याप्रमाणें तिकडे राज्यपदही मिळेल. तरी पण मला तिकडच्या स्वभावाचा भरंवसा येत नाहीं. त्यांच्या अंतःकरणाला दयेचा पाझर तेव्हांच फुटतो. त्यामुळें असलें काम साधण्याला जी अतिशय जवळची वाट असते,

तिनें जाण्याचें धैर्य यांना व्हायचें नाहीं. ह्यांना मोठें व्हायला पाहिजे. महत्त्वाकांक्षा नाहीं असें नाहीं. पण त्यांतला वाईटपणा तेवढा नको. ह्यांना मोठेपणा तर मिळवायला पाहिजे, पण पापाला तेवढें भ्यायचें. ह्यांना लबाडी लचाडी तर करायला नको, आणि लोकांचें राज्य तेवढें मात्र बळकवायला पाहिजे. ह्यांना जें राज्यपद हवें आहे तें स्पष्ट असें सांगतें आहे कीं, 'मी जर तुम्हांला पाहिजे असेन, तर तुम्ही असें असें केलें पाहिजे!' आणि तें तसें घडून येऊं नये अशी कांहीं तिकडची इच्छा नसेल. पण तें करण्याचें धारिष्ट यांच्या अंगीं मुळींच नाहीं. बरें, त्यांना घरीं येऊं द्या. म्हणजे मग दैवाच्या आणि त्या पिशाचांच्या मनांतून जो सुवर्णमय मुकुट त्यांच्या मस्तकावर विराजमान व्हावा असें आहे त्याला आड येणारे जे कांहीं भागूबाईपणाचे विचार तिकडे मनांत असतील, ते सगळे मी आपल्या उपदेशानें घालवून टाकीन, तरच नांवाची दर्याबाई होईन. (एक चाकर प्रवेश करितो.) काय रे बातमी आहे?

**चाकर**—राजेसाहेबांची स्वारी आज येथें येणार आहे.

**दर्याबाई**—तुला वेडबिड तर लागलें नाहीं? अरे, तुझे धनी राजेसाहेबांबरोबर नाहींत का? आणि तूं म्हणतोस तसें असतें तर त्यांनीं पुढील व्यवस्थेसाठीं आपल्याला कळविलें नसतें का?

**चाकर**—बाईसाहेब, मी म्हणतों तें अगदीं खरें आहे. आपले धनीसाहेबही पुढें येतच आहेत. पण माझ्या सोबत्यांपैकीं एकजण धनीसाहेबांच्या पुढें धांवत धांवत आला, त्यानें मला ही बातमी सांगितली. तो धांवून धांवून इतका दमून गेला होता कीं हा निरोप माझ्यापाशीं सांगण्याची देखील त्याला मोठी मारामार पडली.

**दर्याबाई**—बरें तर त्यानें हीं मोठी चांगली बातमी आणिली आहे. [illegible] आणि त्याची नीट व्यवस्था ठेव. (चाकर जातो.) आज [illegible] महाराज आमच्या किल्ल्यांत येणार. अशा वेळीं हें घुबड ओरडत आहे. अगदीं कर्कश ओरडत आहे. खास, हा कांहीं त्यांना शुभ शकुन नाहीं.—अहो तुम्ही दुष्ट विचारांवर अम्मल चालविणाऱ्या देवतांनों, मी स्त्री आहें, पण मला या प्रसंगीं तुम्ही पुरुषाचें धैर्य द्या; आणि माझ्या पायाच्या नखापासून तों डोक्याच्या केसापर्यंत सर्व अंगांत भयंकर क्रूरपणाचा

ओतप्रोत संचार होऊं द्या; आणि माझ्या मनांतील पश्चात्तापाचे सर्व दरवाजे बंद होण्यासाठीं शरीरांतील माझें सगळें रक्त गोठवून टाका; आणि हें बरें आहे कीं वाईट आहे, करूं कीं नको करूं, असल्या विचारांनीं माझ्या मनांतील हेतु तिळमात्रही डळमळूं देऊं नका! अरे, तुम्ही खुनाला उत्तेजन देणाऱ्या पिशाचांनों, तुम्ही उपद्रव देण्याच्या कामांत कोठेंही गुंतला असलां तरी तेथून अदृश्य रूपानें झटकन् या आणि माझ्या हृदयांत जी कांहीं दयामाया असेल ती चट सारी जाळून खाक करा! हे निबिड-तमोमय रात्रि, ये, तूंही ये, आणि अंधकूप नरकांतील घनदाट काळोख बरोबर आणून आपला अंधकार काळाकभिन्न कर. आणि माझा खंजीर त्याच्या शरीरांत जी जखम करील ती त्या खंजिराला देखील दिसूं देऊं नको! तसेंच हे आकाशांतील तारे माझें हें कृत्य पाहून मध्येंच 'नको, नको' म्हणून ओरडतील, म्हणून तुझ्या ढगाच्या आवरणांतून त्यांना डोकावूं देखील देऊं नको! ( **मानाजीराव** येतो. ) यायचें कठोरपूरचे ठाकूर साहेब! आणि त्या भविष्यवादाप्रमाणें लवकरच ह्याहीपेक्षां मोठ्या पदवीला चढायचेंना? आपलें पत्र वाचून मला इतका कांहीं आनंद झाला आहे कीं त्यामुळें मी आपली सध्यांची स्थिति अगदीं विसरून गेलें आहे, आणि पुढें प्राप्त होणारें तें वैभव आतांच मिळालें आहे असें मला वाटूं लागलें आहे.

**मानाजीराव**—दमाजी महाराज आज रात्रीं येथें येणार आहेत.

**दर्याबाई**—आणि येथून जाणार केव्हां?

**मानाजीराव**—उद्यां जायचा त्यांचा बेत आहे.

**दर्याबाई**—उद्यां! तो उद्यांचा दिवस कधींही उगवायचा नाहीं!—पण, हें पहा आपला चेहेराच असा आहे कीं त्यावरून आपल्या मनांतले विचार दुसऱ्याला तेव्हांच ओळखूं येतात. म्हणून म्हणतें, वेळ मारून नेण्या-साठीं वेळ पडेल तशी मुद्रा धारण करायची. तुमच्या डोळ्यांत, हा[illegible] कृतींत, आणि गोड गोड भाषणांत आदरातिथ्य पूर्ण भरलेलें आहे असें दाखवायचें. बाह्यात्कारी फुलाप्रमाणें रमणीय दिसावें, पण अंतर्यामीं त्या फुलाखालीं दडून बसलेल्या सापाप्रमाणें असावें. आज रात्रीं आपल्याकडे जो पाहुणा यायचा आहे, त्याची नीट तजवीज लाविली पाहिजे. तेव्हां ही

आजच्या रात्रीची महत्त्वाची कामगिरी आपण माझ्याकडे सोंपवावी. आजच्या रात्रीची कामगिरी फत्ते झाली, म्हणजे पुढें येणाऱ्या सर्व रात्री आणि दिवस ह्यांमध्यें आपल्याला राज्यसुखाचा अनुभव घ्यायला सांपडेल.

**मानाजीराव**—ह्याविषयीं मग आपण बोलूं.

**दर्याबाई**—कांहीं हरकत नाहीं. पण चेहऱ्यांत मात्र चलबिचल होऊं देऊं नका. चेहऱ्यांत फरक पडला कीं, मनांत भीति उत्पन्न झाली आहे असें लोक सहज ताडतात. ह्मणून एवढ्याबद्दल सावधगिरी ठेवा आणि मग बाकीचें काम माझ्याकडे खुशाल सोंपवा. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ६ वा.

स्थळ—इंद्रपुरच्या किल्ल्यासमोरील मैदान.

( **दमाजी, मल्हारराव, धनाजी, व्यंकोजीराव, लक्ष्मणसिंग, मुकुंदराव, राणोजी, अंग्रे,** आणि त्यांचे हुजरे प्रवेश करतात.)

**दमाजी**—ह्या किल्याचें ठिकाण मोठें रमणीय आहे. आणि येथील हा मंजुळ आणि मधुर वारा शरीराला किती तरी आनंद देत आहे !

**व्यंकोजीराव**—या वसंत ऋतूंत चोहोंकडेच गार वारा असतो, पण हें ठिकाण उंचावर असल्यामुळें येथें वाऱ्याची विशेष मजा आहे खरी.

(दर्याबाई प्रवेश करते.)

**दमाजी**—या पहा दर्याबाईसाहेब आल्या.-या ! या ! आज आम्ही तुमच्याकडे पाहुणे आलों आहोंत. आमच्या येण्यानें तुम्हांला थोडी तसदी पडेल हें खरें. पण आम्हांला ठाउक आहे कीं, तुह्मांला ती तसदीशी वाटणार नाहीं.

**दर्याबाई**—आम्हांला महाराजांनीं जे मोठमोठे किताब दिले त्यांच्याशीं तुलना करून पाहिलें असता आम्ही जी करीत आहों त्याच्या चौपटीनें आपली सेवा केली तरी ती त्यांच्या पासंगाला देखील पुरणार नाहीं. आपण पूर्वी आणि आतां आम्हांला ज्या पदव्या दिल्या, त्या सर्वांबद्दल आह्मी परमेश्वराजवळ नेहमीं आपलें कल्याण चिंतूं.

**दमाजी**—ठाकुरसाहेब कुठे आहेत ? आह्मी अगदीं त्यांच्या पाठोपाठ

निघालों व त्यांच्या आधीं येण्याचा आमचा बेत होता. पण ते पडले घोड्यावर बसणारे मोठे बांके; आणि पुनः घरीं येण्याचा ओढा. त्यामुळें ते आमच्या आधीं येऊन पोहोंचले असतील. दर्याबाई, आज रात्रींचा आमचा मुक्काम येथेंच आहे.

**दर्याबाई**---आम्ही आपले चाकर आहों आणि आमचें म्हणून जें जें कांहीं आहे तें सर्व आपलेंच आहे.

**दमाजी**---बरें आहे. चला आतां आपले यजमान ठाकुरसाहेब यांची गांठ घेऊं या. त्यांच्यावर आमची मर्जी फार बहाल आहे. आणि आमची मेहरबानी त्यांजवर अशीच नेहमीं कायम राहील. चला, दर्याबाई, चला.

(सर्व जातात.)

---

## प्रवेश ७ वा

**स्थळ**--इंद्रपुरच्या किल्ल्यांतील एक दिवाणखाना.

(कित्येक चाकर लोक जेवणाचें सामान व ताटें वगैरे घेऊन इकडून तिकडे जातात व नंतर **मानाजीराव** प्रवेश करितो.)

**मानाजीराव**---हें काम केलें म्हणजे सगळें आटपलें असें जर असेल, तर तें झटकन उरकून टाकावें हें बरें. जर हा खून केल्याचा कांहीं बोभाटा झाला नाहीं आणि ह्या राजाला मारल्याच्या योगानें आपला डाव साधला, जर ह्या शस्त्रप्रहाराचा मागमूस न लागतां माझ्या मनासारख्या सगळ्या गोष्टी जुळून आल्या, तर ह्या मृत्युलोकांत असूनही मला स्वर्गलोकांतील सुख मिळेल यांत संशय नाहीं. पण असल्या कामांत नेहमीं पापाचें प्रायश्चित्त येथल्या येथेंच मिळाल्यावांचून रहात नाहीं. आपण खुनाचें काम करावें, पण केल्याबरोबर लागलाच तो करणाऱ्याच्या बोकांडीस बसतो. आपण दुसऱ्यासाठीं म्हणून विषाचा पेला तयार करतों; पण खोट्याच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव घालणारी ती न्यायदेवता तो पेला आपल्याच घशांत ओतते.---महाराज तर अगदीं बेफिकीरपणानें येथें आले आहेत. कारण कीं मी पडलों त्यांचा जवळचा नातलग आणि

विश्वासू सेवक. आणि ह्या दोन्ही नात्यांनीं पाहिलें, तर अशी गोष्ट करणें अगदीं गैर आहे. दुसरें कारण असें कीं, माझ्या घरीं तो आज पाहुणा म्हणून आला आहे. त्याचा गळा कापायला जर दुसरा कोणी येऊं लागेल, तर त्याला प्रतिबंध करणें हें माझें काम. तें सोडून मीच जर हातांत सुरा धरून त्याचे प्राण घेऊं लागलों, तर तें कसें बरें ठीक दिसेल! शिवाय हा दमाजी लोकांपाशीं फार नम्रपणानें वागलेला आहे. आणि ह्याचा राज्यकारभार अगदीं चोख आहे. तेव्हां याचा खून करण्याचें जर कोणी अघोर पातक करील, तर त्याच्याविषयीं दमाजीचे सद्गुण लोकांचीं मनें अगदीं खवळून टाकतील; आणि मग नुकत्याच जन्मलेल्या आणि वस्त्रहीन अशा तान्ह्या मुलाच्याप्रमाणें सर्वांना त्याची दया आल्यावांचून राहणार नाहीं. मग तें दयेचें वारें हूं हूं म्हणतां प्रत्येकाच्या डोळ्यापुढें हें भयंकर कर्म अशा रीतीनें आणून ठेवील कीं, त्या डोळ्यांतून शतावधि अश्रुधारा गळल्यावांचून राहणार नाहींत. मला जबरदस्त महत्त्वाकांक्षा मात्र आहे. त्यामुळें अशा गोष्टी करण्याची इच्छा होते. पण ती शेवटास नेण्याचें सामर्थ्य माझ्या अंगात मुळींच नाहीं.—( दर्याबाई येते. ) कां! कसें काय चाललें आहे?

दर्याबाई—त्यांचें जेवण बहुतेक आटपलें. पण तुम्ही तेथून इकडे कां आलां?

मानाजीराव—त्यांनीं माझी चौकशी केली कीं काय?

दर्याबाई—हो, हो, केली तर! त्यांनीं केली आपली चौकशी. आपल्याला माहीत नाहीं वाटतें?

मानाजीराव—हा बेत आतां इतकाच राहूं दे. कारण महाराजांनीं मला अलीकडे बराच मान दिलेला आहे. आणि चोहोंकडे सर्व लोक मला नांवाजताहेत. तेव्हां त्या नांवालौकिकासारखी मला कृति केली पाहिजे. असल्या नीच कृत्यांनीं त्याला काळिमा लावणें बरोबर नाहीं.

दर्याबाई—इतके दिवस ज्या आशेनें तुमच्या मनावर पगडा बसविला होता, ती काय तर मग सारी वेडगळपणाचीच होती! ती इच्छा तुमच्या मनांत आल्याला आज इतके दिवस झाले तोंपर्यंत आपण काय निजलां होतां? आणि आतां कशानें जागे झालां? इतके दिवस मनांत हे विचार एकसारखे घोळत होते आणि आतांच तुम्ही इतके गर्भगळित कशानें झालां! माझ्यावरची तुमची प्रीति देखील तर मग अशीच लटपटीत असली पाहिजे, असें आजपासून उघड

झालें. ज्याप्रमाणें तुमच्या मनांत इच्छा असेल, त्याप्रमाणें ती हातानें घडवून आणण्याची तुह्मांला भीति वाटते ! सगळ्या जन्माचें भूषण ज्याला तुम्ही मानतां, तें राज्यपद मात्र तुम्हांला पाहिजे. पण मी वीरश्रीचें काम करीन, असें तुम्हांला वाटत नाहीं हें कसें? इच्छा असायची आणि हातून कृति मात्र घडायची नाहीं, हें अगदीं वाईट.

**मानाजीराव**—ऐक. मानवी प्राण्याला शोभेल असें कोणतेंही कृत्य करण्याचें धारिष्ट मला आहे. पण त्याच्यापेक्षां पलीकडचें कर्म जो करतो, तो माणुसच नव्हे.

**दर्याबाई**—तर मग ज्यानें हें अघोर कृत्य करण्याची गोष्ट माझ्यापाशीं काढली, तो कोण पशु होता वाटतें ! जेव्हां ती गोष्ट करण्याचें धारिष्ट तुमच्या मनांत होतें, तेव्हां तुम्हीं माणुस होतां खरे. आपली आहे त्यापेक्षां ज्यास्त योग्यता वाढविण्याकरितां पुरुषाला योग्य असें कांहीं अघटित कृत्य करण्याला तुम्ही तयार झालां होतां. तेव्हां हें कृत्य केव्हां करावें आणि कोठ करावें ह्याचा तुम्हांला कांहीं अंदाज नव्हता. तरी पण वेळ आणि स्थळ हीं आपण जुळवून आणूं, असें तुम्हांला वाटत होतें. आतां वेळ आणि स्थळ हीं आपोआप जुळून आलीं आहेत. आणि ही योग्य संधि जुळून आलेली असतां आतां तुम्ही असे हातपाय गाळतां ! मी लहान मुलांना अंगावर पाजिलें आहे, आणि तान्ह्या मुलाला पाजतांना प्रेमाचा पान्हा कसा फुटतो हेंही पण मला ठाऊक आहे. पण मी जर तुमच्यासारखी शपथ वाहिली असती, तर तेंच तान्हें बाळ माझ्याकडे पाहून हसत हसत पीत असतांना देखील त्याच्या त्या कोंवळ्या लुसलुशीत ओठांतून मी आपला स्तन हिसकावून घेऊन त्या कारट्याला दगडावर आपटून त्याच्या टाळक्याचे तुकडे तुकडे केले असते.

**मानाजीराव**—बरें, पण आपला बेत फसला तर ?

**दर्याबाई**—फसला तर ! मनांत धैर्य मात्र धरा. आणि मग मी तुम्हांला खात्रीनें सांगतें कीं, आपला बेत फसायचाच नाहीं. दमाजी आज साऱ्या दिवसाचा दमून भागून आलेला आहे. त्यामुळें त्याला लवकर गाढ झोंप लागेल. आतां त्याच्या महालांतील दोन हुजरे राहिले. पण त्यांना मी इतकी कांहीं दारू पाजीन कीं, त्यामुळें त्यांच्या डोक्यांत पहारा करणाऱ्या त्या

स्मरणशक्तीचा मागमूसही राहणार नाहीं आणि त्यांची सारी अक्कल गुंग होऊन जाईल. आणि अशा रीतीनें दारू पिऊन ते अजगरासारखे घोरत पडले, ते जिवंत आहेत कीं मेले आहेत अशी त्यांची अवस्था झाली, म्हणजे मग त्या दमाजीची तुम्ही आणि मी मिळून हवी तशी वाट लावून टाकूं, आणि आपण केलेल्या खुनाचा आरोप त्याच्याच चाकरमाणसांवर घालूं, म्हणजे झालें !

**मानाजीराव**—तुझ्या पोटीं पुरुषच जन्माला आले पाहिजेत. कारण कीं हें जें तुझें प्रसंगीं न ढळणारें धैर्य आहे त्यापासून पुरुषाचीच उत्पत्ति झाली पाहिजे.—बरें, त्याच्या खोलींत निजणाऱ्या त्या दोघां हुजऱ्यांच्या तरवारी घेऊनच जर आपण त्याचा गळा चिरला आणि त्या हुजऱ्यांच्या अंगाला रक्त फासून ठेविलें, तर मग त्यांनींच हें काम केलें असें लोक म्हणणार नाहींत का ?

**दर्याबाई**—लोकांना त्यावांचून दुसरी कल्पनाच करतां येणार नाहीं. कारण आपण त्याच्या मरणासाठीं ओकसाबोकशी रडून आकांत करून सोडूं म्हणजे झालें.

**मानाजीराव**—ठीक. झाला माझ्या मनाचा निश्चय. माझ्या शरीरांतील प्रत्येक शक्तीचा उपयोग ह्या भयंकर कर्माकडे केल्यावांचून आतां मी राहणार नाहीं. चला, आतां आपण जाऊं या. आणि मध्यंतरींच्या वेळांत आपली मुद्रा तिळमात्रही बदलूं देतां कामा नये. ह्या खोटसाळ अंतःकरणांत जी वाटाघाट चालली आहे, ती खोटसाळ मुद्रा धारण करूनच छपवून ठेविली पाहिजे. ( सर्व जातात. )

**पहिला अंक समाप्त.**

---

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—इंद्रपुर. मानाजीरावाच्या किल्ल्यांतील एक पटांगण.

(**व्यंकोजीराव** व त्याचा मुलगा **गुलाब** हातात दिवा घेऊन प्रवेश करितात.)

**व्यंकोजीराव**—बाळा, किती रात्र झाली रे !

**गुलाब**—चंद्र मावळून गेला. पण मी किती वाजले तें ऐकिलें नाहीं..

**व्यंकोजीराव**—आज चंद्र मध्यान रात्रीं मावळायचा.

**गुलाब**—पण मला वाटतें, बाबा, मध्य रात्र उलटून गेली असावी.

**व्यंकोजीराव**—थांब.—ही माझी तरवार जरा तूं घे पाहूं. देवाच्या घरीं देखील काटकसर आहे. कारण, पहा कीं, आकाशांतील सर्व दिवे, म्हणजे हीं नक्षत्रें, बहुतेक दिसेनाशीं झालीं. माझ्या डोळ्यावर झोपेची झांपड आली आहे. तरी पण निजावेंसें वाटत नाहीं. देवा, एकांतांत असतांना मनांत जे कुविचार येतात, त्यांना तूं नाहींसे कर.—दे ती तरवार माझ्या हातांत. कोण आहे तें तिकडे !

(**मानाजीराव** आणि त्याचा एक चाकर हातांत दिवा घेऊन प्रवेश करतात. )

**मानाजीराव**—आपला स्नेही.

**व्यंकोजीराव**—काय ? अजून तुम्ही निजलां नाहीं ? आपले राजेसाहेब तर केव्हांच झोपीं गेले. आज त्यांची तब्बेत अगदीं खुष झाली. आणि त्यांनीं तुमच्या चाकर माणसांना त्यामुळें पुष्कळ इनाम दिलें. आपल्या कुटुंबा-कडून त्यांची चांगली बरदास्त ठेवण्यांत आली; म्हणून त्यांनीं हा हिरा त्यांना बक्षीस दिला आहे. आजच्या त्यांच्या आनंदाला पारावारच नाहीं.

**मानाजीराव**—पूर्वीपासून तयारी नव्हती, म्हणून आमच्या मर्जीप्रमाणें रहावा तसा बातबेत राहिला नाहीं. जर योग्य फुरसत सांपडती, तर मना-सारखी तरतूद ठेवतां आली असती.

व्यंकोजीराव—छे, छे ! झाला तो बेत उत्तम झाला. पण मला काल रात्रीं स्वप्नांत त्या तीन चेटक्या दिसल्या. त्यांनीं तुम्हांला सांगितलेलें भविष्य तर कांहीं अंशीं खरें झालें.

मानाजीराव—मी त्याचा विचार सुद्धां करीत नाहीं. तरी पण तुम्हांला जेव्हां घटकाभर फुरसत असेल, तेव्हां ह्याबद्दल तुमच्या परवानगीनें माझ्या मनांतून चार शब्द बोलायचे आहेत.

व्यंकोजीराव—तुम्हांला जेव्हां फुरसत असेल, तेव्हां माझ्याकडून तयारी आहे.

मानाजीराव—तुम्ही माझ्या मर्जीवर ही गोष्ट ठेवतां, हा तुमचा मोठेपणा आहे.

व्यंकोजीराव—नवीन मोठेपणा संपादन करतांना पाहिला नाहींसा होऊं नये आणि माझें मन निर्मळ रहावें आणि माझी राजनिष्ठा अबाधित असावी, अशी माझी फार इच्छा आहे. म्हणून मला या कामांत आपला सल्ला घेतलाच पाहिजे आहे.

मानाजीराव—ठीक आहे, आतां तुम्हांला स्वस्थ झोंप लागू द्या.

व्यंकोजीराव—ह्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. तुम्हीही आतां जाऊन निजाच.

( व्यंकोजीराव आणि गुलाब जातात. )

मानाजीराव—माझें प्यायचें दूध तयार झालें कीं मला कळवायला तिला सांगून तूं निजायला जा. ( चाकर जातो. ) माझ्या पुढें हें काय बरें दिसत आहे ? ही कट्यार आहे काय ? हिची मूठ माझ्या हाताकडे वळलेली दिसते आहे. बरें, हातांत घेऊन पाहूं या. चल ये माझ्या हातांत. काय ! हाताला लागत नाहींस ! पण दृष्टीला तर दिसतेस. अरे घातुक आणि मायावी शस्त्रा, ज्याप्रमाणें तूं दृष्टीला गोचर आहेस, त्याप्रमाणें तूं स्पर्शाला गोचर नाहींस काय ? किंवा तूं केवळ कल्पनामयच आहेस ? अथवा भयंकर विचारांनीं भणभणलेल्या या मस्तकांतून निघालेली खोटी सृष्टि तर तूं नाहींसना ? पण माझ्या हातांतल्या या नागव्या कट्यारीप्रमाणें तूं हुबेहुब दिसते आहेस. हें काम करण्याकरितां मी ज्या मार्गाचें अवलंबन करणार होतों, तोच मार्ग तूं मला दाखवीत आहेस. मी असल्याच शस्त्राचा उपयोग

करणार होतों.—इतर सर्व इंद्रियांनीं माझ्या डोळ्यांला मूर्ख बनविण्याचा विचार केला आहे, किंवा डोळेच सर्व इंद्रियांचें काम करीत आहेत!—अजून तूं मला दिसते आहेस, आणि तुझ्या धारेवर रक्ताचे डाग पडलेले दिसताहेत. हे पूर्वी येथें नव्हते.—छे नव्हे! ही येथें दिसणारी कट्यार मिथ्याच असली पाहिजे. माझ्या मनांतलें अघोर कर्मच हा भास उत्पन्न करीत आहे.—या वेळीं अर्ध्या सृष्टीचा प्रळय झाला आहे. आणि ऐषआरामांत पलंगावर झोंपी गेलेल्या लोकांना देखील भलतीं सलतीं स्वप्नें पडत आहेत. पंचाक्षरी, देवऋषि, चेटक्या आपल्या इष्टदेवता आणि भूतेंखेतें यांची आराधना करण्यांत गुंतलेल्या आहेत. खून करण्याला प्रवृत्त झालेले मनुष्य आपला बेत सिद्धीस नेण्याकरितां लपत छपत चालले आहेत.—हे अचल धरित्री माते, माझीं पावलें कोणीकडच्या वाटेनें जात आहेत हें सुद्धां तूं ऐकूं नकोस. कारण तुझ्या पृष्ठभागावरील हे पाषाण देखील मी कोठें जात आहें व काय करीत आहें हें सर्व बडबडायला लागतील. आणि त्या योगानें शांत वेळीं भयंकर कृत्य करण्यापासून उत्पन्न होणाऱ्या भयानक रसाचा भंग होईल.—पण माझ्या नुसत्या वलगना चालल्या आहेत आणि तो अजून जिवंत आहे. काम करण्याच्या उमेदीला फार बडबडण्यानें विरजण पडतें. ( डंका वाजतो. ) हा मी जातों आणि एका क्षणांत तें उरकून टाकतों. हा जो डंका वाजला, तो मला हें काम करायला चल म्हणून बोलवीत आहे. दमाजी, तूं हा ऐकूं नकोस. कारण, ह्मा तुला स्वर्गाला किंवा नरकाला पोंचवीत आहे. ( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

स्थल—पूर्वीचेंच.

( दर्याबाई प्रवेश करिते. )

**दर्याबाई**—ज्यानें त्यांना बेशुद्ध केलें, त्यानेंच मला धारिष्ठ आणून दिलें आहे. कसला बरें हा आवाज ?—हा त्या घुबडाचा कर्कश आवाज आहे. ह्मा वेळीं स्वारी तें काम करण्याच्या अगदीं बेतांत असेल. दरवाजे अगदीं



दर्याबाई:—घात झाला ! मला वाटतें, ते जागे झाले, आणि काम कांहीं शेवटास गेलें नाहीं !

अंक २, प्रवेश २ ( पृष्ठ २९ ).

उघडे आहेत आणि ते त्याचे चाकर जागण्याची कामगिरी घोरूनच करीत आहेत. मी त्यांच्या दारूमध्यें कांहीं वनस्पतीचें मिश्रण करून दिलें आहे. त्याच्या योगानें ते इतके गुंगले आहेत कीं ते जिवंत आहेत कीं मेले आहेत हें देखील समजत नाहीं.

**मानाजीराव**—( आंतून ) कोण आहे तिकडे ?

**दर्याबाई**—घात झाला ! मला वाटतें ते जागे झाले, आणि काम कांहीं शेवटास गेलें नाहीं. ह्या कृत्याच्या दुष्टपणामुळें माझें मन गोंधळलें नाहीं. पण हें कसें पार पडेल ह्या चिंतेनें माझा गोंधळ झाला आहे.—थांबा. मी त्यांच्या कट्यारी अगदीं तयार करून ठेविल्या होत्या. त्या त्यांना सांपडल्याच असतील.—तो निजला असतां माझ्या बाबांसारखा दिसला नसता, तर मीच तें काम उरकलें असतें. काय ! तेच इकडे आले !

( **मानाजीराव** येतो. )

**मानाजीराव**—मी तें काम तर पार पाडलें.—पण तूं मधें कांहीं गलबला ऐकिला नाहींस काय ?

**दर्याबाई**—होय; घुबड ओरडत होतें आणि रात्र किर्र शब्द करीत होती, तें मी ऐकिलें. तुम्ही मधें कांहीं शब्द बोललां ना ?

**मानाजीराव**—केव्हां ?

**दर्याबाई**—आतां.

**मानाजीराव**—आतां मी खालीं आलों तेव्हां ?

**दर्याबाई**—होय.

**मानाजीराव**—ऐक ! त्या दुसऱ्या खोलींत कोण निजलें आहे ?

**दर्याबाई**—धनाजीराव.

**मानाजीराव**—( हातांकडे पाहून ) काय भयंकर देखावा हा !

**दर्याबाई**—असें म्हणणें मूर्खपणाचें काम आहे.

**मानाजीराव**—तेथें कोणसा निजला होता. तो झोपेंतच हसूं लागला, आणि दुसरा एकजण निजला होता तो झोपेंत "खून खून" असें बडबडूं लागला. मग दोघांनीं एकमेकांना जागें केलें. मी मुकाट्यानें उभा राहून ऐकत होतों. त्यांनीं दुष्टस्वप्ननिरसनार्थ एक स्तोत्र म्हटलें आणि फिरून ते निजले.

दर्याबाई—अहाहा ! अहो, ते निजले तर मग त्यांना भ्यायचें काय कारण आहे !

मानाजीराव—स्वप्नांत त्यांनीं मला ह्या हातांनीं खून करतांना पाहिलें. म्हणून त्यांतील एकानें देवाचें स्मरण करून म्हटलें, " दुःस्वप्नं विलयं नीत्वा शोभनं कुरु केशव. " तें ऐकून दुसऱ्यानेंही " तथास्तु " असें म्हटलें. म्हणून माझ्याही मनांतून देवापाशीं " तथास्तु " म्हणून प्रार्थना करायची होती. पण माझ्यानें ती करवेना.

दर्याबाई—त्याचा एवढा विचार कशाला पाहिजे ?

मानाजीराव—पण मला 'तथास्तु' अशी प्रार्थना देवापाशीं करण्याचें धारिष्ठ कां होऊं नये ! मला ईश्वराच्या कृपेची त्या वेळीं फार अवश्यकता होती.

दर्याबाई—असल्या कामाचा अशा रीतीनें विचार करणें चांगलें नाहीं. अशानें आपल्याला वेड देखील लागेल.

मानाजीराव—'आतां याच्यापुढें झोंपेचें नांव नको ! मानाजीराव झोंपेचा खून करीत आहे !' अशी ओरड ऐकल्याचा मला एकदा भास झाला.

दर्याबाई—ह्या तुमच्या बडबडण्याचा अर्थ तरी काय ?

मानाजीराव—किल्ल्यांतील सगळ्या मनुष्यांना ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें 'आतां झोंप नाहींशी झाली !' असा शब्द ऐकूं येत होता. आणखी असाही शब्द झाला कीं, 'माणिकपुरच्या जहागिरदारानें झोंपेचा खून केला, म्हणून कठोरपुरच्या ठाकुराला झोंप मिळणार नाहीं ! मानाजीरावाला झोंप मिळणार नाहीं !'

दर्याबाई—असें कोण तेथें म्हणायला आलें होतें ? अहो, असा भ्रमिष्टासारखा विचार करीत बसून तुम्ही आपल्या धैर्याचें पाणी करीत आहां. जा, थोडें पाणी घ्या. आणि तुमच्या हातावर ज्या ह्या घाणेरड्या मुद्याच्या खुणा आहेत त्या धुऊन टाका. ह्या कट्यारी तुम्ही तेथून येथें कशाला आणल्या ? त्या तेथेंच ठेवायला पाहिजे होत्या. जा, ह्याही बरोबर घेऊन जा. आणि त्याचे हुजरे तेथें निजले आहेत, त्यांच्या अंगाला चांगलें रक्त फांसा.

मानाजीराव—मी फिरून तिकडे पाऊल सुद्धां टाकणार नाहीं ! कृत-

कर्मांचा विचार सुद्धां नको असें मला झालें आहे. त्याकडे पाहण्याचें देखील मला आतां धैर्य उरलें नाहीं.

**दर्याबाई**—अहाहा ! काय पण शूरपणा ! द्या त्या कट्यारी माझ्यापाशीं. अहो, निजलेले आणि मेलेले सारखेच. तीं नुसतीं चित्रें. एखाद्या भुताखेताचें चित्र पाहून लहान मुलें भितात. मोठीं माणसें भितांना मीं नाहीं पाहिलें कधीं.—जर दमाजीच्या अंगांतून रक्त वहात असलें, तर त्या हुजऱ्यांचीं तोंडें त्या रक्तानें चांगलीं चोपडून ठेवितें. कारण, त्यांनींच हा गुन्हा केला असें लोकांना भासलें पाहिजे.

( दर्याबाई जाते व आंतून कोणी दारावर धक्के मारतो. )

**मानाजीराव**—हें ठोठावणें कोणीकडून ऐकूं येत आहे ? कुठे कांहीं जरासें खुजबुजलें कीं मी चपापून जातों, असें मला झालें आहे तरी काय ? —अरे हे हात कोणाचे ! हे माझे डोळेच बाहेर काढूं पहात आहेत !—वरुणाच्या ताब्यांतल्या साती समुद्रांतील पाण्यानें तरी हे रक्ताचे डाग धुऊन जातील काय ? छे छे ! उलटे लाखों समुद्र असले तरी त्यांचें तें काळें भोर पाणी माझ्या ह्या हातावरील रक्तानें तांबडें भडक होऊन जाईल.

( दर्याबाई प्रवेश करिते. )

**दर्याबाई**—माझे हात तुमच्यासारखेच तांबडे झाले आहेत. तरी पण तुमच्या सारखें जर माझें हृदय भेकड असतें, तर मला त्याची शरम वाटली असती. (धक्का ऐकूं येतो.) दक्षिणेकडच्या दरवाजावर कोणी धक्के मारीत आहे असें वाटतें. चला आपण आपल्या महालांत जाऊन निजूं या. थोड्याशा पाण्यानें ह्या कृत्याचा मागमूस नाहींसा करितां येईल. आणि मग काय विचारतां ? पुढील व्यवहार अगदीं सोपा आहे.—आज धैर्य कोठें तरी विसरून आलां वाटतें.—हे पहा, आणखी आणखी धक्के बसताहेत. ( धक्के ऐकूं येतात. ) आतां हे कपडे नकोत. नाहीं तर प्रसंगवशात् आपल्याला असेंच बाहेर जाण्याची पाळी आली, तर हे अजून जागत होते, असें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येईल. असे ह्या भेकडपणानें विचारांत गर्क होऊन जाऊं नका.

**मानाजीराव**—त्या कृत्याची आठवण होण्यापेक्षां माझीच आठवण

मला नाहींशीं होईल तर बरें. ( दारावर धक्का बसतो. ) अरे, या तुझ्या धक्क्यानें दमाजीला जागा करून पहा.—जर तो तुझ्या हातून जागा झाला, तर फार चांगलें. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ—पूर्वीचेंच.

( द्वेवडीवाला प्रवेश करितो व आंतून कोणी दरवाजावर धक्के मारतात. )

**देवडीवाला**—इचि भन, काय तरी तरास है यो. आपल्यासनी नग बुवा ही नरकांतल्या देवडीवाल्याची चाकरी. हित रातीचेबी बगा ह्ये हरामखोर पापी लोक नरकामंदि पडण्यापाई येऊनशेनी मला झोप लागूं द्येइनात. आतां काय करावं यांसनी ? हा ! हा ! ही युगत लई ब्येस सुचलिया ! रातीच कुणाबी नरकामंदि पडायासनी येऊं नय असा हुकूम आपल्या धनीसाबाकडूनशेनी मी काढवतों.—पर इची भन त्ये पापी लोक लइ दोवाड असत्याती. त्ये आमच्या यमाजीपंताचा हुकूम ऐकत्याल कीं नाहीं कोणासनी ठावं ?—आं ! अरे इचि भन ! मर्त्युलोकामंदि कुणी हुकूम केला कीं रातीच कुणी मरूबी नका कीं कुणी मेलं तर जाळूंबी नका, तर ह्ये लंवडीचे पापी लोक निमूटपणें ऐकत्याती अन आमच्या धन्याचं ऐकणार नाहींत व्हय ? त्येंची तेवढी ह्या पाप्यांना लई जरब वाटती असं तमग झालं व्हय ? आन इचि भन त्येंची तेवढी रातीची झोप मोडतां कामा नाहीं, आन माजी मोडली तर चालेल व्हय ! बरं बरं ? त्या लेकांसनी म्हणाव तुम्ही नरकांत पडायासनी या तर खरे, कीं मग ह्या पठ्ठ्याशीं गांठ हाय. मग मी घेतों पाहूनश्यानी. ( दारावर आणखी धक्के बसतात. ) मारा, मारा ! दारावर एकसारखे धक्के मारीत असा ! मंधि खळ बी पडूं द्येऊं नका ! ह्यो क्वोण आलाय र ! ह्यो त्यो जनावर समजुनश्येनी माणसासनीच ठार करीत असतो न्हवका ?—या तुम्ही राव ! क्वण आहे र तकडे ? जा यासनी घेऊन, आन त्ये वाघ, सिंह, अस्वल थत हायती नइका, त्यांच्या मंदि ह्या गुलामासनी द्या फेकुन. ( फिरून धक्का बसतो. ) ह्यो क्वण

आला ? अर इचि मन, ह्यो दारू पिनारा आन मांस खानारा हाय र बुवा ! इचि मन ह्ये दारूच्यापुन लइ परमळताय ! अबबबब ! ह्येचं नाकबी कस तोंडल्यावानी लाल भडक झाल या ! जा रे, ह्येला बेगी बेगी न्येउनश्यानी गाढवाच्या मुतानी भरलेल्या त्या हिरींत ग्या ढकलून. ( फिरून धक्के ऐकूं येतात. ) या, तुम्ही कोण आलां ? हं हे पक्षपात करणारे अन्यावाधीश ! ह्ये मोठे बडे लोक हायती हं ! तुम्ही थांबा वइच बाबा. तुमचा न्याव नीट निवडला पाहिजे व्हयना ! थांबा तुम्हीं !—ह्ये कोण तुमच्या मागून आले हायेती ? हं हं ! ह्ये तुमचे लांचाचे पैसे वसूल करणारे दलाल ! ह्ये दोघांबी बाजूकडूनशेनी पैसे उपटणारे वकील ! ह्ये खोटीं खतें तयार करणारे सावकार ! ह्ये पाहिजे त्या बाजूची पाहिजे तशी साक्ष देणारे बनावट साक्षीदार ! अबबबब ! काय ह्यांचे थवेच्या थवे हे ! अर ल्येकों, तुम्हांला इतक्यांसनी न्याऱ्या न्याऱ्या जागा तरी हत हायत कुठं ? ग्या र ह्या समद्या गुलामांसनी येकाच खाड्यामंदि ढकलून ! अबबबब ! मृत्युलोकांतले ह्ये सारे बडे बडे लोक तर हकडच येत्याती ! आपणासनी नग बाबा हा तरास. भल्या माणसानं ह्या काळांत नरकांतल्या देवडीवाल्याचें काम पतकरूं नये. ( धक्का ऐकूं येतो. ) कोण दारावर धक्का मारीत आहे ?

( **मुकुंदराव** आणि **लक्ष्मणसिंग** प्रवेश करितात. )

**मुकुंदराव**—काय रे गड्या, इतका वेळ तुला झोंप का लागली होती ? रात्रीं निजायला उशीर झाला होता कीं काय ?

**देवडीवाला**—व्हय दादा, दुसरा कोंबडा ओरडेतों आम्ही मजा मारीत बसलों होतों.

**मुकुंदराव**—तुझे धनीसाहेब उठले आहेत काय ?

( मानाजीराव येतो. )

आम्ही दारावर धक्के मारीत होतों त्यामुळें जागे होऊन हे इकडेच आले.

**लक्ष्मणसिंग**—राम, राम, ठाकूरसाहेब.

**मानाजीराव**—राम राम ! राम राम !

**मुकुंदराव**—ठाकूरसाहेब, सरकार जागे झाले आहेत काय ?

**मानाजीराव**—नाहीं अजून.

**मुकुंदराव**—मला त्यांनीं बऱ्याच मोठ्या पहाटेस हाक मारायला सांगितलें होतें. पण माझ्याकडून ती वेळ बहुतेक चुकून गेली.

**मानाजीराव**—चला, मी तुम्हांला त्यांच्याकडे घेऊन जातों.

**मुकुंदराव**—हे जरी आपल्याला श्रम पडत आहेत, तरी ह्या श्रमांपासून आपल्याला आनंदच होईल, हें मला माहीत आहे.

**मानाजीराव**—जे श्रम करण्याची आपल्याला हौस असते, ते केल्याचा शीण मुळींच वाटत नाहीं.—हा त्यांच्या महालाचा दरवाजा.

**मुकुंदराव**—त्यांनीं मला सांगितलेंच आहे त्यापेक्षां त्यांना जाऊन उठवलेंच पाहिजे. ( जातो. )

**लक्ष्मणसिंग**—सरकारस्वारी आज येथून जाणार आहे काय ?

**मानाजीराव**—होय. असा काल त्यांचा विचार ठरलेला आहे खरा.

**लक्ष्मणसिंग**—ह्या रात्रीं मोठी गडबड चालली होती. आम्ही जेथें निजलों होतों, तेथील तटाचे बुरूज धडाधड कोसळून पडत होते. आणि कोणी कोणी तर असें सांगतात कीं, रडण्याचे स्वर आणि मरणकाळचे आक्रोश ऐकूं येत होते. आणि पुढें येणाऱ्या भयंकर काळांत अग्निप्रळय होतील आणि सर्व गोष्टींत विलक्षण घोटाळा उडून जाईल असले भयंकर स्वरानें उच्चारिलेले भविष्यवादही ऐकूं येत होते. तीं अंधकारप्रिय घुबडें साऱ्या रात्रभर एकसारखीं ओरडत होतीं. कोणी म्हणतात कीं, जमीन तप्त झाली होती आणि कांहीं वेळ धरणीकंपही झाला.

**मानाजीराव**—ही रात्र मोठी खडतर गेली खरी.

**लक्ष्मणसिंग**—माझ्या आठवणींत मी कधीं असली रात्र पाहिली नव्हती!

( **मुकुंदराव** प्रवेश करितो. )

**मुकुंदराव**—हाय हाय ! घात ! घात ! घात ! ज्या अघोर कर्माची अंतःकरणाला कल्पना करतां येणार नाहीं आणि जिव्हेला ज्याचें वर्णन करतां येणार नाहीं, असा हा भयंकर घात झाला.

**मानाजीराव** आणि **लक्ष्मणसिंग**—काय ? झालें तरी काय ?

**मुकुंदराव**—दुसरें काय ! दुर्दैवानें आपली कमाल करून सोडली ! कोणी हरामखोरानें आपल्या महाराजांच्या हृदयमंदिराचा भेद करून त्यांतील प्राणरूपी रत्न हरण करून नेलें !

**मानाजीराव**—तुम्ही काय म्हणतां ? प्राण हरण केले ?

**लक्ष्मणसिंग**—आपल्या महाराजांचे ?

**मुकुंदराव**—त्या महालाजवळ चला, आणि तुम्हीच आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पहा. मी तोंडानें काय सांगूं ! तें भयंकर कृत्य पाहिल्याबरोबर तुमचे डोळे फाटून जातील. ( **मानाजीराव** आणि **लक्ष्मणसिंग** जातात. ) उठा ! उठा ! जागे व्हा ! अरे तें शिंग फुंका आणि सगळ्यांना जागे करा !—खून ! खून ! दगा रे दगा ! व्यंकोजीराव ! धनाजी ! मल्हारराव ! उठा ! उठा ! मृत्यूची प्रतिमा जी ही तुमची झोंप ती टाकून द्या, आणि हा प्रत्यक्ष मृत्यु येथें घडला आहे तो पहा ! उठा, उठा ! आणि हें भयंकर मृत्यूचें स्वरूप पहा ! मल्हारराव, व्यंकोजीराव, तुम्ही आपल्या चितारूप शय्येवरून उठा आणि पिशाचासारखे इकडे धांवत येऊन हा भयंकर देखावा अधिक भयंकर करून सोडा !

( शिंग वाजतें व **दर्याबाई** प्रवेश करिते. )

**दर्याबाई**—किल्ल्यांत सगळीं माणसें निजलीं असतां अशा भयंकर रीतीनें हें शिंग कोणीं वाजविलें ! असें झालें आहे तरी काय ! सांगा, सांगा लौकर.

**मुकुंदराव**—दर्याबाई—छे, छे ! तुमच्या सारख्या कोमल अंतःकरणाच्या स्त्रियांच्या कानावर ही गोष्ट आली तर ती ऐकतां ऐकतांच तुम्ही घेरी येऊन पडाल. ( **व्यंकोजीराव** प्रवेश करितो. ) व्यंकोजीराव ! अहो व्यंकोजीराव ! आपल्या धनीसाहेबांचा कोणी खून केला हो !

**दर्याबाई**—अग बाई ! काय हें ! असली गोष्ट ! आणि ती आमच्या येथें !

**व्यंकोजीराव**—बाईसाहेब, ही गोष्ट कोठेंही झाली असली, तरी ती वाईटच.

( **मानाजीराव** आणि **लक्ष्मणसिंग** प्रवेश करितात. )

**मानाजीराव**—ही भयंकर गोष्ट घडून येण्यापूर्वी एक घटकाभर आधीं जर मी मेलों असतों, तरी माझ्या जन्माचें सार्थक झालें असतें. कारण, आतां ह्या जगांत काय अर्थ राहिला आहे ? आतां हा संसार निःसार झाला. कीर्ति आणि चांगुलपणा हीं आज लयाला गेलीं. आज त्रिभुवनांतील खरें रत्न तें हरपून गेलें. आणि मागें ह्या सगळ्या गारगोट्या मात्र उरल्या आहेत.

( मल्हारराव आणि धनाजी प्रवेश करितात. )

**धनाजी**—काय हो ? काय, आहे काय प्रकार ?

**मानाजीराव**—आपल्याला ठाऊक नाहीं ! आपल्यावर मोठा दुःखाचा पर्वत कोसळला ! तुमच्या अंगांत जो रक्ताचा प्रवाह खेळत आहे, त्याचा उगम आज बंद पडला !

**मुकुंदराव**—तुमच्या वडिलांचा खून झाला !

**मल्हारराव**—शिव शिव ! कोणत्या हरामखोरानें तो केला !

**लक्ष्मणसिंग**—त्यांच्या महालांत जे हुजरे निजले होते, त्यांनींच हें काम केलें असावें असें दिसतें. त्यांचे हात आणि त्यांचीं तोंडें सगळीं रक्तानें भरलेलीं होतीं. तसेंच त्यांच्या तरवारीही रक्तानें भरलेल्या होत्या. आणि त्या तशाच न पुसतां त्यांनीं आपल्या उशाजवळ ठेविलेल्या आम्हांला आढळल्या. ते आमच्याकडे डोळे वटारून पहात होते आणि त्यांचें डोकें फिरल्यासारखें दिसत होतें. कोणीही मनुष्य त्यांच्याजवळ असता, तरी त्याचा खून पाडण्याला त्यांनीं कमी केलें नसतें.

**मानाजीराव**—तरी पण रागाच्या झपाट्यांत मीं त्याना ठार केलें याबद्दल मला राहून राहून वाईट वाटतें आहे.

**मुकुंदराव**—तुम्ही असें कां केलेंत ?

**मानाजीराव**—आश्चर्यचकित झाल्यावर मागचें पुढचें धोरण कोणाला राहणार आहे ? रागाच्या आवेशांत आल्यावर नेमस्तपणा कसा टिकणार ? आणि ज्याच्या मनांत राजनिष्ठा म्हणून कांहीं आहे, तो अशा वेळीं नुसता तोंडाकडे पहात स्वस्थ राहील काय ? कोणीही राहणार नाहीं. असल्या कृत्याला प्रतिबंध करणाऱ्या न्यायबुद्धीचें माझ्या राजनिष्ठेपुढें कांहीं चाललें नाहीं.—एका बाजूला दमाजी महाराज पडले होते. त्यांच्या सर्वांगावरून रक्ताचे ओघळ चालले होते आणि जागोजाग मोठमोठ्या जखमा पडल्या होत्या. आणि दुसरीकडे त्यांचा खून करणारे ते हुजरे निजले होते. त्यांचें अंग आणि तरवारी रक्तानें भरलेल्या जवळ पडल्या होत्या. अशा स्थितींत ज्याचें मन राजनिष्ठेनें भरलेलें आहे आणि ती राजनिष्ठा व्यक्त करण्याचा प्रसंग आला असतां ज्याच्या मनांत धैर्यही आहे, अशा कोणत्या मनुष्यानें हें काम करायला सोडलें असतें ?

**दुर्याबाई**—मला येथून कोणी तरी घेऊन चला हो.

**मुकुंदराव**—दर्याबाईना काय झालें तें पहा.

**मल्हारराव**—वास्तविक पाहतां आपल्यावरच मुख्यत्वेंकरून हा प्रसंग गुदरलेला आहे. असें असून ह्या कामांत तूं कांहींच बोलत नाहींस हें कसें!

**धनाजी**—जेथें आपलें दुर्दैव झडप घालून आपल्याला देखील केव्हां धरील याचा नेम नाहीं, अशा ठिकाणीं आपण काय बोलावें! येथून आपण निघून जावें, हाच आतां उत्तम मार्ग आहे. रडत बसण्याची ही वेळ नव्हे.

**मल्हारराव**—दुःखाचा डोंगर एकदम कोसळला, म्हणजे काय बोलावें आणि काय करावें हें कांहींच सुचत नाहीं.

**व्यंकोजीराव**—या दर्याबाईना आधीं येथून कोणी तरी दुसरीकडे न्या बरें.

(दर्याबाईला नेतात.)

**व्यंकोजीराव**—बरें, आतां महाराजांचें प्रेत फार वेळा ठेवतां कामा नये. तेव्हां त्यांना लवकर मूठमाती देऊं या. आणि मग हें अघोर कृत्य कोणी केलें, ह्याची चौकशी करण्याकरतां आपण सर्व एका ठिकाणीं जमूं. आपल्या मनांत नाना प्रकारच्या शंका आणि कुकल्पना येत आहेत. तरी पण परमेश्वरावर हवाला ठेवून, ज्या कोणी हें राजद्रोहाचें कृत्य गुप्तपणें केलें असेल, त्याचा सूड घेण्याला मी तयार आहें.

**मुकुंदराव**—आणि मी पण तयार आहें.

**सर्व**—तुम्हीच काय? आम्हीही सर्व जण ह्या कृत्याला तयार आहों.

**मानाजीराव**—बरें तर जलदीनें आपलीं इतर कृत्यें उरकून घेऊन आपण या दिवाणखान्यांत जमूं या.

**सर्व**—ठीक आहे.

(मल्हारराव आणि धनाजी ह्यांखेरीज सर्व जातात.)

**मल्हारराव**—तुझा कसा काय विचार आहे? आपण यांच्यांत मिसळूं नये, असें मला वाटतें. पोटांतून ज्या दुःखाचे उमाळे फुटत नाहींत, त्या दुःखाचा वरकरणी बहाणा करणें हें लुच्चया लोकांनाच चांगलें साधतें. मी तर मगध देशांत जाणार.

**धनाजी**—आणि मी रत्नपुराकडे जाणार. दोघे दोहोंकडे गेलों, तरच आपण सुरक्षित राहूं. आपण हल्लीं जेथें आहों, तेथील लोक वरवर हसून

आंतून आपला गळा कापायला कधींही कमी करायचे नाहींत. आणि ज्यांच्याशीं आपला शरीरसंबंध विशेष आहे, ते आपल्या शरीराचे राईएवढे तुकडे करण्याला जास्त तत्पर, हें तूं पक्कें समज.

**मल्हारराव**—हें मनुष्यांचे गळे कापणारें अस्त्र शत्रूच्या हातून सुटलें आहे. पण तें अजून आपल्या गळ्यावर येऊन पडलें नाहीं. आणि म्हणून इतक्यांतच तें चुकविण्याचा प्रयत्न करणें हा उत्तम मार्ग होय. तेव्हां घोड्यावर बसून आपण येथून पळ काढूं या. कोणाचाही निरोप घेत बसण्याची ही वेळ नव्हे. कसेंही करून आपण येथून निसटलें पाहिजे. जेव्हां कोणाच्याच अंतःकरणांत दयेचा लेश उरलेला नसतो, तेव्हां अशा रीतीनें वागण्यांत कांहीं गैरशिस्त नाहीं.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—किल्ल्याच्या बाहेरील एक मैदान.

(**राणोजी** आणि एक म्हातारा मनुष्य प्रवेश करितात.)

**म्हातारा**—आज माझ्या वयाला सत्तर वर्षें होऊन गेलीं. आणि ह्या इतक्या मुदतींत मी पुष्कळ भयंकर आणि अद्भुत गोष्टी पाहिल्या आहेत खऱ्या. पण या रात्रीं जें कांहीं मी पाहिलें, त्यापुढें मागील सर्व रद्द आहे.

**राणोजी**—बाबा, तुम्ही म्हणतां तें अगदीं खरें आहे. अलीकडे माणसें भारी पाप करूं लागलीं आहेत. त्यामुळें असले अपशकुन होतात. हेंच पहाना, आतां वास्तविक म्हटलें तर उजडायला पाहिजे. परंतु त्रिभुवनप्रदीप जो सूर्य त्याला अजून देखील रात्रीनें झांकून ठेविलें आहे. पृथ्वीच्या पाठीवर चोहोंकडे प्रकाश पसरायचा, अशा वेळीं हा भूगोल अंधकारांत गढून गेला आहे. याचें कारण काय असावें ? रात्रच एवढी प्रबळ झाली म्हणावी काय ? किंवा सूर्यालाच उगवायला लाज वाटूं लागली आहे कोण जाणें !

**म्हातारा**—आज घडून आलेलें कर्म जसें अपूर्व, तसेंच हेंही अपूर्व म्हटलें पाहिजे. गेल्या मंगळवारीं एक बहिरीससाणा आकाशांत उंच उडत होता. इतक्यांत एका घुबडानें लपत छपत येऊन त्याच्यावर झडप घातली आणि त्याला ठार केलें !—हे पहा मुकुंदराव इकडे येत आहेत.

( मुकुंदराव येतो. )

काय ? कशी काय खबरबात आहे हल्लीं ?

**मुकुंदराव**—दुसरी काय ? बघतांच आहां तुम्ही काय आहे ती.

**राणोजी**—हें अमानुष कृत्य कोणी केलें ह्याचा कांहीं शोध लागला काय ?

**मुकुंदराव**—ज्यांना मानाजीरावांनीं मारलें, त्यांचेंच हें कृत्य असलें पाहिजे.

**राणोजी**—अरेरे ! त्या मांगांना ह्यापासून काय मिळालें असेल कोण जाणे ?

**मुकुंदराव**—त्यांना कोणी तरी पैसे देऊन हें कृत्य करण्याला प्रवृत्त केलें असावें. महाराजांचे दोघे मुलगे, मल्हारराव आणि धनाजी, हे येथून कोणाला न कळतां पळून गेले. ह्यावरून त्यांनींच हें काम करविलें असावें, अशी शंका येते.

**राणोजी**—छे. हें तर अगदींच संभवत नाहीं. पण तसेंही असेल कदाचित् !—शिव शिव ! महत्त्वाकांक्षी पुरुषांचा चोहोंकडून निरुपाय झाला, म्हणजे ते ज्यांनीं आपल्याला जन्म दिला त्यांचा देखील गळा कापायला तयार व्हावेत ना ? बरें, आतां हें राज्य मानाजीरावांनाच बहुतकरून मिळेल.

**मुकुंदराव**—होय, त्यांनाच हें राज्य देण्याचा निश्चय ठरला आहे. आणि त्याप्रमाणें राज्याभिषेकासाठीं ते स्कंदपुराला निघून देखील गेले.

**राणोजी**—तुम्ही स्कंदपुराला जाणार आहां कीं काय ?

**मुकुंदराव**—नाहीं. मी आपल्या गांवीं जाणार आहें.

**राणोजी**—माझ्या मनांतून स्कंदपुराला जायचें आहे.

**मुकुंदराव**—ठीक आहे. जा. तेथें सर्व गोष्टी निर्विघ्नपणें पार पडोत म्हणजे झालें.—या तर, राम राम ! पुढच्यांनीं मागच्याला बरें म्हणायला लाविलें नाहीं म्हणजे झालें !

**राणोजी**—येतों म्हातारे बाबा, राम राम.

( सर्व जातात. )

---

## दुसरा अंक समाप्त.

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ—परशुपुर. राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

( व्यंकोजीराव प्रवेश करतो. )

**व्यंकोजीराव**—मानाजीराव, *त्या चेटक्यांनीं भविष्य केल्याप्रमाणें माणिकपुरचा जहागिरदार, कठोरपुरचा ठाकूर आणि राजा तर तूं झालास. पण मला अशी जबरदस्त शंका आहे कीं, हें राज्यपद मिळविण्यासाठीं तूं अतिशय नीच कर्म केलें असावेंस. पण त्या चेटक्यांनीं आणखी असेंही सांगितलें कीं, ही गादी तुझ्या वंशाकडे चालणार नाहीं. तर ती पुढें माझ्याच वंशजांकडे येणार. मानाजीराव, त्यांचें बोलणें तुझ्याविषयीं खरें झालें. ह्यावरून त्यांचें भविष्य चुकत नाहीं हें खास. तर मग आतां माझ्याविषयींचें भविष्य कां खरें होणार नाहीं ? त्याबद्दल माझ्या मनांत आशा उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. पण पुरे. ह्याचा आणखी विचार नको.

( शिंग वाजतें; व नंतर राजा **मानाजीराव**, राणी **दर्याबाई**, **लक्ष्मणसिंग** व दुसरे सरदार आणि हुजरे प्रवेश करितात. )

**मानाजीराव**—हे व्यंकोजीराव तर येथेंच आहेत.

**दर्याबाई**—ह्यांना आमंत्रण करण्याची जर आठवण झाली नसती, तर आजच्या मेजवानीचा थाट चांगला जमला नसता, आणि सगळा बेत बिघडून गेला असता.

**मानाजीराव**—आज रात्रीं आमच्या येथें मेजवानीचा बेत आहे. तेव्हां आपण तेथें अवश्य यावें, म्हणजे मोठी मेहरबानी होईल.

**व्यंकोजीराव**—ह्यांत मेहरबानी कसली ? सरकार जें जें सांगतील तें तें करायला मी नेहमीं तयारच आहें.

**मानाजीराव**—आज तिसऱ्या प्रहरीं घोड्यावर बसून फेरफटका करायला तुम्हांला कोठें जायचें आहे कीं काय ?

**व्यंकोजीराव**—होय, सरकार.

**मानाजीराव**—आज दरबारांतल्या कांहीं कामासंबंधानें तुमचा सल्ला घ्यायचा होता.—तुमचा सल्ला नेहमींच पोक्त असतो व परिणामीं हितकारक होतो.—पण असो. त्याबद्दल आपण उद्यां विचार करूं.—तुम्ही फार लांब फिरायला जाणार आहां कीं काय ?

**व्यंकोजीराव**—आतांपासून संध्याकाळच्या जेवणाची वेळ होईपर्यंत जितकें लांब जाऊन येतां येईल, तितकें जाण्याचा विचार आहे. जर माझा घोडा दमल्यामुळें चांगला चालेनासा झाला, तर कदाचित् घटका दोन घटका रात्र होण्याचा संभव आहे.

**मानाजीराव**—पण वेळेवर यायला चुकूं नका हो.

**व्यंकोजीराव**—नाहीं चुकणार, सरकार.

**मानाजीराव**—मी असें ऐकतों कीं तें अघोर कर्म करून मल्हारराव मगधदेशाला आणि धनाजी रत्नपुराला पळून गेले. आपण निर्दयपणानें केलेला आपल्या बापाचा खून छपवून ठेवून ते खोट्यानाट्या कंड्या उठवून लोकांना भलभलतें सांगत आहेत. पण ह्याविषयीं आपण उद्यां बोलूं.—उद्यां आपल्याला दुसऱ्या कामासाठीं दरबारांत जमायचेंच आहे. जा, जाच तर तुम्ही आतां. राम राम!—तुमचा गुलाब तुमच्या बरोबर येणार आहे कीं काय ?

**व्यंकोजीराव**—होय, सरकार. बरें आहे, जातों आतां. उशीर झाला आहे.

**मानाजीराव**—ठीक आहे. यावें.

( **व्यंकोजीराव** जातो. )

दोन घटका रात्र होईपर्यंत ज्याला जिकडे जायचें असेल तिकडे त्यानें जावें. संध्याकाळीं मंडळींत मिसळण्यापासून अधिक सुख व्हावें म्हणून मलाही कांहीं वेळ एकांत पाहिजे आहे.

( **मानाजीरावा**खेरीज सर्व जातात. )

अरे, ते लोक आले आहेत काय ?

**हुजऱ्या**—सरकार, राजवाड्याच्या दरवाजाबाहेर ते उभे आहेत.

**मानाजीराव**—जा. त्यांना माझ्यासमोर घेऊन ये.

( हुजऱ्या जातो. )

अशा स्थितींत राहण्यांत कांहींच अर्थ नाहीं. तर राज्य मिळून त्याच्या-बरोबर निर्धास्तपणा मिळेल, तरच त्यांत मजा. मला व्यंकोजीरावाची मोठी भीति वाटते आहे. कारण, त्याच्या त्या सरदारी स्वभावांतच असें कांहीं एक पाणी आहे कीं, त्यापासून मला भयच उत्पन्न होतें. तो मोठा धाडशी असून पुन्हा शहाणा आहे. त्याच्या योगानें त्यानें एखादे वेळेला कांहीं धाडस केलें, तरी ती बाजू त्याच्या अंगावर येत नाहीं. मला दुसरी कसलीही भीति नाहीं. पण हा जिवंत आहे हीच मला भीति. त्याच्यापुढें माझी अक्कल गुंग होऊन जाते. जेव्हां त्या चेटक्यांनीं मी राजा होईन म्हणून सांगितलें, तेव्हां हा त्यांच्यावर रागावला. आणि आपल्याबद्दल कांहीं भविष्य सांगण्याविषयीं त्यानें त्यांना विनंति केली. तेव्हां तुझ्या कुळांत जे पुरुष जन्माला येतील, त्यांना राज्यपद मिळेल, असा आशीर्वाद त्यांनीं त्याला दिला. तेव्हां माझ्या मस्तकावर त्यांनीं जो मुकुट ठेविला, तो फुकट. आणि माझ्या हातांत त्यांनीं जो राजदंड दिला, तोही पण व्यर्थ. कारण, माझा मुलगा पुढें गादीवर बसायचा नसल्या कारणानें हीं दोन्हींही माझ्यापासून तिसराच कोणी तरी हिसकावून घेणार. आणि असें जर होणार असेल, तर व्यंकोजीरावाच्या वंशजांसाठीं मी हें पाप केलें! त्यांच्यासाठीं त्या महात्म्या दमाजीचा मी खून केला! त्यांच्यासाठीं मी आपल्या मनाला हजारों विंचू लावून घेतले! आणि त्यांना राजे करण्यासाठीं—त्या व्यंकोजीरावाच्या कारट्यांना राजे करण्यासाठीं—मी आपल्या पर-लोकच्या अक्षय सुखाला आंचवलों! अशा स्थितींत राहण्यापेक्षां, काय होईल तें होवो, त्याचा निकाल लावण्याला कंबर बांधलीच पाहिजे. चल ये, नशीबा! तुझ्याशीं मी लढणार! पाहूं दे कोणाची सरशी होते ती. कोण आहे तिकडे?

( हुजऱ्या आणि दोन मारेकरी प्रवेश करितात. )

जा. त्या दरवाजाजवळ उभा रहा. आणि मी हांक मारीपर्यंत तेथून हलूं नको.

( हुजऱ्या जातो. )

कालच तुमचें माझें बोलणें झालें नाहीं काय?

**पहिला मारेकरी**—होय, सरकार.

**मानाजीराव**—बरें तर तुम्ही माझ्या म्हणण्याचा विचार केलात काय? तुम्हांला वाटत होतें कीं, मागें जें तुमचें नुकसान झालें तें मी केलें म्हणून. पण तुम्ही पक्कें लक्षांत ठेवा कीं तें काम त्याचेंच होतें. आतां तें कसें ह्याबद्दल माझ्या कालच्या बोलण्यावरून तुमची खात्री झालीच असेल. तुमची लायकी असून तुम्हांला कसें मागें ठेविलें, तुमची कशी मानखंडना केली, तुम्हांला कळसूत्री बाहुल्याप्रमाणें नाचवून त्यानें आपला फायदा कसा करून घेतला, ह्या व इतर गोष्टी मी तुम्हांला इतक्या स्पष्ट रीतीनें सिद्ध करून दाखविल्या आहेत कीं, एखाद्या अर्धवट आणि वेडगळ मनुष्यानें त्या ऐकल्या, तर 'व्यंकोजीनेंच हें केलें' असें म्हटल्यावांचून त्याच्यानें सुद्धां राहवणार नाहीं.

**पहिला मारेकरी**—होय, तुम्ही आमची खात्री करून दिली खरी.

**मानाजीराव**—खात्री करून दिली, एवढेंच नव्हे, तर त्याच्या पुढलीही गोष्ट मी तुम्हांला सुचविली होती. आणि तिचाच आतांच्या बैठकीला आपल्याला विचार करायचा आहे. त्याचा सूड उगविण्याचा विचार तुमच्या मनांत येऊं नये, इतका सहनशीलपणा तुमच्या अंगांत भरला आहे काय? ज्यानें तुमची अशी मरणान्तिक अवस्था करून सोडली आणि ज्यानें तुमच्या पोराबाळांना जन्माची भीक मागायला लाविलें, त्या ह्या साधु पुरुषासाठीं आणि त्याच्या कारट्यांसाठीं देवापाशीं दुवा मागतां! कोण खुळसट धर्मवेडेपणा हा!

**पहिला मारेकरी**—महाराज, आम्ही कसे झालों तरी मनुष्य आहों.

**मानाजीराव**—मनुष्यजातींत तुम्ही उत्पन्न झालां आहां, एवढ्यावरूनच म्हणायचें असेल, तर तुम्ही मनुष्य आहां खरे. पण त्याचा कांहीं उपयोग नाहीं. तुम्ही मनुष्य आहां; पण कोणत्या दर्जाचे आणि कोणतें काम उठवण्याची तुमच्या अंगांत धमक आहे, हें मला सांगा. म्हणजे मी तुम्हांला त्याप्रमाणें काम सांगेन. मी सांगितलेली कामगिरी जर तुम्ही बजाविली, तर त्या योगानें तुमच्या शत्रूचा संहार होईल हें एक. आणि दुसरें तुम्ही माझ्या जिवाचे केलिजे व्हाल. तो जिवंत आहे तोंपर्यंत मला मुळींच चैन पडत नाहीं. पण तो मेला म्हणजे मी अगदीं निर्धास्त झालों.

**दुसरा मारेकरी**—सरकार, ह्या जगांतील गचक्यांनीं आणि धरमधक्क्यांनीं मला इतकें डवचून सोडलें आहे कीं, त्याचे उट्टे काढण्याकरितां मी काय पाहिजे तें करायला तयार आहें.

**पहिला मारेकरी**—आणि ह्याच्याप्रमाणें मीही ह्या संसारांतील यातनांनीं अगदीं वैतागून गेलों आहें. आतां कांहीं माझ्यानें धीर निघत नाहीं. माझा निश्चय झाला आहे कीं, नशिबाशीं शेवटचें झगडून एकदा काय तो सोक्षमोक्ष करून घ्यावा.

**मानाजीराव**—तुम्हां दोघांनाही माहीत आहे कीं, व्यंकोजीराव हा तुमचा दुस्मान आहे.

**दुसरा मारेकरी**—होय, सरकार.

**मानाजीराव**—तो जसा तुमचा दुस्मान आहे,तसाच माझाही पण आहे. पण त्याचें माझें इतकें हाडवैर आहे कीं, तो जिवंत आहे, तोंपर्यंतचा प्रत्येक क्षण माझ्या अंतःकरणावर तरवारीचे घाव घालीत आहे, असें मला वाटतें. आतां आपल्या सत्तेच्या जोरावर मला उघड उघड जरी त्याला धुळीला मिळवून देतां येईल, तरी पण मला तसें करून उपयोगीं नाहीं. कारण, कांहीं मंडळी त्याचे आणि माझे असे दोघांचेही स्नेही आहेत. तेव्हां त्यांचें मन दुखविणें मला प्रशस्त वाटत नाहीं. म्हणून आंतून त्याचा नाश करवून बाह्यात्कारी मला त्याच्यासाठीं रडूनही दाखविलें पाहिजे. म्हणून मला ह्या कामांत तुमची मदत पाहिजे. अनेक महत्वाच्या कारणांकरितां ही गोष्ट अगदीं बिनबोभाट उरकून टाकणें जरूर आहे.

**पहिला मारेकरी**—ठीक आहे. मग त्या कामांत आमचा जीव गेला तरी हरकत नाहीं.

**मानाजीराव**— आतां तुमच्या अंगांत खरें पाणी चमकूं लागलें. तुम्ही कोठें लपून रहावें आणि बरोबर कोणच्या वेळीं हें काम उरकून घ्यावें, ह्याबद्दल नक्की माहिती मी तुम्हांला एका घटकेच्या आंत देतों. हें काम आजच्या रात्रीं आणि राजवाड्यापासून अगदीं लांब एकीकडे कुठें तरी उरकून टाकलें पाहिजे. लक्षांत ठेवा कीं, यांत माझा कांहीं संबंध आहे असें मात्र कोणाला वाटतां कामा नये. आणि एकदा जें काम हातांत धरलें, त्यांत व्यंग राहतां कामा नये, ह्यासाठीं व्यंकोजीरावाचा तो गुलाब त्याचेंही त्या काळोखांत चंदन उडालें पाहिजे तोही त्या वेळीं आपल्या बापाबरोबर असेलच. बापाचा खून जितका जरूर आहे, तितकाच त्याचा—त्या कारट्याचाही—आहे. तुम्ही एकीकडे जाऊन आपापसांत काय तें ठरवा. हा मी आलोंच इतक्यांत.

**दुसरा मारेकरी**—आमचा निश्चय तर होऊन चुकला आहे.

**मानाजीराव**—ठीक आहे. तुम्ही जरा आंत बसा, तों मी आलोंच.

( मारेकरी जातात. )

ठरलें तर! व्यंकोजीराव ! तुझ्या आत्म्याला जर स्वर्गप्राप्ति व्हायची असेल, तर ती आज रात्रींच होणार.

( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—पूर्वींचें. दुसरा दिवाणखाना.

( दर्याबाई आणि एक चाकर प्रवेश करितात.)

**दर्याबाई**—व्यंकोजीराव गेले काय ?

**चाकर**—होय, बाईसाहेब. पण रात्रीं ते परत येणार आहेत.

**दर्याबाई**—तिकडे जाऊन सांग कीं, फुरसत असेल तर मला आपल्याशीं थोडेंसें बोलायचें आहे.

**चाकर**—होय, बाईसाहेब. ( जातो. )

**दर्याबाई**—जेथें आपल्या मर्जीप्रमाणें एखादी गोष्ट घडून येते, पण मनाचें समाधान होत नाहीं, तेथें आपल्या पदरचें सर्व खर्चून वेंचून आपल्या पदरांत अखेरीस फायदा म्हणून कांहींच पडत नाहीं. पूर्वींची स्थिति सोडून नवीन स्थितींत जायचें आणि तेथें ह्या नवीन स्थितींतील आनंद मला चिरकाळ लाभेल कीं नाहीं, ही विवंचना करीत बसायचें, ह्यापेक्षां आपल्या पूर्व स्थितींत राहणें हेंच बरें.

( मानाजीराव प्रवेश करतो. )

कसें काय ? आतांशा असें काय अगदीं एकांतवासांत असायचें असतें ? भलभलत्या दुःखदायक कल्पना तुमच्या मनांत सदासर्वदा अशा कां घोळत असतात ? दमाजीबरोबरच त्याच्याबद्दलचे विचार देखील नाहींसे नकोत का व्हायला ? ज्या गोष्टीला कांहीं उपाय नाहीं, त्याची काळजी करून तरी काय होईल ? झालें तें झालें.

**मानाजीराव**—आपण सापाची शेपटी मात्र तोडली. त्याला ठार मारलें नाहीं. तो आतां सावध होऊन हळुहळु आपल्याजवळ येत आहे. आणि आपल्या मनांत त्याच्याविषयीं कितीही द्वेष असला, तरी आतां त्याच्या भीतीनें आपल्याला थरथर कांपत बसावें लागत आहे. अन्न गोड लागत नाहीं. सुखाची झोंप मिळत नाहीं. रात्रीचीं भयंकर स्वप्नें पडून अंगाला थरकांप सुटतो. ह्यापेक्षां ह्या जगांतील सर्व वस्तूंच्या संबंधरूपी शृंखळा तटातट तोडून टाकून स्वर्गलोक आणि मृत्युलोक ह्यांचा नाश करणें हें सुद्धां बरें. अंतःकरणाला हजारों वेदना होत असतांना तसेंच ह्या कष्टमय आनंदाच्या मोहांत राहण्यापेक्षां हें राज्यपद मिळविण्याकरितां मी ज्या दमाजीला मारलें, त्याच्याप्रमाणें आपणही मरणें हें फार चांगलें. ह्या जगांत क्षणोक्षणीं होणारा संताप सोसून आतां दमाजी आपल्या थडग्यांत मोठ्या सुखानें झोंप घेत पडला असेल. राजद्रोहापासून त्याचें जें कांहीं अतिशय वाईट व्हायचें, तें आज होऊन चुकलें आहे. शस्त्रप्रहार, विषप्रयोग, फंदाफितुरी किंवा परचक्र, ह्यांपैकीं कशाच्यानेंही इतःपर त्याच्या निद्रेचा भंग करवणार नाहीं.

**दर्याबाई**—हें काय बाई! मुद्रा अगदीं कावरी बावरी झालेली दिसत आहे. ती जरा स्थिर करा. आणि आज रात्रीं मेजवानीला मंडळी आपल्या घरीं जमली म्हणजे त्यांत चांगलें हंसून खेळून वागा.

**मानाजीराव**—प्रिये, मी तर असा वागेनच. पण तुलाही असेंच वागलें पाहिजे. तूं व्यंकोजीरावाचें कांहीं कमी पडूं देऊं नको. आणि तो आला म्हणजे त्याला या बसा करून तूं आपल्या आनंदी मुद्रेनें आणि गोडगोड भाषणानें त्याचा जरा विशेष मान ठेव.—आपला मोठेपणा बाजूला ठेवून ह्या लोकांची मर्जी संपादन करून घेणें जोंपर्यंत आपल्याला भाग आहे, आणि आपली मुद्रा नेहमीं आनंदी ठेवून आपल्या अंतःकरणांत काय चाललें आहे तें दुसऱ्यापासून छपवणें जोंपर्यंत भाग आहे, तोंपर्यंत आपलें वैभव शाश्वत कसलें म्हणायचें!

**दर्याबाई**—पुरे झालें हें असलें बोलणें आतां.

**मानाजीराव**—तुला काय सांगूं! माझ्या हृदयाला हजारों विंचू फडाफड नांग्या मारीत आहेत. तुला ठाऊकच आहे कीं, व्यंकोजीराव आणि त्याचा कारटा तो गुलाब हे अद्याप जिवंत आहेत.

दर्याबाई—खरें, पण ते कांहीं अक्षयी जगणार नाहींत.

मानाजीराव—दुःखांत सुख मानायला एवढीच काय ती जागा आहे,—कीं त्यांच्यावर शास्त्र चालेल.—तर मग आतां तूं खुशाल आनंदांत बसून रहा. पाकोळ्या रात्रीच्या प्रहरीं आपल्या घरट्यांत जाण्यापूर्वीं आणि वेताळाच्या हाकेसरशी भूतें खेतें नाचूं लागण्याच्या पूर्वीं आज एक अतिशय भयंकर कृत्य घडून येणार आहे.

दर्याबाई—असें काय—योजलें तरी काय आहे ?

मानाजीराव—छेः! आधीं नाहीं सांगायचें. तें झाल्यावर देखील तूं त्याची तारीफ केल्यावांचून तुला कांहीं नाहीं सांगायचें. कारण, त्या योगानें तुझी उत्सुकता कमी होईल.—हे तिमिरमय रात्रि, चल ये झटकन् आणि ह्या बिचाऱ्या दिनमणीला तूं आपल्या कृष्ण वस्त्रांनीं गुंडाळून टाक. आणि ज्याच्या भीतीनें माझ्या रक्ताचें पाणी होऊन चाललें आहे, त्याचें जीवित-बंधन तूं आपल्या क्रूर आणि अदृश्य हातांनीं तोडून त्याचे तिळाएवढे तुकडे तुकडे करून टाक.—प्रकाश मंद होत चालला. कावळे आपल्या घरट्यांकडे परतूं लागले. दिवसाच्या सर्व चांगल्या वस्तु नाश पावत आहेत. आणि रात्रीच्या अंधकारांत क्रूर कृत्यें करणारे आपल्या सावजांवर झडप घालण्यासाठीं तयारी करीत आहेत.—तुला माझ्या बोलण्याचें आश्चर्य वाटतें आहे. पण जरा धीर धर.—अन्यायाच्या पायावर रचलेल्या इमारतीला अन्यायानेंच ज्यास्त मजबुती येते. पण तुझी मला ह्या कामांत मदत पाहिजे. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—पूर्वींचें. मैदान.

( तिघे मारेकरी प्रवेश करितात. )

**पहिला मारेकरी**—आम्हांला येऊन मिळण्याविषयीं तुला कोणी हुकूम दिला ?

**दुसरा मारेकरी**—मानाजीरावांनीं.

**दुसरा मारेकरी**—आपण आपलें काम कसें करायचें हें हा अगदीं बरोबर आपल्याला दाखवून देत आहे. तेव्हां ह्याच्यावर बेफिकीरपणानें विश्वास ठेवायला कांहीं हरकत नाहीं.

**पहिला मारेकरी**—तर मग ये, आमच्या जोडीला उभा रहा ये.—अजून पश्चिमेच्या अंगाला थोडथोडे किरण दिसत आहेत. प्रवासी लोक रात्र होईल या भीतीनें लवकर लवकर चालून आपआपल्या मुक्कामाला जात आहेत. आणि आपण ज्याची वाट पहात आहों, तोही आतां जवळ आला असेल.

**तिसरा मारेकरी**—ऐका. घोड्याच्या टापा ऐकूं येत आहेत.

**व्यंकोजीराव**—( आंतून ) कोण आहे रे तिकडे? एक बत्ती पेटवून आण पाहूं.

**दुसरा मारेकरी**—तोच रे तोच हा!—आजच्या मेजवानीला बोलावलेले बाकीचे लोक आधींच किल्ल्यांत गेले आहेत. तेव्हां आतां कोणी यायची भीति नाहीं.

**पहिला मारेकरी**—ह्याचे घोडे कोठें गेले?

**तिसरा मारेकरी**—ते एक मैलावर मागें राहिले असावेत. कारण, त्याची—त्याचीचशी काय—सगळ्यांचीच अशी वहिवाट आहे कीं, येथून राजवाड्यापर्यंत चालत जायचें.

( **व्यंकोजीराव** आणि **गुलाब** प्रवेश करितात. )

**तिसरा मारेकरी**—तोच रे तोच हा.

**पहिला मारेकरी**—संभाळा आतां.

**व्यंकोजीराव**—आज रात्रीं पाऊस पडेलसें वाटतें.

**पहिला मारेकरी**—रात्र कशाला पाहिजे? हा आतांच आला पहा.

( व्यंकोजीरावावर प्रहार करितो. )

**व्यंकोजीराव**—दगा रे दगा! पळ गुलाब! पळ रे पळ! तूं ह्याचा सूड घे—अरे हरामखोरा!

( **व्यंकोजीराव** मरतो व **गुलाब** पळून जातो. )

**तिसरा मारेकरी**—दोघांपैकीं एकच मुर्दा पडला आहे. तो कारटा पळून गेला असें दिसतें.

**दुसरा मारेकरी**—आपण आपली कामगिरी अर्धवट बजाविली.

**पहिला मारेकरी**—बरें असो. चला आतां जाऊं या. आणि झालेली हकीकत त्यांना कळवूं. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—राजवाड्यांतील दरबाराचा दिवाणखाना.

( मानाजीराव, दर्याबाई, राणोजी, लक्ष्मणसिंग व इतर सरदार आणि हुजरे प्रवेश करितात.)

**मानाजीराव**—सर्वांनीं आपापल्या दर्जाप्रमाणें बसावें. अथवा कोठेंही बसलां म्हणून काय झालें ? मी आहेंच आपला समाचार घ्यायला.

**सरदार**—किती गोड स्वभाव हा !

**मानाजीराव**—आणि मी देखील तुमच्या पंक्तीला येऊन बसतोंच.

( दरवाजापाशीं पहिला मारेकरी प्रवेश करितो. )

**मानाजीराव**—अरे तुझ्या तोंडावर रक्त उडालेलें दिसतें आहे.

**मारेकरी**—सरकार, तें व्यंकोजीरावाचें आहे.

**मानाजीराव**—तो येथें येण्यापेक्षां त्याचें रक्त येथें आलें, हें फार चांगलें. त्याचा निकाल लाविलासना !

**मारेकरी**—सरकार, त्याची गर्दन छाटून टाकली.

**मानाजीराव**—भले शाबास, गळे कापणारांत तुझा पहिला नंबर आहे. तरी पण त्या गुलाबाचा गळा ज्यानें कापला असेल, त्याची शाबास खरी. जर तूं तें काम बजाविलें असशील, तर तुझ्यासारखा दुसरा माणुसच नाहीं, असें म्हटलें पाहिजे.

**मारेकरी**—पण, सरकार, गुलाब आमच्या हातून निसटून गेला.

**मानाजीराव**—तर मग फिरून माझें डोकें भणभणायला लागलें. गुलाब मेला असता, म्हणजे माझ्या सुखाला कांहीं पारावार नव्हता. पर्वताप्रमाणें माझी सत्ता स्थिर झाली असती. आणि अंतरिक्षांत

वारा ज्याप्रमाणें अव्याहत फिरतो त्याप्रमाणें माझी सत्ता चोहोंकडे अव्याहत चालली असती. पण आतां पाहिलें, तर माझी स्थिति एकाद्या तुरुंगांत घातलेल्या किंवा पाय तोडून टाकलेल्या मनुष्याप्रमाणें झाली आहे; आतां तो गुलाब येऊन माझें राज्य बळकावील कीं काय, अशी शंका आणि भीति माझ्या मनाला रात्रंदिवस त्रास देणार.—पण व्यंकोजीरावाचा तरी अगदीं निकाल लागलाना !

**मारेकरी**—होय, सरकार. खड्डयांत त्याला पुरून देखील टाकलें. त्याच्या डोक्यावर वीस पंचवीस जखमा अशा भल्या जबरदस्त झाल्या आहेत कीं, त्यांतल्या अतिशय लहान जखमेनें देखील त्याचा प्राण गेला असता.

**मानाजीराव**—ह्या कामाबद्दल तुला कांहीं तरी बक्षीस दिलें पाहिजे.—हा वृद्ध सर्प तर मरण पावलाच. आतां त्याचें पिलूं पळून गेलें आहे. त्याच्या अंगांत सृष्टिक्रमाप्रमाणें कांहीं काळानें जहर उत्पन्न होईल हें खरें. पण सध्यां तरी त्याला दांत नाहींत.—तूं आतां जा. उद्यां फिरून तूं माझी गांठ घे.

( मारेकरी जातो. )

**दर्यावाई**—असें आपण उद्विग्न काय व्हायचें आहे ! लोकांना आपल्या घरीं मेजवानीला बोलवायचें आणि त्यांना असें खोळंबून ठेवायचें, हें चांगलें का ! अशापेक्षां ज्यांनीं त्यानीं आपापल्या घरीं जेवणें काय वाईट !

**मानाजीराव**—तूं मला ह्याची आठवण केलीस हें फार बरें झालें. हं तुम्ही बसूं लागा.

**लक्ष्मणसिंग**—महाराजांनीं पण येऊन बसावें.

( व्यंकोजीरावाचें भूत मानाजीरावाच्या पाटावर येऊन बसतें. )

**मानाजीराव**—आपल्या व्यंकोजीरावांची स्वारी जर या ठिकाणीं असती, तर आपला आनंद अगदीं शिखराला जाऊन पोंचला असता. वाटेंत कांहीं हरकत आल्यामुळें ते येथें वेळेवर आले नाहींत, असें मला मुळींच वाटत नाहीं. ते मुद्दाम आले नाहींत.

**राणोजी**—त्यांनीं येतों असें वचन दिलें असून अखेरीस ते आले नाहींत, हें चांगलें नाहीं. बरें ते नाहीं आले तर नाहीं आले. महाराजांनीं तरी आम्हांला आतां आपल्या पंक्तीचा लाभ द्यावा.

**मानाजीराव**—सगळ्या जागा भरल्या आहेत.



मानाजीराव:—मी हें कृत्य केलें असें तुला म्हणतां यायचें नाहीं !

अंक ३, प्रवेश ४ ( पृष्ठ ४७ ).

लक्ष्मणसिंग—सरकार, ही येथें आपल्याकरतां जागा राखून ठेवली आहे.

मानाजीराव—कोठें ?

लक्ष्मणसिंग—ही येथें, सरकार.

मानाजीराव—कोणाचें काम हें ?

सरदार—सरकार, कोणतें काम आपण म्हणतां ?

मानाजीराव—मी हें कृत्य केलें असें तुला म्हणतां यायचें नाहीं. रक्तानें भरून गेलेले हे तुझे केस अशा रीतीनें पिंजारून तूं माझ्याकडे पाहूं नकोस.

राणोजी—आज सरकारांची तब्येत ठीक दिसत नाहीं.

दर्याबाई—बसा, बसा. तुम्ही स्वस्थ बसा. इकडे लहानपणापासूनच अशी सवय आहे. त्यामुळें पुष्कळ वेळां त्यांचें असें होतें. कुणी उठायला नको कांहीं. हा ह्यांचा झटका थोडक्याच वेळांत नाहींसा होईल, आणि हे लवकर शुद्धीवर येतील. तुम्ही जर ह्यांच्याकडे फार लक्ष देऊं लागलां, तर त्यांना राग येऊन त्यांचा संताप अधिक वाढेल. तेव्हां तुम्ही स्वस्थ बसा. ह्यांच्याकडे तुम्ही बिलकुल लक्ष देऊं नका.—हा मर्दपणा वाटतें ?

मानाजीराव—अलबत मर्दपणा! नाहीं तर समंधाला सुद्धां ज्याच्याकडे पाहून कांपरें सुटेल त्याच्याकडे मला पाहवतेंच ना.

दर्याबाई—वाः वाः ! फार मोठा मर्दपणा ! तुमच्या मनांतल्या भीतीचेंच हें चित्र ! दमाजीला मार म्हणून सांगणारी जशी कट्यार त्यांतलेंच हें ! अहाहा ! किती भितां आणि किती दचकतां ! भुतांच्या गोष्टी ऐकून जशी एकादी लहान पोरगी भिते, तसे तुम्ही काय भितां ! ह्याची लाज कशी वाटत नाहीं ! मुद्रा अशी पालटतां काय !

मानाजीराव—तें पहा. पहा ! तिकडे पहा ! आतां तूं काय म्हणशील ?—तूं माना डोलव किंवा पाहिजे असल्यास बोलूं देखील लाग. मला त्याची मुळींच भीति नाहीं.—जमिनींत गाडून टाकलेलीं माणसें जर तेथून उठून अशीं माघारीं येऊं लागलीं, तर यापुढें गिधाडांच्या चोंचींनींच त्यांचे लचके तोडून खावविले पाहिजेत. ( भूत नाहींसें होतें. )

दर्याबाई—मूर्खपणानें असे गर्भगळित कसे होऊन गेलां ?

**मानाजीराव**—खरोखर मी त्याला येथें पाहिलें.

**दर्याबाई**—असें भलभलतें बोलायची लाज तरी कशी वाटत नाहीं !

**मानाजीराव**—खुनाच्या विरुद्ध मनुष्यांनीं प्रतिबंध करून ठेवण्याच्या पूर्वीं आणि पाठीमागूनही कानांनीं ऐकवणार नाहींत असे भयंकर रक्तपात झालेले आहेत आणि खून पडलेले आहेत. आणि आजपर्यंत एखाद्या माणसाचें डोकें ठेंचून टाकलें, म्हणजे तो मरत असे आणि तेथेंच त्याचा सगळा ग्रंथ समाप्त होई. पण हल्लीं हीं ठार झालेलीं माणसें—त्यांच्या डोक्यांवर झालेल्या वीस पंचवीस जखमांतून रक्त वहात आहे अशींच्या अशींच—फिरून दृष्टीस पडतात आणि आमच्या जाग्यावर येऊन बसतात, हें त्या खुनांपेक्षा देखील फार भयंकर !

**दर्याबाई**—ही मंडळी तुमची वाट पहात आहेत.

**मानाजीराव**—मला त्यांची अगदींच आठवण नव्हती.—माझी ही स्थिति पाहून तुम्ही असे घाबरूं नका. मला ही चमत्कारिक खोड लागली आहे. ज्यांना ही माहीत आहे, त्यांना ह्याचें कांहींच वाटत नाहीं. तुम्ही बसा आतां. मीही आपल्या जागेवर येऊन बसतों. व्यंकोजीराव येथें नाहींत त्यामुळें मला अगदीं चुकल्याचुकल्यासारखें झालें आहे. ते येथें असते, तर बरें झालें असतें. ( भूत फिरून प्रवेश करितें. ) जा, चालता हो. माझ्या दृष्टीसमोर उभा राहूं नकोस.—हे धरणि, ह्याला तूं आपल्या पोटांत दडपून ठेव.—तुझीं हाडें मांसानें वेष्टित नाहींत. तुझ्या अंगांतील रक्त उष्ण नाहीं. आणि जे हे डोळे वटारून तूं माझ्याकडे पहात आहेस, त्या डोळ्यांत पाहण्याची शक्ति मुळींच नाहीं.

**दर्याबाई**—आज तुम्ही सगळ्यांच्या आनंदांत विरजण घातलें आणि तुम्ही आपल्या चमत्कारिक कृतीनें सगळ्या मंडळीचा विरस करून टाकला.

**मानाजीराव**—उन्हाळ्यांतल्या ढगांचें जसें आपल्याला कांहीं वाटत नाहीं, तसें असल्या गोष्टी घडून आल्या तरी त्यांचें विशेष आश्चर्य वाटूं नये, हें संभवेल तरी कसें ? मी इतका शूर असून हा असला देखावा पाहून माझ्या तर तोंडचें पाणीच पळालें. आणि तुमच्या मुद्रेवर भीतीचें काडीइतकेंही चिन्ह दिसत नाहीं हें कसें ?

**राणोजी**—सरकार, तुमच्या काय दृष्टीस पडलें ?

**दर्याबाई**—मी तुम्हांला हात जोडतें. त्यांच्याशीं आतां ज्यास्त बोलूं नका. त्यांची तब्येत अधिकाधिकच बिघडत चाललेली दिसते. आणि तुम्ही त्यांना प्रश्न विचारलेत, म्हणजे त्यांचें डोकें ज्यास्तीच भडकेल. तेव्हां तुम्ही आतां एकदम आपापल्या घरीं जा. ह्यांनीं पुढें त्यांनीं मागें असें करीत वेळ दवडूं नका. एकदम चालते व्हा येथून कसे.

**लक्ष्मणसिंग**—येतों तर.

**दर्याबाई**—जा. ( सर्व सरदार व हुजरे जातात. )

**मानाजीराव**—तो माझा बळी घेणार ! सारें जग असें म्हणतें कीं, खुनाला खून पडलाच पाहिजे. गुप्त खून उघडकीस आणण्याकरितां—असें ह्मणतात कीं—दगड देखील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातात आणि झाडांना देखील वाचा फुटते. आणि छपून बसलेल्या खुनी माणसाचा शकुनाच्या जोरावरही छडा लागलेला आहे.—आतां किती रात्र उरली असावी ?

**दर्याबाई**—बहुतेक उजडायला झालें आहे.

**मानाजीराव**—मी बोलाविलें असतां मुकुंदराव येणार नाहीं म्हणतो, ह्यांत त्याचा काय बरें उद्देश असावा ?

**दर्याबाई**—त्याला बोलावणें पाठविलें होतें कीं काय ?

**मानाजीराव**—पाठविणार आहें. पण मी कर्णोपकर्णीं ही बातमी ऐकिली. कारण, त्यांच्यापैकीं प्रत्येकाच्या घरीं माझा गुप्त हेर ठेवलेला आहे.—उद्यां मी त्या चेटक्यांची गांठ घेण्याला जाणार. आणि तेथें गेलों, म्हणजे त्या कांहीं तरी ज्यास्ती सांगतीलच. जें काय पुढें माझें व्हायचें असेल, तें मी त्यांच्यापासून बऱ्या वाईट उपायांनीं विचारून घेणारच. माझ्या हितापुढें मी आतां कशाचीहि पर्वा करणार नाहीं. लोकांच्या मुंड्या मुरगळण्याच्या कामांत मी इतका दूरवर गेलों आहें कीं, मीं आतां मागें परत फिरणें आणि पुढें जाणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच त्रासदायक आहेत. माझ्या डोक्यांत कैक विलक्षण गोष्टी खेळत आहेत. आणि त्या सर्वांचा फारसा विचार करीत न बसतां त्या एकदम घडवून आणल्या पाहिजेत.

**दर्याबाई**—जर आपल्याला कांहीं वेळ झोंप लागेल कीं नाहीं, तर आपल्या प्रकृतीला बरें वाटेल.

**मानाजीराव**—चला, आपण निजायला जाऊं. हा रक्तपात करण्याचा अजून आपल्यावर पहिलाच प्रसंग आहे, म्हणून जरा भीति वाटते. सवईनें आपलें मन ह्या कामांतही घट्टून जाईल. ( सर्व जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

स्थळ—परशुपुर. राजवाड्यांतील दिवाणखाना.

( **लक्ष्मणसिंग** आणि दुसरा एक सरदार प्रवेश करितात. )

**लक्ष्मणसिंग**—मी मागें तुमच्यापाशीं जे उद्गार काढले होते ते आणि तुमचे विचार अगदीं एक जमले. ह्यावरून पुढलें सगळें धोरण आपल्याला बरोबर बांधतां येतें. सारांश, मोठ्या विलक्षण गोष्टी घडून येत आहेत. पहा, आपल्या दमाजीमहाराजांवर मानाजीरावाची किती तरी प्रीति होती. पण पहावें तों दमाजीराव प्राणाला मुकलेले! तसेंच आपल्या त्या शूर व्यंकोजी-रावांना काय म्हणे बाहेरून यायला रात्र झाली आणि त्यांचा मुलगा गुलाब यानेंच त्यांना ठार केलें! आणि याचें कारण काय, तर तो गुलाब फरारी झाला! फार रात्रीचें बाहेर फिरतां देखील उपयोगीं नाहीं. मल्हारराव आणि धनाजी ह्यांनीं म्हणे आपला बाप मारून टाकला! हें त्यांचें राक्षसी कृत्य नव्हे असें कोण म्हणेल? अत्यंत नीच काम! तें पाहून, अहाहा! आपल्या माना-जीरावांना किती बरें खेद झाला! तें भयंकर कृत्य पाहिल्याबरोबर त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला; आणि दारू पिऊन घोरत पडलेल्या त्या दोघां हुजऱ्यांचे त्यांनीं तुकडे तुकडे करून टाकले. हें त्यांनीं मोठ्या शूरपणाचें आणि शहाणपणाचें काम केलें असें नाहीं का तुम्हांला वाटत? कारण, ते जगते आणि म्हणते कीं, आम्हीं नाहीं खून केला, तर मग कोणाचें डोकें खवळून गेलें नसतें? मला तर वाटतें, मानाजीरावांनीं जें केलें तें फार उत्तम केलें. आणि दमाजीचे मुलगे जर त्यांच्या हातीं सांपडले असते—देव करो आणि ते त्यांच्या हातीं न सांपडोत!—तर पितृवधाचें प्रायश्चित्त कसें काय खडतर असतें हें त्यांनीं त्यांना चांगलें दाखविलें असतें. तसेंच त्या गुलाबाला देखील प्रायश्चित्त मिळालें पाहिजे होतें. पण तें जाऊं द्या.—मी असें ऐकितों कीं, कांहीं बोलाचाली झाल्यावरून, आणि या जुलमी

राजाच्या येथें त्या दिवशींच्या मेजवानीला मुकुंदराव गेला नव्हता म्हणून, त्याच्यावर इतराजी झाली आहे. तुम्हांला माहीत आहे का, मुकुंदराव कोठें आहे तें ?

**सरदार**—दमाजीला मारून त्याचें राज्य ह्या जुलमी राजानें छिनावून घेतल्यापासून त्या दमाजीचा मुलगा मल्हारराव मगधपुरांत जाऊन राहिला आहे. आणि तेथल्या राजानें त्याची अशी बरदास्त ठेविली आहे कीं, त्याजवर दुर्दैवाचा फेरा आला आहे, तरी त्याचा मानमरातब काडीइतका-ही कमी झाला आहे, असें तो राजा त्याला भासूं देत नाहीं. त्या राजाची मदत मागण्याकरतां मुकुंदराव तिकडे गेला आहे. देव करो आणि हा त्याचा हेतु सफल होवो. त्याची मदत मिळाली, तर पोटभर अन्न खायला मिळेल आणि रात्रीची स्वस्थ झोंप लागेल; एकीकडे मेजवान्या आणि एकीकडे खून ही स्थिति बंद होईल; आणि राजावर वरकांति राजनिष्ठा दाखविण्याचा आणि तोंडपुजेपणानें मातमरातब मिळविण्याचा प्रसंग चुकेल. ही बातमी ऐकून मानाजीरावाच्या अंगाचा अगदी संताप होऊन गेला आहे आणि तो लढाईच्याही तयारीला लागला आहे.

**लक्ष्मणसिंग**—त्यानें मुकुंदरावाकडे बोलावणें पाठविलें होतें काय ?

**सरदार**—होय. पण 'मी येत नाहीं !' असा त्याच्या जासुदाला जबाब मिळाला. तेव्हां जासुद पाठमोरा होऊन आपल्याशींच गुणगुणला कीं, तुम्ही असें उत्तर देतां खरें, पण ह्याचा परिणाम तुम्हांला पुढें भोगावा लागेल.

**लक्ष्मणसिंग**—ह्यावरून मुकुंदरावानें फार जपून वागलें पाहिजे. आणि त्यानें होईल तितकें दूर रहावें ह्यांतच शहाणपणा आहे. कोणी तरी जासूद मगधदेशांत पाठवून त्याला जर ही सर्व खबर कळवली, तर त्याची ह्या चांडाळाच्या त्रासांतून सुटका होऊन ह्या हतभाग्य देशाचें नशीब लवकर उघडेल.

**सरदार**— माझीही अशीच इच्छा आहे. ( सर्व जातात. )

## तिसरा अंक समाप्त.

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—एक गुहा. ( मध्यभागीं कढईखालीं जाळ पेटलेला दिसतो, व मेघगर्जना होत असतां तीन चेटक्या प्रवेश करितात. )

**पहिली चेटकी**—कढईखालतीं चांगला जाळ पेटूं द्या. कढईत पहिल्यानें दगडाच्या फटींत महिनेच्या महिने बसून राहिलेल्या विषारी बेडकाला शिजवा. बेडुकमामा डरांव डरांव, कढईच्या तेलांत मरावं मरावं !

**सर्व**—दक्षिण उत्तर, कोल्हे कुत्तर, छु छु मंतर, चलाव्च लाव् ! पेटला जाळ, तापली कढई, ढवळा ग आतां ढवळा ग !

**दुसरी चेटकी**—कावळ्याचा डोळा, सरड्याची तंगडी, म्हातारी लंगडी, ढकला यांत. बेडकीचें बोट, विंचवाची नांगी, मणभर वांगीं, ढकला यांत. कुत्र्याची जिभ, नागाची फडा, डाळीचा वडा, ढकला यांत. वाघाच्या रक्ताची, काढवा कढी, माणसांचीं मढीं, ढकला यांत.

**सर्व**—दक्षिण उत्तर, कोल्हे कुत्तर, छु छु मंतर, चलाव् चलाव् ! पेटला जाळ, तापली कढई, ढवळा ग आतां ढवळा ग !

**तिसरी चेटकी**—सुसरीची पाठ, लांडग्याचे दांत, चोराचे हात, ढकला यांत. अवसेच्या रात्रीं, तोडलेली वेल, डुकराचें तेल, ढकला यांत. मुंजाचें डोकें, बाळंतिणीचें हाड, लिंबाचें झाड, ढकला यांत.

**सर्व**—दक्षिण उत्तर, कोल्हे कुत्तर, छु छु मंतर, चलाव् चलाव् ! पेटला जाळ, तापली कढई, ढवळा ग आतां ढवळा ग !

**दुसरी चेटकी**—मला मोठी दुर्गंधि येत आहे. यावरून वाटतें, कोणी तरी पापी मनुष्य इकडे येत आहे. येऊं द्या. कांहीं हरकत नाहीं.

( **मानाजीराव** प्रवेश करतो. )

**मानाजीराव**—काय ग ए चेटक्यानों, तुम्ही ह्या मध्यान्ह रात्रीं अशा गुप्तपणानें येथें काय करीत आहां ?

**सर्व**—आम्ही जें कांहीं करतों आहों, त्याला नांव गांव कांहीं नाहीं.

**मानाजीराव**—तुमच्या परम पूज्य देवतांची तुम्हांला शपथ आहे. मी तुम्हांला आतां जे जे प्रश्न विचारतों, त्यांचीं त्यांचीं उत्तरें तुम्ही दिलींच पाहिजेत. मग तीं तुम्हांला कोणत्याही रीतीनें कळलेलीं असोत आणि त्याबद्दल कांहींही झालें तरी हरकत नाहीं. प्रचंड वारा सुटून देवळांचे कळस उलथून पडले, खवळलेल्या समुद्राच्या लाटांनीं सर्व गलबतें बुडून गेलीं, किल्लयांच्या तटाच्या भिंती गस्तवाल्यांच्या डोक्यांवर कोसळून पडल्या, राजवाडे आणि दुसऱ्या मोठमोठ्या इमारती ह्या सगळ्यांचीं शिखरें कोसळून पायाच्या दगडांवर आपटलीं, फार काय, प्रत्यक्ष प्रळयाला देखील नाश करण्याचा कंटाळा आला, तरी हरकत नाहीं. पण मी जें विचारतों, त्याचा जबाब मला मिळालाच पाहिजे.

**पहिली चेटकी**—विचार.

**दुसरी चेटकी**—तुला काय वाटेल तें विचार.

**तिसरी चेटकी**—आम्ही त्या सगळ्यांचीं उत्तरें देऊं.

**पहिली चेटकी**—पण तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें आमच्या तोंडूनच पाहिजेत, किंवा तीं पिशाचांकडून ऐकण्याची तुझी इच्छा आहे ?

**मानाजीराव**—बरें आहे. पिशाचांना हांक मारा. तीं तरी कोण आहेत तें मला पाहूं द्या.

**पहिली चेटकी**—ठीक आहे.तर मग आतां ह्या कढईत डुकराचें रक्त ओतून तुम्ही ढवळायला लागा. मी मंत्र म्हणून भूतांना हांका मारतें.—चला या रे साऱ्या भूतांनों ! हुलुलुलुलुलु ! जखणी, हडळी, खवीस, मुंजे, चेडे, पीर, ब्रह्मसंबंध, चला सारे ! चलाव् चलाव्. बीर हनुमानकी आण, बीर लछमन गोरखनाथकी आण, बीर वेताळकी आण, चलाव् चलाव् ! गुरूकी सगत, हमारी भगत, स्फुरो मंतर, ईश्वरी वाचा, सच्चा गुरूका मंतर साचा, चलाव् चलाव् !

( मेघगर्जना होते व नंतर शिरस्त्राण घातलेलें एक डोकें दृष्टीस पडतें. )

**मानाजीराव**—अरे तूं कोण आहेस हें मला जरी माहीत नाहीं, तरी मी विचारतों त्याचा जबाब तूं मला दिला पाहिजे.

**पहिली चेटकी**—तुझ्या मनांतून त्याला काय विचारायचें आहे तें त्याला ठाऊक आहे. तूं आतां अगदीं गप्प बैस आणि तो काय म्हणतो तें ऐक.

**पहिलें भूत**—मानाजीराव ! मानाजीराव ! मानाजीराव ! मुकुंदरावावर तुझें लक्ष असूं दे. त्याच्यापासून तुला भीति आहे. पुरे, इतकेंच पुरे. मी आतां जातों.

( अदृश्य होतें. )

**मानाजीराव**—तूं कोणीही ऐस, परंतु तुझ्या ह्या इषाऱ्याबद्दल तुझे माझ्यावर फार उपकार आहेत. कारण, माझ्या मनांतली भीति तूं बरोबर ताडलीस. तुला आणखी एक गोष्ट विचारायची होती.

**पहिली चेटकी**—आतां तूं कितीही हांका मारल्यास, तरी तें भूत माघारें येणार नाहीं. पण, हें पहा, पहिल्यापेक्षां अधिक बलाढ्य असें हें दुसरें भूत दिसूं लागलें !

( मेघगर्जना होते व नंतर रक्तानें भरलेलें असें एक लहान मूल दिसतें. )

**दुसरें भूत**—मानाजीराव ! मानाजीराव ! मानाजीराव !

**मानाजीराव**—मला तीन कान असते, तरी ते सारे मी तुझें म्हणणें ऐकण्याकडेच लाविले असते.

**दुसरें भूत**—तूं धीटपणानें आणि दृढ निश्चयानें खुशाल रक्तपात करीत जा. तसेंच मानवी शक्तीला तर तूं मुळींच जुमानीत जाऊं नको. कारण, मानवी स्त्रीच्या उदरांतून जन्मलेल्या कोणत्याही मनुष्याच्या हातून तुझ्या केसाला देखील धक्का लागणार नाहीं.

( अदृश्य होतें. )

**मानाजीराव**—असें असेल तर, मुकुंदराव, तूं खुशाल जीवंत रहा. तुझी भीति बाळगण्याचें मला काय कारण आहे ?—पण असें उपयोगी नाहीं. आपण अगदीं निर्धास्त झालें पाहिजे. आणि त्यासाठीं, मुकुंदराव, तूं मेलेंच पाहिजे. मग काळजाचें पाणी करून सोडणाऱ्या ह्या भीतीला कोण भीक घालतो ! मेघगर्जना होत असल्या, तरी देखील मग मी खुशाल झोंप घेत पडेन.

( मेघगर्जना होते व नंतर हातांत एक लहानसें झाड घेऊन मुकुट घातलेलें एक मूल दिसतें. )

**मानाजीराव**—अरे हें काय ! हा एखाद्या राजपुत्रासारखा कोण बरें

दिसत आहे ? आपल्या मस्तकावर राज्यलक्ष्मीचा मुकुट घालणारा हा कोण असें असावा ?

**सर्व**—तो काय म्हणतो तें ऐक मात्र. त्याच्याशीं बोलण्याची तुला परवानगी नाहीं.

**तिसरें भूत**—मानाजीराव, तुझा हा सिंहासारखा पराक्रम आणि बेगुमानपणा खुशाल चालूं दे. तुझ्या नांवानें कोण खडे फोडतो, कोण हातपाय चोळतो, आणि तुझ्या विरुद्ध कोण बंड करतो, इकडे तूं मूळींच लक्ष देऊं नकोस. त्या वीरवनांतलीं झाडें ह्या देवगडच्या टेंकडीपर्यंत चालून आलीं नाहींत, तोंपर्यंत, मानाजीराव, तुझा कधींही पराभव होणार नाहीं.

( अदृश्य होतें. )

**मानाजीराव**—ही गोष्ट कधींच घडणार नाहीं. त्या अरण्यांतील वृक्षांवर कोणाचा जोरा चालणार आहे ! जमिनींत खोल खोल गेलेलीं आपलीं पाळें मुळें उपटून काढून तुम्ही येथून निघा, असा त्या झाडांना हुकूम करणारा कोण आहे ? वा: ! हें भविष्य तर फारच नामी आहे. त्या अरण्यांतील झाडें चालूं लागेपर्यंत माझ्या विरुद्ध कोणत्याही प्रकारचे फंद फितूर होण्याची मुळींच काळजी उरली नाहीं. माझें आयुष्य आहे तेथपर्यंत मला आतां खुशाल नांदायला कांहीं हरकत नाहीं.—तरी पण अजून एक गोष्ट जाणण्याची माझ्या मनाला फार उत्कंठा आहे.—चेटक्यांनों, जर तुमच्या विद्येच्या जोरानें तुम्हांला सांगतां येण्यासारखें असेल, तर व्यंकोजीरावाचे वंशज कोणी ह्या देशच्या गादीवर बसतील काय, हें मला सांगा.

**सर्व**—जें तुला कळलें आहे, त्यापेक्षां ज्यास्त कळण्याची इच्छा तूं आतां धरूं नको.

**मानाजीराव**—कळलेंच पाहिजे मला हें. मी विचारतों तें सांगूं तर नका, कीं तुमच्यावर अनंत दु:खें कोसळलींच म्हणून समजा. मला हें सांगाच. ती कढई अदृश्य कां होत चालली ? आणि हा गलबला कसला ऐकूं येत आहे ?

( कांहीं वाद्यें वाजतात. )

**पहिली चेटकी**—दाखवा !

**दुसरी चेटकी**—दाखवा !

**तिसरी चेटकी**—दाखवा !

**सर्व**—दाखवा ! पुढें काय होणार आहे तें त्याला आपल्या डोळ्यांनीं पाहूं द्या. आणि तें पाहून त्याच्या अंतःकरणाला एकसारखी तळमळ लागून राहूं द्या. चला या रे तुम्ही. भूतांच्या रूपानें येथें येऊन एकदा ह्याच्या दृष्टीस पडा. आणि लागलेच नाहींसे व्हा.

( आठ राजे दृष्टीस पडतात. त्यांपैकीं शेवटच्या राजाच्या हातांत एक आरसा दिसतो. आणि **व्यंकोजीराव** त्यांच्या मागून येतो. )

**मानाजीराव**—अरे व्यंकोजीरावाच्या आणि तुझ्या मध्यें फारच सारखेपणा दिसतो आहे. तूं येथून नाहींसा हो. तुझ्या डोक्यावर असलेला मुकुट पाहून माझ्या डोळ्यांतील बुबुळें अगदीं करपून जात आहेत.—ह्या दुसऱ्याच्याही डोक्यावर तसलाच सोन्याचा मुकुट दिसतो आहे, आणि ह्याचे केस अगदीं पहिल्याच्या सारखे आहेत.—हा तिसरा तर अगदीं पहिल्या दोघां सारखाच हुबेहुब दिसत आहे.—अग घाणेरड्या अवदसांनों,तुम्ही मला हें कशाला दाखविलें!—अरे अजून चवथा आहेच !—छे ! आणखी हा पाहून माझे डोळे अगदीं चकित होऊन गेले. ह्यांची रांग जगाच्या प्रळयापर्यंत चालणार आहे कीं काय कोण जाणें.—आणखी एक !—अरे हा सातवा !—आतां इतःपर मी इकडे मुळींच पहाणार नाहीं.—पण हा पहा आठवा आहेच. ह्यानें तर आपल्या हातांत आरसा घेतला आहे आणि त्या आरशांत आणखी हे किती तरी राजे दिसत आहेत ! ह्यांपैकीं कोणाच्या डोक्यावर दोन दोन मुकुट दिसत आहेत. कोणाच्या हातांत तीन तीन राजदंड दिसत आहेत. फार भयंकर देखावा ! आतां माझी खात्री झाली कीं, हें सगळें खरें असलें पाहिजे. कारण, हा रक्तानें थबथबलेला व्यंकोजीराव माझ्याकडेच हसत हसत पाहून 'हे पहा माझे वंशज !' असें म्हणून हे मला दाखवित आहे.—काय ? हें खरें होणार काय ?

**पहिली चेटकी**—होय,हें सगळें असेंच होणार. पण,मानाजीराव,तूं असा गांगरून कां गेला आहेस ? या ग, आपण जरा मौज करूं या, म्हणजे त्या योगानें ह्याच्या उद्विग्न मनाला जरा आनंद होईल. तुम्ही नाचूं लागा आणि मी या हवेंतून मृदंगाचा ध्वनि निर्माण करतें. ह्या राजाचें आदरातिथ्य करण्यांत आपण कांहीं कमी केलें नाहीं, असें ह्याला वाटलें पाहिजे. ( वाद्यें वाजतात व त्या चेटक्या नाचतात आणि नंतर अदृश्य होतात. )

**मानाजीराव**—कोठें आहेत त्या ?---काय त्या नाहींशा झाल्या !— ह्यापुढें पंचांगांतून ही घटका म्हणजे कुयोगच असें लिहीत गेलें पाहिजे !--- कोण आहे रे तिकडे ? इकडे ये पाहूं. ( लक्ष्मणसिंग प्रवेश करितो. )

**लक्ष्मणसिंग**—सरकारचा काय हुकूम आहे ?

**मानाजीराव**—त्या चेटक्या तुम्ही पाहिल्यात ?

**लक्ष्मणसिंग**—नाहीं, सरकार.

**मानाजीराव**—तुह्मी उभे होतां त्या बाजूनें त्या आल्या नाहींत काय ?

**लक्ष्मणसिंग**—नाहीं, खरोखरच नाहीं, सरकार.

**मानाजीराव**—तर मग ज्या या हवेंतून त्या चेटक्या संचार करतात, ती खरोखरच बिघडलेली असली पाहिजे, आणि जे कोणी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवितील त्यांना नरकांतच गेलें पाहिजे.—मी घोड्याच्या टापा ऐकिल्या असें वाटतें. त्या कोणाच्या ? कोण बरें आलें ?

**लक्ष्मणसिंग**—सरकार, दोघे तिघे इसम घोड्यावर बसून आतांच आले. आणि त्यांनीं अशी बातमी आणली आहे कीं, मुकुंदराव मगधदेशांत पळून गेला.

**मानाजीराव**—मगधदेशांत पळून गेला ?

**लक्ष्मणसिंग**—होय, महाराज.

**मानाजीराव**—माझ्या मनांतून जीं अघोर कृत्यें करावयाचीं होतीं, त्यांची तयारी काळानेंच करून ठेविली आहे. कल्पनेच्या भरारीबरोबर जर आपण काम उरकून घेतलें नाहीं, तर हातून कांहींच होत नाहीं. आतां या घटकेपासून डोक्यांत विचार येण्याचाच काय तो अवकाश कीं हातांनीं तसें करायला लागलें पाहिजे. आणि मी बोलतों तें खरें करून दाखविण्यासाठीं त्या बाबतींत काय करायचें तें ठरल्याप्रमाणें लागलेंच करून टाकलें पाहिजे. मुकुंदरावाच्या किल्ल्यावर छापा घालून त्याचा मुलूख हस्तगत करून घेतों. आणि त्याची बायको, त्याचीं पोरें, आणि त्याचे हतभागी भाऊबंद ह्या सगळ्यांना तरवारीच्या धारेवर बळी देतों.—एखाद्या मूर्खासारखी ही पोकळ बडबड नव्हे. हा विचार डोक्यांतून नाहींसा होण्याच्या पूर्वींच हें कृत्य उरकून टाकलें पाहिजे.—पण आतां ह्या जखणींचें मात्र फिरून दर्शन नको.—बरें, ते आलेले इसम कोठें आहेत ? त्यांच्याकडे मला घेऊन चला पाहूं.

( सर्व जातात. )

## प्रवेश २ रा.

:o:

स्थळ—परशुपुर. मुकुंदरावाचे किल्यांतील एक दिवाणखाना.

( मुकुंदरावाची बायको कमळाबाई, तिचा मुलगा, आणि राणोजी प्रवेश करितात. )

**कमळाबाई**—येथून पळून जाण्यासारखें एवढें असें त्यांनीं केलें होतें तरी काय ?

**राणोजी**—मी सगळें सांगतों. पण तुम्ही जरा धीर धरा.

**कमळाबाई**—मी पुष्कळ धीर धरीन. पण त्याचा काय उपयोग ? अशा प्रसंगीं त्यांनीं धीर धरायला पाहिजे होता. तो त्यांनीं मुळींच धरला नाहीं. ते पळून गेले, हा अगदीं वेडेपणा झाला. आपल्या हातून राजद्रोहाचें कोणतेंही कृत्य झालें नसलें, तरी आपणच भ्यायला लागलों, म्हणजे दुसऱ्याला सहजच आपल्याबद्दल संशय येतो.

**राणोजी**—मुकुंदरावांनीं ही गोष्ट शहाणपणानें केली किंवा भीतीमुळें केली, ह्याबद्दल तुम्हांला कांहींच म्हणतां यायचें नाहीं.

**कमळाबाई**—शहाणपणानें ! शहाणपणाचें नांव सुद्धां नको. आपण पळून जायचें, आणि आपली बायको, आपलीं मुलें, आपला वाडा, आपली जहागीर, हीं सर्व येथें टाकून द्यायचीं, ह्यांत काय शहाणपण ? आमची त्यांना मुळींच काळजी नाहीं. मी पाहून ठेविलें आहे, त्यांच्या अंतःकरणाला मायेचा जिव्हाळा कसा तो काडीइतका देखील नाहीं. आपल्या घरट्यांतील लहानसान चिल्यापिल्यांना बहिरीससाणा नेऊं लागला, तर त्यांचीं आईबापें अतिशय क्षुद्र पक्षी असलीं, तरी तीं देखील तेथें अगदीं तुटून पडतात. कसलें काय आणि कसलें काय ! भीतीनें अगदीं गांगरून गेले. त्या भीतीपुढें आपल्या मुलाबाळांची ममता त्यांच्या मनांत सुद्धां आली नसेल. वास्तविक पळून जाण्याला कांहीं कारण नव्हतें. असें असून ते पळाले, ह्यांत शहाणपण कसलें आलें आहे !

**राणोजी**—बाई, तुम्हांला मी किती समजून सांगूं ? जरा मन आवरून धरा. मुकुंदरावांच्याबद्दल मी तुम्हांला सांगतों कीं, ते मोठे उदार, शहाणे, आणि विचारी आहेत. आणि कोणच्या वेळीं कसें वागावें, हें

त्यांना उत्तम समजतें. ह्या बाबतींत ज्यास्त बोलतां येत नाहीं. पण एवढें लक्षांत ठेवा कीं, काळ मोठा कठिण आला आहे. राजद्रोह आपल्या स्वप्नांत सुद्धां नसून आपण राजद्रोही ठरतों. कशाची तरी भीति वाटत असते, पण ती कशाची हें समजत नाहीं. आणि त्या भीतीमुळें हव्या त्या कंड्या खऱ्या वाटतात. आणि खवळलेल्या समुद्रामधील गलबताप्रमाणें इकडून तिकडे आणि तिकडून इकडे अशी आपल्या मनाची तारांबळ उडून जाते. असो. आतां तुमची रजा घेतों. थोडक्या वेळांत मी परत येईन. बाळा, देव तुझें कल्याण करो !

**कमळाबाई**—ह्याला बाप असून एकाद्या पोरक्या पोराप्रमाणें ह्याची अवस्था झाली आहे.—बाळा, ते तुला टाकून गेले ! आतां तूं कसें करशील ? तूं आपला जीव कसा वांचविशील ?

**मुलगा**—अग आई, लहान लहान पाखरें देखील नाहीं कां आपलें पोट भरीत ? तसें मी भरीन.

**कमळाबाई**—पाखरें किडे आणि माशा खातात. त्या कां तूं खाणार आहेस ?

**मुलगा**—इश्श ! तसें नव्हे ग आई. त्यांना जें मिळतें तें जसें तीं खातात, तसें मला जें मिळेल तें मी खाईन.

**कमळाबाई**—पण, बाळा, त्या पाखरांना धरण्यासाठीं कोठें जाळीं पसरलेलीं असतात, कोठें झाडांच्या खांद्यांना गोंद लाविलेला असतो, कोठें खड्डे खणलेले असतात, आणि कोठें सांपळे लाविलेले असतात. त्यांत तीं लहान लहान पाखरांचीं पिलें अडकून पडतात. तसा तूं पडलास, तर मग, बाळा, कसें रे होईल ?

**मुलगा**—आई, मला त्याची भीति कशाला पाहिजे? गरीबगुरीब पाखरांना धरण्याची कोणी खटपट करीत नाहीं. आई, कांहीं म्हण, पण मला खास वाटतें कीं, माझे बाबा लवकरच परत येतील. आई, माझे बाबा राजद्रोही होते काय ग !

**कमळाबाई**—होय.

**मुलगा**—आई, राजद्रोही म्हणजे काय ग ?

**कमळाबाई**—जो राजनिष्ठेची शपथ वहातो आणि मोडतो तो.

**मुलगा**—असें जे जे करितात, ते सगळे राजद्रोहीच कां ?

**कमळाबाई**—होय. आणि अशा सगळ्यांना फांशीं द्यायची वहिवाट आहे.

**मुलगा**—तर मग जे शपथा घेतात आणि मोडतात, त्या साऱ्यांना फांशीं द्यायचें !

**कमळाबाई**—हो, साऱ्यांना हो !

**मुलगा**—आणि ह्यांना कोण फांशीं देणार ?

**कमळाबाई**—जे प्रामाणिक लोक असतील ते.

**मुलगा**—अं: ! तर मग शपथ घेऊन ती मोडणारांना कांहींच समजत नाहीं, असें म्हटलें पाहिजे. कारण, शपथ घेऊन ती मोडणारे लोक इतके पुष्कळ आहेत कीं, ते प्रामाणिक लोकांना ठोकून काढून सहज फांशीं देतील.

**कमळाबाई**—ऐक, उगीच बैस. वेड्यासारखी किती बडबड करतो आहेस ? पण, बाळा, त्यांच्यावांचून तुझें कसें रे होईल ?

**मुलगा**—बाबा कांहीं आपल्याला टाकून गेले नाहींत. तूं कुठे रडतेस ?

**कमळाबाई**—काय ग बाई तरी बोलतो आहे हा !

( एक जासूद प्रवेश करतो. )

**जासूद**—बाईसाहेब, तुम्ही मला ओळखीत नाहीं. पण मी तुम्हांला ओळखतों. आणि म्हणूनच मी तुम्हांला हें सांगायला आलों आहें कीं, तुमच्यावर थोडक्याच वेळांत कांहीं संकट गुदरणार आहे. माझ्यासारख्या गरीब माणसाचा सल्ला तुम्ही ऐकाल, तर तुम्ही येथें राहूं नये हें बरें. आपलीं मुलेंबाळें घेऊन येथून दुसरीकडे कोठें तरी जा. ही बातमी सांगून तुमच्या मनांत धडकी भरवणें हें फार वाईट आहे, हें मी समजतों. पण ह्याच्याहून फार भयंकर प्रसंग तुमच्यावर येणार आहे, तो टाळण्यासाठीं मी हें तुम्हांला सांगतों. देव तुमचें रक्षण करो म्हणजे झालें. मला आतां येथें राहतां येत नाहीं. (जातो.)

**कमळाबाई**—मी आतां कोठें तरी पळून जाऊं ? मीं अपराध तर कोणताच केला नाहीं.—पण आतां माझ्या लक्षांत आलें कीं, मी ह्या मृत्युलोकांत आहें ! आणि येथें पुष्कळ वेळां अपराध करणें हेंच स्तुत्य मानलें जातें, आणि सद्धर्मानें वागणें म्हणजे फार भयंकर तऱ्हेचा मूर्खपणा

आहे असें समजलें जातें. शिव ! शिव ! असें आहे, तर मग 'मीं अपराध केला नाहीं,' असें म्हणण्यांत काय फायदा आहे ? हे कोण लोक हे !

( मारेकरी प्रवेश करितात. )

**मारेकरी**—तुझा नवरा कोठें आहे ?

**कमळाबाई**—तुझ्या सारख्याच्या हातीं लागणार नाहींत अशा ठिकाणीं ते आहेत.

**मारेकरी**—तो राजद्रोही आहे.

**मुलगा**—तूं खोटें बोलतोस. हरामखोरा, ते तसे नाहींत.

**मारेकरी**—काय ? हा पोर काय म्हणतो आहे ? ( त्याला तरवारीनें जखम करितो. ) राजद्रोहाचा अंकुर ह्याच्यांत सुद्धां उगवत होता.

**मुलगा**—आई, ह्यानें मला मारलें ग मारलें. तूं तरी आतां येथून पळून जा. ( मरतो. )

( 'खून रे खून !' असें ओरडत **कमळाबाई** जाते व मारेकरी तिचा पाठलाग करीत जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—मगधदेशांतील राजवाड्यासमोर.

( **मल्हारराव** आणि **मुकुंदराव** प्रवेश करतात. )

**मल्हारराव**—चला कोठें तरी एका बाजूला. एखाद्या झाडाच्या सावलींत जाऊन बसूं या. आणि आपल्या अंतःकरणांत जीं दुःखें सांचलीं आहेत, तीं एकमेकांना सांगून पोटभर रडूं या. दुसरें काय करायचें ?

**मुकुंदराव**—काय करायचें ? शत्रूच्या प्राणाचा घास घेणारी तरवार हातांत धरून आपल्या ज्या जन्मसिद्ध हक्कांची पायमल्ली होत आहे ते आपण परत मिळवूं या. प्रत्येक दिवशीं नवीन नवीन विधवा हंबरडे फोडीत आहेत, नवीन नवीन पोरकीं पोरें आक्रोश करीत आहेत, आणि नवीन नवीन दुःखें आपणांवर कोसळल्यामुळें लोक परमेश्वराची करुणा भाकीत आहेत. आणि ह्या सगळ्या आक्रोशांचा जो प्रतिध्वनि गगनतलापासून उत्पन्न होतो, तो

ऐकला म्हणजे असें वाटतें कीं, आपल्या देशाप्रमाणेंच ह्या आकाशालाही दुःख होत आहे कीं काय कोण जाणें !

**मल्हारराव**—ह्या जुलमी राजाला सर्व लोक पूर्वी अतिशय न्यायी म्हणून समजत असत. दुसऱ्यांचें कशाला ? तुमची स्वतःचीही त्याच्यावर फार भक्ति असे. त्याच्या जुलमांची गदा अजून तुमच्यावर खास पडली नसावी. —मी अजून तरुणच आहें. तरी पण मला जर तुम्ही त्याच्या स्वाधीन करून दिलें, तर त्याची मर्जी तुमच्यावर मोठी बहाल होईल. शिवाय, ह्या क्षुब्ध झालेल्या देवतेला शांत करण्यासाठीं माझ्यासारख्या अशक्त, गरीब, आणि निरुपद्रवी कोंकराची आहुति दिल्याबद्दल तुमच्या शहाणपणाचीही मोठी ख्याति होईल.

**मुकुंदराव**—मी असा विश्वासघातकी मनुष्य नाहीं.

**मल्हारराव**—पण मानाजीराव आहे. एखाद्या माणसाचा चांगला आणि सद्गुणी स्वभाव असला, तरी राजाच्या मर्जीपुढें तें सगळें लटपटून जातें. पण मी तुमची माफी मागतों. मी तुम्हांला कांहीं म्हटलें, तरी तुमचा जो खरा स्वभाव असेल तो बदलतो असें नाहीं. एकादी अतिशय चमकणारी वस्तु कांच ठरेल, पण रत्नें हीं चमकायचींच. जरी सर्व दुर्गुणांनीं सद्गुणांचा पेहराव केला, तरी सद्गुणांचा पेहराव कायमंच असायचा.

**मुकुंदराव**—माझी अगदीं निराशा झाली !

**मल्हारराव**—मला तुमची शंका आली हें तर तुमच्या निराशेचें कारण नव्हेना ?—पण तुम्ही आपल्या बायकामुलांचा निरोपही न घेतां इतक्या गडबडीनें त्यांना टाकून आलां हें कसें ?—पण तेंही असो. माझी तुम्हांला एवढीच विनंति आहे कीं, मला जो आतां संशय आला आहे, तो तुमचा अपमान करण्यासाठीं नव्हे, तर माझ्या स्वतःच्या संरक्षणासाठीं होय, असें तुम्ही समजा. मला काय पाहिजे तें वाटो, त्याच्या योगानें तुमच्या प्रामाणिकपणाला काडीइतकाही बाध येत नाहीं.

**मुकुंदराव**—हे माझ्या हतभाग्य देशा ! वाहूं दे ! अजून तुझ्या अंगांतील रक्त असेंच वाहिलें पाहिजे ! अरे, जुलमी राजा, तुझ्या जुलमाचा पाया दृढ होऊं दे. कारण, तुझा बीमोड करण्याची चांगल्या चांगल्या माणसांना देखील छाती होत नाहीं. तुझे अन्याय असेच चालू देत. तुझा गादीवरील

हक्क कायम ठरला. चालू दे आतां पाहिजे तेवढा जुलूम!—महाराज, रामराम! तुह्मांला देव सुखी राखो. त्या जुलमी राजाच्या ताब्यांत जेवढें राज्य आहे तेवढें सगळें—इतकेंच नव्हे, तर आणखी ती सोन्याची लंकाही—जरी मला कोणी दिली, तरी देखील तुह्मांला वाटतें आहे तसलें दुष्ट मांगाचें काम माझ्या हातून कधींही व्हायचें नाहीं.

मल्हारराव—तुम्ही रागावूं नका. तुम्ही माझ्याशीं विश्वासघात कराल, एवढ्याच भीतीनें केवळ मी तुमच्याशीं असें बोललों असें समजूं नका. त्या जुलमी राजानें ठेविलेल्या जोखडाखालीं आपल्या देशांतील लोकांच्या माना मोडून गेल्या आहेत, हें मी समजतों. तेथील लोक ढळढळां रडत आहेत, त्यांच्या रक्तांचे पाट वहात आहेत, आणि प्रत्येक दिवशीं त्यांच्या अंगाला नवीन नवीन जखमा पडत आहेत, हें मला कळतें. तसेंच मी गादीला हक्क सांगूं लागलों, तर माझ्या बाजूनेंही पुष्कळ लोक शस्त्र घेऊन उठतील, हें मला माहीत आहे. ह्या मगधदेशाच्या राजाकडून सुद्धां लागेल तितकी फौज देण्याबद्दल मला वचन मिळालेलें आहे. आणि आतां कल्पना करा कीं, त्या जुलमी राजाचें डोकें मी आपल्या पायाखालीं तुडविलें, किंवा आपल्या तरवारीच्या टोंकावर धरून नाचविलें,—इतक्या स्थितीला गोष्ट आणली,—तरी पण त्या जुलमी राजाच्या पाठीमागून जो गादीवर बसेल, त्याच्या हातून माझ्या देशाला अधिक संकटें भोगावीं लागतील. आणि जे दुर्गुण आतां तेथें नाहींत त्यांचा तेथें अनिवार फैलाव होईल.

मुकुंदराव—ह्याच्या पाठीमागून गादीवर बसणारा असा कोण तो?

मल्हारराव—मीच तो. आणि माझ्या अंगांत—मला पक्कें ठाऊक आहे—सर्व प्रकारचे दुर्गुण अगदीं ओतप्रोत भरलेले आहेत. आणि त्यांचा प्रभाव जेव्हां दृष्टोत्पत्तीस येऊं लागेल, तेव्हां हा महापातकी मानाजीराव देखील माझ्याशीं तुलना करून पाहिली असतां अगदीं धुतल्या तांदुळासारखा निष्कलंक तुह्मांला वाटूं लागेल. आणि माझ्या दुर्गुणांचे बेसुमार चाळे पाहिले, ह्मणजे मानाजीराव हा अगदीं गरीब कोंकरूं होतें असें लोकांना वाटेल.

मुकुंदराव—आजपर्यंत नरकामध्यें जे असंख्य पातकी प्राणी तडफडत पडले असतील, त्यांत सुद्धां मानाजीरावापेक्षां अधिक पातकी दुसरा कोणी मिळायचा नाहीं.

*मल्हारराव*—*मी कबूल करतों कीं, मानाजीराव हा लबाड, उग्र,* मत्सरी, आणि क्रूर आहे. मी असें देखील ह्मणतों कीं, जें जें पातक जगांत प्रसिद्ध आहे, तें तें मानाजीरावानें केलें असलें पाहिजे. तरी पण माझे जे ऐषआराम आहेत, त्यांना तर सीमाच नाहीं. तुमच्या बायका, मुली, आणि दासी, ह्या सगळ्यांचा उपभोग मला मिळाला, तरीही माझी कामवासना तृप्त होणार नाहीं. आणि ह्या कामांत माझ्या विषयसुखाला जे जे प्रतिबंध येतील, ते ते झुगारून देऊन मी आपली इच्छा पूर्ण केल्यावांचून कधींही राहणार नाहीं. तेव्हां असला माझ्यासारखा राजा राज्य करण्याला असण्यापेक्षां मानाजीराव चांगला नव्हे काय ?

**मुकुंदराव**—कोणच्याच कामांत अमर्याद बेफामपणा असणें चांगलें नाहीं. ह्याच्या योगानें पुष्कळ राजे लयाला गेले आणि शेकडों राजे आपल्या-गादीला मुकले. तरी पण वंशपरंपरेच्या हक्कानें जी आपली गादी आहे, तिच्यावर बसण्याला आपण अनमान करूं नये. तुह्मांला ऐषआराम करायचे असतील, तर ते खुशाल करा. पण त्यांबद्दल बाह्यात्कारी जरा औदासीन्य दाखवा. ह्मणजे तुमच्या त्या सगळ्या चैनबाजीवर चांगलें पांघरूण पडेल. तुमच्या सेवेला तत्पर अशा पुष्कळ अविवाहित स्त्रिया आमच्या देशांत आहेत. आणि त्या सर्व आपली वासना तृप्त करण्याला पुरेशा होणार नाहींत, इतका कामाग्नीचा भडका आपल्या हृदयांत पेटला असेल, असें मला वाटत नाहीं.

**मल्हारराव**—माझ्या अंगांत एवढाच दुर्गुण आहे असें नाहीं, तर माझा स्वभाव पराकाष्ठेचा लोभी आहे. मी जर राजा झालों, तर माझ्या राज्यांतील जहागिरदारांच्या जमिनी माझ्या ताब्यांत याव्या, ह्या हेतूनें मी त्यांना ठार केल्यावांचून कधींही सोडणार नाहीं. ह्याचा जवाहिरखाना बळकावून घ्यावा, त्याचा वाडा हस्तगत करून घ्यावा, अशी इच्छा मला झाल्यावांचून राहणार नाहीं. आणि जसजसें अधिक मिळत जाईल, तसतशी माझी भूकही अधिक वाढत जाणार. आणि मग मी धर्मशील आणि राजनिष्ठ अशा लोकांशीं देखील मुद्दाम अन्यायानें कांहीं तरी कुरापत काढून त्यांना रसातळाला पोंचवून त्यांच्या द्रव्याचा अपहार केल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

**मुकुंदराव**—कामवासनेपेक्षां ह्या लोभाचीं पाळेंमुळें हृदयांत फार खोलपर्यंत जातात, आणि तीं एकदा गेलीं म्हणजे निघतां निघत नाहींत. आजपर्यंत जे राजे प्राणाला मुकले त्यांचा घात करणारें हेंच शस्त्र होय. तरी पण ह्याबद्दलही आपल्याला फारशी काळजी नको. आपल्या लोभाची तृप्तता करण्याइतकें द्रव्य आपल्या देशांत भरपूर आहे. आपल्या अंगांत जे दुसरे अनेक गुण आहेत तिकडे लक्ष पोंचविलें, म्हणजे हे दुर्गुण सह्य आहेत असें मानण्याला कांहीं हरकत नाहीं.

**मल्हारराव**—पण माझ्या अंगांत तुम्ही म्हणतां तसा एकही गुण नाहीं. न्याय, खरेपणा, नेमस्तपणा, दृढनिश्चय, औदार्य, उद्योग, दया, नम्रपणा, भक्ति, सहनशीलता, धैर्य, शौर्य, इत्यादि राजाला शोभविणारे जे सद्गुण त्यांचा माझ्या ठिकाणीं गंधही नाहीं. सर्व प्रकारच्या दुर्गुणांनीं मात्र मी ओतप्रोत भरलेला आहें. फार कशाला, माझ्या हातांत जर सत्ता आली, तर पृथ्वीच्या पाटीवर जो कांहीं मित्रपणा आहे तो सगळा मी लयाला घालवीन, चोहोंकडे जी शांतता नांदत आहे ती मी उद्ध्वस्त करून टाकीन, आणि एकी हा पदार्थ देखील कोणाच्या नजरेस पडूं देणार नाहीं !

**मुकुंदराव**—हर हर ! हे माझ्या देशा, तर मग तूं खरोखरच हतभागी आहेस !

**मल्हारराव**—मी सांगितलें असा हा मी आहें. असला मनुष्य तुमच्यावर राज्य करण्याला योग्य असेल तर सांगा.

**मुकुंदराव**—राज्य करण्याला ? जिवंत राहण्यालाही योग्य नाहीं ! —अरे माझ्या हतभाग्य देशा ! ज्याचा तुझ्यावर राज्य करण्याला कांहींही हक्क नाहीं, असा तो चांडाळ लोकांचे गळे कापून तुझ्यावर अम्मल करीत आहे. त्यांतून सुटून तुला सुखाचे दिवस कधीं रे पहावयाला मिळतील ? कारण, तुझ्या सिंहासनावर बसण्याचा वाजवी रीतीनें ज्याला अधिकार आहे, असा हा मल्हारराव तर आपल्याच तोंडानें आपल्या दुर्गुणांचा पाडा वाचून दाखवून आपलें बदनाम करून घेत आहे, आणि आपल्या कुळालाही कलंक लावून घेत आहे.—आपले वडील मोठे साधु पुरुष होते. आणि जिनें आपल्याला जन्म दिला, ती आपली आईही नेहमीं परमेश्वराच्या भजनांत व्यग्र होऊन तपश्चर्येनें आपला देह झिजवीत असे. असो.

राम राम! येतों आतां. तुम्ही आपल्या दुर्गुणांचें हें जें वर्णन केलें, तें ऐकिल्यापासून मला आतां आपल्या देशांत परत जाण्याची आशा तिळमात्रही उरली नाहीं. ह्या तुमच्या दुर्गुणांनीं मला तेथून हद्दपारच केलें, असें म्हटलें पाहिजे. हृदया, तुझ्या सर्व आशेची समाप्ति येथें झाली!

**मल्हारराव**—मुकुंदराव, मनांत खरेपणा असल्यावांचून एरवीं इतका देशभक्तीचा उमाळा कोणालाही यायचा नाहीं. आणि ह्याच्या योगानें माझ्या मनांतील सर्व संशय नाहींसा होऊन तुमच्या खरेपणाबद्दल आणि प्रामाणिकपणाबद्दल माझी पूर्ण खात्री झाली. मला आपल्या ताब्यांत आणून घेण्यासाठीं त्या मायावी मानाजीरावानें असल्या युक्त्या पुष्कळ वेळां केल्या होत्या. आणि म्हणून मी नेहमीं फार बेताबातानें वागतों आणि सहसा कोणावर विश्वास ठेवीत नाहीं. पण आतां ईश्वराला साक्ष ठेवून असें सांगतों कीं, तुम्ही सांगाल त्याप्रमाणें वागण्याला मी आतां देखील तयार आहें. मी आपले जे दुर्गुण सांगितले, ते सर्व खोटे. माझ्या मनांत त्या दुर्गुणांचा गंधही नाहीं. स्त्रीसंग कसा तो अद्यापि मला माहीत देखील नाहीं. मी कधीं खोटी शपथ वाहिली नाहीं. माझ्या स्वतःच्या मालकीच्या म्हणून ज्या वस्तु आहेत, त्यांचा सुद्धां माझ्या मनांत लोभ नाहीं; मग इतरांची गोष्ट कशाला? मी कोणाचा विश्वासघात केला नाहीं. आणि प्रत्यक्ष सैतान जरी माझ्यावर विश्वास ठेवून माझ्या आश्रयाला येऊन राहील, तरी त्याला देखील मी दुसऱ्याच्या हवालीं करणार नाहीं. माझा जीव आणि खरेपणा हे दोन्ही मला सारखेच प्यारे आहेत. आणि मी जन्मास आल्यापासून जर कांहीं खोटें बोललों असेन, तर तें मी आपल्याबद्दल आतां जें बोललों तेवढेंच काय तें. हें माझें खरें स्वरूप आहे. आतां माझा दुर्दैवी देश आणि तुम्ही मला जी आज्ञा कराल, त्याप्रमाणें वागण्याला मी सिद्ध आहें. तुम्ही येथें येण्याच्या पूर्वीच दहा हजार हत्यारबंद फौज घेऊन शिवदेवराव नांवाचे सरदार त्या मानाजीरावावर स्वारी करण्याकरितां आज निघणार, असें ठरलें होतें. परंतु आतां आपण सगळे जण बरोबरच निघूं. आणि आतांच्या आपल्या भांडणाचा परिणाम जसा गोड झाला, तसाच ह्या लढाईचाही होवो.—पण तुम्ही असे स्तब्ध कां?

**मुकुंदराव**—असल्या उद्वेगजनक आणि आनंददायक गोष्टी एकदम ऐकल्यामुळें मन अगदीं घोटाळून गेलें आहे.

( राणोजी प्रवेश करतो. )

**मुकुंदराव**—हा कोण बरें येत आहे इकडे ?

**मल्हारराव**—हा कोणी तरी माझा देशबंधुच असला पाहिजे, पण अमुकच असें मला ओळखत नाहीं.

**मुकुंदराव**—या या तुम्ही. कसें काय ठीक आहेना ?

**मल्हारराव**—आतां मी यांना ओळखलें. देवा, आम्हीं सगळे एका देशांतले असून आम्हीं एकमेकांची ओळख देखील विसरून जाण्याचा आम्हांवर प्रसंग यावा ना ! देवा, ही स्थिति तूं लवकर दूर करशील तर बरें होईल.

**राणोजी**—माझीही देवापाशीं अशीच विनंति आहे.

**मुकुंदराव**—कसें काय ? आपल्या देशाची होती तीच स्थिति कायम आहेना !

**राणोजी**—आपला देश, खरोखर तुम्हांला सांगतों, फुटक्या नशिबाचा आहे. आपला देश ही आपली आई, असें म्हणण्याची आतां सोय उरली नाहीं; तर ती आपली सगळ्यांची स्मशानभूमिच झाली आहे. तेथें जेवढे शंखशिरोमणि म्हणून आहेत, तेवढ्यांची मात्र सडकून चैन चालली आहे. बाकी कोणाच्या तोंडावर काडी इतकेंही तेज राहिलें नाहीं. तेथें कोणाला दुःखाचे हुंदके येत आहेत, कोणी तेथील अन्यायामुळें आक्रोश करीत आहेत आणि कोणी तेथील जुलमामुळें किंकाळ्या फोडीत आहेत. अशा प्रकारच्या दुःखाच्या विलापांनीं सगळें आकाश दणाणून गेलें आहे. तरी पण त्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. तेथें कोणी दुःखानें तडफडत असलेला दृष्टीस पडला, तरी त्यांत कोणाला कांहीं विशेष वाटत नाहीं. भ्रमिष्ट होऊन बडबडतो आहे, असें उलटें त्याला म्हणतात. कोणी मनुष्य मेला, तर हा कोण मेला, कशानें मेला, ही सुद्धां कोणी चौकशी करीत नाहीं. कारण, जुलमाच्या योगानें जेथें असंख्य प्राणी रोज मरणार, तेथें कोण कोणाची चौकशी करतो ! जो आतां जीवंत आहे, तो घटकेनें जीवंत असेलच, अशी खात्री नाहीं. दुखणें नाहीं, बाणें नाहीं, तरी पण एकाएकीं माणसें नाहींशीं होतात.

**मुकुंदराव**—तुम्ही सांगतां अशीच हकीकत असली पाहिजे. ह्यांत काडीमात्र संशय नाहीं.

**मल्हारराव**—बरें, आतां अगदीं ताजा जुलूम लोकांवर कोणता होत आहे ?

**राणोजी**—ताजा म्हणून कोणता सांगू ? एक घटकेच्या मागचा म्हणून सांगूं लागलों, तरी तो देखील अगदीं शिळा झालेला असतो. कारण, प्रत्येक क्षणाला नवीन नवीन जुलूम चालले आहेत.

**मल्हारराव**—आणखी काय तिकडची खबर आहे ?

**राणोजी**—मी इकडे येत होतों, तों वाटेनें पुष्कळ चांगल्या लोकांच्या तोंडून मी अशी बातमी ऐकिली कीं, मानाजीराव आपलें सैन्य घेऊन लढाई देण्यासाठीं निघाला आहे. मला ह्याबद्दल शंका वाटत होती. पण तें मानाजीरावाचें सैन्य जेव्हां मी आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें, तेव्हां माझा त्या बातमीवर विश्वास बसला. आतां आम्हांला आपण मदत करण्याची हीच वेळ आहे. तुम्ही आपल्या देशांत आलां, म्हणजे पाहिजे तेवढे लढवय्ये लोक तुमच्याभोंवतीं जमतील, आणि आपल्यावर आलेल्या संकटाचें निवारण करण्यासाठीं बायका देखील लढाई करण्याला तयार होतील.

**मल्हारराव**—आम्ही तिकडे कूच करण्याच्या तयारींतच आहों, हें ऐकून लोकांना समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. ह्या मगध देशाच्या राजानें आपला उत्तम सरदार शिवदेवराव आणि दहा हजार सैन्य आम्हांला दिलें आहे. शिवदेवरावांसारखा अनुभवी आणि शूर शिपाई साऱ्या दुनियेंत मिळणें कठिण आहे.

**राणोजी**—आपण मला ही जशी आनंदाची बातमी सांगितली, तशी मलाहि जर आपल्याला सांगतां आली असती, तर बरें झालें असतें. पण माझ्या कपाळीं तसला योग नाहीं. मी जी बातमी आणली आहे, ती जेथें कोणी ऐकणार नाहीं अशा एखाद्या रानांत उच्चारण्याजोगी आहे.

**मुकुंदराव**—ती कोणाच्याबद्दल आहे ? सगळ्या देशाच्या संबंधाची आहे, किंवा कोणा एखाद्या विशेष व्यक्तीबद्दल आहे ?

राणोजी—जो जो मनुष्य प्रामाणिक आहे, त्याला ती ऐकून वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. तरी पण ती मुख्यत्वेंकरून तुमच्याच संबंधाची आहे.

मुकुंदराव—जर ती माझ्याबद्दलची आहे, तर माझ्यापासून ती दडवून ठेवूं नका. ती मला कळूं द्या.

राणोजी—आजपर्यंत तुमच्या कानांनीं कधींहि ऐकिले नाहींत, असे कठोर शब्द माझी जिव्हा उच्चारणार आहे. पण त्याबद्दल तुम्ही माझा तिरस्कार करूं नका.

मुकुंदराव—हं! मी जागलें, तुम्ही काय सांगणार तें!

राणोजी—तुमच्या किल्ल्यावर छापा घालून तो शत्रूनें हस्तगत करून घेतला आणि तुमच्या बायकामुलांची फार निर्दयपणानें कत्तल उडविली!

मल्हारराव—परमेश्वरा, तुला त्या अनाथांची कशी रे दया आली नाहीं!—मुकुंदराव, तुम्ही असे कपाळावर हात देऊन स्तब्ध बसूं नका. तुमच्या मनांत जें दुःख सांचलें असेल, तें शब्दांनीं व्यक्त करा. असें केलें नाहीं, तर दुःखानें भरून गेलेल्या अंतःकरणांत शोक धुमसत रहातो आणि त्या योगानें हृदय फुटून जातें!

मुकुंदराव—माझीं मुलें मारलीं!

राणोजी—होय!

मुकुंदराव—आणि मी त्यांचें संरक्षण करण्याला जवळ नसावें! माझ्या बायकोला देखील मारलें?

राणोजी—होय!

मल्हारराव—जरा धीर धरा. हें जें आपल्याला पराकाष्ठेचें दुःख होत आहे, ह्या रोगावर उत्तम औषध म्हटलें म्हणजे ह्याचा सूड उगवणें हेंच होय.

मुकुंदराव—याला कांहीं मुलें बाळें नाहींत. मग मुलें मेलीं असतां बापाला कसें दुःख होतें हें त्याला कोठून कळणार? माझीं तीं सगळीं लहान लहान मुलें त्यानें मारलीं? तुम्ही काय सांगितलें? सगळीं मारलीं म्हणून? अरेरे चांडाळा! अरे नरकांतल्या गिधाडा, माझीं सगळीं चिलींपिलीं आणि त्यांची आई ह्यांना तूं एका भयंकर झडपेसरशी उचलून नेलेंस काय!

मल्हारराव—ह्याचा जाब मानाजीरावाला मर्दासारखा विचारा.

**मुकुंदराव**—समरांगणांत तो विचारीनच. परंतु सध्या माझ्यानें माझा शोक आवरून धरवत नाहीं. जीं माणसें माझीं अतिशय लाडकीं होतीं, त्यांची मला फिरून फिरून आठवण होते ! काय करूं ? हें कृत्य झालें तेव्हां परमेश्वर तें पहात नव्हता का ? आणि पहात असून तो त्यांचें संरक्षण करण्याला धांवला नाहीं कसा ? अहा रे चांडाळा मुकुंदरावा, तुझ्यासाठीं तीं सगळीं बिचारीं प्राणाला मुकलीं ! शिव शिव ! सर्व अपराध माझा ! त्यांचा तिळ-प्रायहि नाहीं ! असें असून माझ्यासाठीं त्यांच्या देहाचे तुकडे तुकडे झाले ! देवा, आतां स्वर्गलोकांत तरी त्यांना सुख लागूं दे !

**मल्हारराव**—हें दुःख नव्हे, तर ही तुमची तरवार पाजविण्याची सहाणच आहे असें समजा. मनांतील दुःख सोडून द्या आणि तेथें क्रोधाचा संचार होऊं द्या. तुमच्या अंतःकरणांतील त्वेष मंद होऊं देऊं नका. तो चांगला प्रज्वलित करा.

**मुकुंदराव**—डोळ्यांतून बायकांसारखीं एकीकडे टिपें टाकीत असून तोंडानें मात्र वल्गना करीत बसण्यात आतां कांहीं हंशील नाहीं. देवा, आतां तुझ्यापाशीं हेंच मागणें आहे कीं, त्याची माझी गांठ पडण्याला विलंब लावूं नको. त्या सैतानाची आणि माझी समोरासमोर एकदा गांठ घालून दे. माझ्या तरवारीच्या आटोक्यांत त्याला येऊं दे, आणि मग तो कसा जिवंत राहतो तें मी पाहतों.

**मल्हारराव**—आतां मर्दासारखें बोललां. चला, आपण महाराजांकडे जाऊं. आपलें सैन्य तयार आहे. महाराजांचा निरोप घेऊन निघण्याचाच काय तो अवकाश आहे. मानाजीरावाच्याहि पापाचे घडे भरत आले आहेत. आणि त्याचें पारिपत्य करण्याची प्रेरणा परमेश्वरानें आपल्या अंतःकरणांत केली आहे. ह्यांतच तुम्ही आतां आनंद मानून घेतला पाहिजे. कारण, असा आनंद मानला नाहीं, तर हा शोक कधींच संपायचा नाहीं.

( सर्व जातात. )

**चवथा अंक समाप्त.**

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थळ—देवगडच्या किल्ल्यांतील एक दिवाणखाना.

( वैद्य आणि दासी प्रवेश करितात.)

**वैद्य**—तुझ्याबरोबर मी दोन रात्रीं येथें जागत बसलों, पण तूं सांगतेस त्यांत कांहीं तथ्य आहे असें कधींच आढळून आलें नाहीं. त्या झोंपेंतून उठून चालल्याला आज किती दिवस झाले ?

**दासी**—आपले महाराज लढाईला निघून गेल्यापासून मी हें पाहतें आहें. बाईसाहेब आपल्या बिछान्यावरून उठतात, आपली शालजोडी पांघरतात, आपल्या रंगमहालाची कडी काढतात, आणि मग कागद घेऊन त्याची घडी घालून त्याच्यावर कांहीं लिहितात, तें वाचतात आणि मग तें पत्र मोहोरबंद करून फिरून आपल्या बिछान्यावर जाऊन निजतात. आणि हा सगळा कारभार झोंपेंतच चाललेला असतो !

**वैद्य**—गाढ झोंप येत असून जागें असल्याप्रमाणें ज्यापेक्षां सर्व व्यवहार होतात, त्यापेक्षां ह्यांच्या मनाला फारच अस्वस्थता उत्पन्न झालेली असली पाहिजे. बरें, झोंपेंत असतांना ह्या चालूं लागतात आणि हे कारभार करतात हें एक झालें, पण ह्याशिवाय एकादे वेळीं त्या कांहीं बोलतात काय ?

**दासी**—होय. पण मी तें तुम्हांला सांगणार नाहीं.

**वैद्य**—माझ्यापाशीं तें सांगायला हरकत नाहीं. तूं तें सांगितलेंस तर बरें होईल.

**दासी**—मी जें ऐकिलें आहे, तें दुसऱ्या कोणीहि ऐकलें नसल्यामुळें तें कोणाला खरें देखील वाटणार नाहीं. त्यापेक्षां तें न सांगितलेलेंच बरें. ह्या पहा. ह्या इकडेच येत आहेत.

( हातांत दिवा घेऊन दर्याबाई प्रवेश करिते. )

हाच ह्यांचा नेहमींचा पोषाक. आणि मी खात्रीनें सांगतें, ह्या अगदीं गाढ झोंपेंत आहेत. आतां जवळ उभे राहून नीट लक्ष लावून पहा.

वैद्य---ह्यांना हा दिवा कोठून मिळाला ?

दासी---कां बरें ? तो त्यांच्या उशागतीं असतोच. साऱ्या रात्रभर बिछान्याजवळ दिवा जळत असला पाहिजे, असा त्यांनीं हुकूमच केला आहे.

वैद्य---पहा, ह्यांचे डोळे उघडे आहेत!

दासी---उघडे असले तरी त्यांना कांहीं दिसत नाहीं.

वैद्य---आतां ह्या हें पहा काय बरें करीत आहेत ? पहा, ह्या आपले हात कसे घाशीत आहेत.

दासी---त्या नेहमींच असें हात घासल्यासारखें करतात. घटका घटका एकसारखें हेंच करीत बसलेल्या त्यांना मीं कैक वेळां पाहिलें आहे.

दर्याबाई---अजून येथें डाग आहेच !

वैद्य---ऐक. ह्या बोलताहेत. ह्या काय बोलल्या ह्याचें पुढें मागें कदाचित् विस्मरण पडेल. म्हणून ह्यांच्या तोंडून जे कांहीं शब्द बाहेर पडतील ते मला टिपून ठेविले पाहिजेत.

दर्याबाई---जा ! जा ! अरे मेल्या डागा, जा आतां ! एक---दोन---हं ! झालीच वेळ हं ! आतां उरकलेंच पाहिजे !---नरकांतल्या यातना भयंकर म्हणे !---मानाजीराव, धिक्कार असो तुम्हांला ! शिपाई म्हणवतां आणि असे भितां ! कळलें म्हणून भिण्याचें काय कारण आहे ! आपल्याला विचारणारा कोण आहे !---तरी पण त्या थेरड्याच्या अंगांत इतकें रक्त असेल, असें मला तर वाटलें नव्हतें !

वैद्य---ऐकलेंस का तूं हें !

दर्याबाई---मुकुंदरावाला एक बायको होती!---पण ती आतां कोठें आहे ! ---ह्या माझ्या हातावरचे हे डाग कधींच जायचे नाहींत काय !---प्रिया, जाऊं द्या, त्याच्याबद्दल ज्यास्त विचार नको ! तुम्ही असे मध्येंच दचकतां, त्यामुळें सगळ्या कामाची घाण होते !

वैद्य---अरे रे ! ज्या गोष्टी तुला समजूं नयेत, त्या या गोष्टी तुझ्या कानावर येत आहेत.

दासी---जें त्यांनीं बोलूं नये, तें त्या बोलत आहेत. ह्यांना काय काय गोष्टी माहीत आहेत तें एक परमेश्वराला ठाऊक.



दर्याबाई:—अजून येथें डाग आहेच !

अंक ५, प्रवेश १ ( पृष्ठ ७२ ).

**दर्याबाई**—अजून माझ्या हाताला रक्ताची घाण येतेच आहे. मलयपर्वतावरील सगळ्या चंदनाचें गंध उगाळून ह्या हाताला फासलें, तरी सुद्धां ही घाण जायची नाहीं असें वाटतें! काय करावें! अरे रे रे रे!

**वैद्य**—हाय! हाय! केवढा हा दुःखाचा उसासा ह्यांना आला! ह्यांच्या मनांत फार जबर दुःखाचीं कारणें सांठलेलीं असलीं पाहिजेत.

**दासी**—मला तर बाई हें असलें राज्यवैभवही नको, आणि ह्या यातनाही पण नकोत.

**वैद्य**—अगदीं खरें.

**दासी**—देव करो आणि सगळें बरें होवो म्हणजे झालें!

**वैद्य**—हा रोग माझ्या हातून बरा होण्यासारखा नाहीं. झोंपेंतून उठून पुष्कळ लोक चालतांना मी पाहिलेले आहेत. पण ते पापी नव्हते.

**दर्याबाई**—तुम्ही आपले हात धुवून टाका! हा दिवसाचा पोषाख नको आतां!—आणि असे कावरे बावरे दिसूं नका!—मी तुम्हांला फिरून सांगतें, व्यंकोजीरावाचें प्रेत जमिनींत गाडून टाकिलें आहे. तेथून तो आतां खास बाहेर येणार नाहीं!

**वैद्य**—असें! असें काय!

**दर्याबाई**—चला, आतां चटकन् जाऊन निजूं या. दरवाजावर कोणी धक्के मारीत आहे! चला, चला, चला. तुमचा हात माझ्या हातांत द्या! जें झालें तें झालें! आतां मुकाट्यानें जाऊन निजूं या! (जाते).

**वैद्य**—आतां ह्या बिछान्यावर निजतील काय?

**दासी**—होय.

**वैद्य**—कांहीं अघोर कृत्य घडून आल्याबद्दल लोकांत बरीच गुणगुण सुरू आहे. अघोर कर्में करणारांना अघोर यातना सोसाव्या लागतात. आणि अघोर कर्में करणारे बिछान्यावर बसून बहिऱ्या उशीपुढेंहि आपलीं गुप्त कृत्यें ओकतात. बाईसाहेबांच्या ह्या रोगावर वैद्यशास्त्रांतील कोणताहि उपाय लागू पडणार नाहीं. त्यांच्या हातून कांहीं देवधर्माचेच उपाय करवून पहा. त्यानें कांहीं गुण आला तर येईल. देव त्यांना सुखी राखो. तूं त्यांना नीट जपत जा. त्यांना ज्यापासून त्रास होईल अशा वस्तू त्यांच्या नजरेआड

करून ठेव. आणि नेहमीं त्यांच्यावर तुझें लक्ष असू दे. बरें आहे, मी जातों आतां. हा सगळा चमत्कार पाहून माझें मन अगदीं घोटाळून गेलें आहे. मला वाटतें—पण नको.

दासी—बरें आहे. या तर. (जातात.)

---

## प्रवेश २ रा.

स्थळ–देवगडाजवळचें एक मैदान.

( महिपतराव, हंबीरराव, अंग्रे, लक्ष्मणसिंग, आणि इतर शिपाई हातांत निशाणें घेऊन नगारा वाजवीत प्रवेश करतात. )

**महिपतराव**—मगधदेशच्या राजाचें सैन्य अगदीं जवळ येऊन ठेपलें आहे. मल्हारराव, शिवदेवराव, आणि मुकुंदराव, हे त्या सैन्यांतील मुख्य आहेत. आपल्यावर सूड उगविण्याची इच्छा रात्रंदिवस त्यांच्या मनांत एकसारखी जळत आहे. त्यांच्या लोकप्रिय पक्षाचा कड घेऊन अगदीं विरक्त साधु देखील भयंकर रणगर्जना करून रक्तपात करण्याला प्रवृत्त होतील.

**अंग्रे**—त्या बीरवनच्या जंगलांत आपण त्यांना जाऊन मिळूं या. कारण, ते त्याच रस्त्यानें येत आहेत.

**हैवतराव**—बरें, धनाजी आपल्या भावाबरोबर आहे किंवा नाहीं, ह्याबद्दल कोणाला पक्की माहिती आहे काय ?

**लक्ष्मणसिंग**—तो मल्हाररावाबरोबर नाहीं, हें मी पक्कें सांगतों. त्यांच्या बरोबर कोण कोण सरदार आहेत, त्या सगळ्यांची नांवनिशी माझ्याजवळ आहे. एक शिवदेवरावांचा मुलगा आहे. आणि दुसरे अगदीं तरणे बांड —ज्यांच्या तोंडावर अजून मिशी देखील फुटली नाहीं—असे कांहीं लोक आहेत.

**महिपतराव**—आणि आपल्या राजेसाहेबांची कशी काय तयारी चालली आहे ?

**हैबतराव**—ह्या देवगडची त्यांनीं अगदीं कडेकोट तयारी चालविली आहे. कोणी म्हणतात कीं, त्याला वेड लागलें आहे; पण ज्यांच्या मनांत त्याच्याबद्दल फारसा तिटकारा नाहीं, असे कांहीं लोक म्हणतात कीं, तो फार खवळून गेला आहे. पण एकंदरींत एवढें खरें कीं, अलीकडे त्याची वर्तणूक इतकी चमत्कारिक झालेली आहे कीं, कशाला कांहीं धरबंद नाहीं.

**अंग्रे**—त्यानें गुप्तपणें केलेल्या खुनांचीं फळें आतां त्याला भोगावीं लागत आहेत. त्यानें आजपर्यंत लोकांना खोट्या खोट्या थापा मारून फसविलें. परंतु आतां लोकांत पुंडावे माजत चाललेले पाहून त्याची छाती धडधडत आहे. त्याच्या हाताखालचे चाकर लोक त्याची भाकरी खातात म्हणून कांहीं तरी चाकरी करीत आहेत. बाकी स्वामिभक्तीचा लेश देखील त्यांच्या मनांत नाहीं. आणि आपली सत्ता डळमळूं लागली, हें आतां त्याच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें आहे.

---

**महिपतराव**—त्याचें मन त्याला खात असल्यामुळें त्याच्या अंतःकरणांत जी चलबिचल झाली आहे, त्याबद्दल त्याला कोण दोष देईल ?

**हैबतराव**—बरें आहे. चला. आपण कूच करूं या, आणि आपले खरे खरे धनी जे मल्हारराव सरकार त्यांच्या पायाची कांहीं तरी चाकरी बजावण्याला तेथें जाऊं या. आपल्या सगळ्या देशाला गुलामगिरीचा हा एक रोगच जडला आहे म्हणायचा. पण त्याच्यावर हें रामबाण औषध सुदैवानें मिळत आहे. आपल्या देशाला संकटांतून सोडविण्याच्या कामीं आपल्या धनीसाहेबांबरोबर आपणही आपल्या शरीरांतील रक्ताचा प्रत्येक थेंब नाहींसा होईपर्यंत निकरानें लढूं या.

---

**लक्ष्मणसिंग**—अथवा ह्या जुलमी राज्याच्या ज्या रानवेली चोहोंकडे पसरल्या आहेत, त्या खणून काढून स्वराज्यरूपी सुंदर फुलझाडाला वाढीस लागण्याला जितकें लागेल तितकें रक्त आपण आपल्या शरीरांतून खर्च घालूं, असें कां म्हणाना ? चला आतां. त्या बीरबनच्या रानांत आपण निघून जाऊं या. ( सर्व जातात.

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ—देवगडच्या किल्ल्यांतील दिवाणखाना.

( मानाजीराव, वैद्य आणि चाकर प्रवेश करितात. )

**मानाजीराव**—बस्स झालें. आतां मला आणखी बातम्या मुळींच सांगूं नका. त्या सगळ्यांना येथून पळून जाऊन शत्रूच्या पक्षाला मिळूं द्या. वीरवनच्या रानांतील झाडें आपली जागा सोडून येथें जोंपर्यंत चालत आलीं नाहींत, तोंपर्यंत माझ्या मनाला भीति शिवणार नाहीं. तो कालचा पोरगा मल्हारराव, त्याची काय बिशाद! आणि शिवाय ह्या जगांत काय काय घडामोडी व्हायच्या हें ज्यांना माहीत असतें, अशा त्या चेटक्यांनीं मला सांगितलें आहे कीं, ' मानाजीराव, स्त्रीच्या उदरांतून जन्मास आलेल्या कोणत्याही मनुष्याचा जोर तुझ्यावर चालणार नाहीं आणि त्यापासून तुला भिण्याचें मुळींच कारण नाहीं.' हा मल्हारराव अशांतलाच नव्हे काय ? मग काय तर! चला जा येथून, लुच्चांनों, आणि तुम्हांला वाटत असेल तर तुम्हीही त्या लोकांना जाऊन मिळा. ह्या असल्या तुमच्या थापांनीं माझ्या मनांत यत्किंचित्‌ही शंका उत्पन्न होणार नाहीं, किंवा भीति वाटणार नाहीं.

( एक जासूद प्रवेश करितो. )

हा आला रडतोंड्या. गुलामाचें तोंड कसें खापरासारखें काळें ठिक्कर पडलें आहे. काय रे, काय झालें !

**जासूद**—धनीसाहेब, दहा हजार—

**मानाजीराव**—काय ! गुलामा, काय सांगतोस ! काय दहा हजार बायका आल्या आहेत !

**जासूद**—सरकार, दहा हजार शिपाई आले आहेत.

**मानाजीराव**—नीच. येथून आधीं काळें कर पाहूं. भीतीनें गुलामाच्या काळजाचें पाणी होऊन गेलें आहे, आणि येथें येऊन भलभलती बडबड करीत आहे. कसले शिपाई आले आहेत रे, गुलामा! इतका भित्रा झालास त्यापेक्षां तूं मेलास कां नाहीं ! गुलामाच्या तोंडावर दरदरून घाम

आला आहे. आणि भीतीमुळें बोबडी वळून गेली आहे. अरे गायवर्ण्या, कोठले शिपाई आले आहेत रे ?

**जासूद**—महाराज, मगधदेशांतले.

**मानाजीराव**—तूं माझ्यापुढें उभा राहूं नको. येथून चालता हो कसा. (जासूद जातो.) संताजी, अहो संताजी !—काय करावें ? हे सगळे विचार मनांत आले म्हणजे माझें डोकें भडकून जातें.—संताजी, काय हो मी हांका मारतों आहेंना तुम्हांला ?—आतांचा प्रसंग मोठा कठिण आहे. ह्यांतून निभावलों तर पुढें राज्य आणि धनदौलत. पण बहुतकरून ह्यांतच आमचा निकाल होणार ! बरें असो. आणखी तरी जगून काय करायचें आहे ! झालें ते पुष्कळ झालें. आतां काय आपले दहा गेले आणि पांच उरले. आतां काय व्हायचें असेल तें होऊं द्या. जन्मभर नीट वागलें म्हणजे म्हातारपणीं आपला लौकिक वाढतो, चार लोक आपल्याला बरें म्हणतात, कोणावर आपण शब्द टाकला तर तो सहसा खालीं पडत नाहीं, आणि सर्व लोकांशीं स्नेह जडतो. पण आमच्या कपाळीं हें कांहीं नाहीं. लोक मला उलट शिव्याशाप मात्र देत असतील. उघड उघड दिल्या नाहींत, तरी मनातून तरी खास देत असतीलच. माझ्या तोंडापुरता वरवर मला मान देतात, पण त्यांच्या अंतःकरणांत त्याचा लेश देखील नसतो. लोक भित्रे आहेत, त्यामुळें त्यांना आपला तिरस्कार स्पष्ट करून दाखवितां येत नाहीं इतकेंच काय तें. असो.—संताजी !

( **संताजी** प्रवेश करतो. )

**संताजी**—महाराजांचा काय हुकूम आहे ?

**मानाजीराव**—आणखी काय बातमी आहे ?

**संताजी**—सरकार, आपल्याला पूर्वी जी बातमी कळली ती अगदीं खरी आहे, असें पाठीमागून आलेले जासूद सांगतात.

**मानाजीराव**—माझ्या मांसाचे तुकडे तुटून तुटून हाडापासून अगदीं वेगळे होईपर्यंत मी लढल्यावांचून कधींही राहणार नाहीं. माझें चिलखत मला आणून द्या.

**संताजी**—एव्हांशीं चिलखत घालण्याचें कांहीं काम नाहीं.

**मानाजीराव**—तरी पण मी घालणारच !—आणखी कांहीं स्वार

पाठवा. आणि त्यांच्याकडून चोहोंकडची बातमी आणवा. आणि आपल्यापैकीं जे कोणी भीत असतील, त्यांना आधीं फाशीं द्या.——माझें चिलखत मला आणून देतांना ?——काय, वैद्यबुवा, कशी काय तिकडची प्रकृति आहे ?

**वैद्य**——महाराज, बाईसाहेब इतक्या म्हणण्यासारख्या आजारी नाहींत, पण त्यांच्या मनांत एका पाठीमागून एक असे नाना प्रकारचे तरंग उठत असतात. त्यामुळें त्यांना झोंप लागत नाहीं.

**मानाजीराव**——होय, ह्याच्यावरच तिला कांहीं तरी औषध द्या. मनाला कांहीं विकार झाला असला, तर त्याच्यावर देखील तुमच्यापाशीं औषध असेलच कीं नाहीं ? तिला ज्यापासून दुःख होत आहे, त्याची विस्मृति पडली पाहिजे. तिच्या मेंदूंत जो घोटाळा झाला आहे, तो निवाला पाहिजे. तिचें अंतःकरण ज्या भयंकर दुःखांनीं दडपून गेलें आहे, त्यांचा विसर पडण्याला कांहीं तरी एखादें गोडसें रामबाण औषध शोधून काढा.

**वैद्य**——असल्या रोगावर ज्याचें त्यानेंच औषध शोधून काढलें पाहिजे. तें वैद्याला सांपडण्यासारखें नसतें.

**मानाजीराव**——असें आहे काय ? तर मग आग लावा तुमच्या त्या वैद्यशास्त्राला ! चला, जा येथून ! मला त्या औषधांची मुळींच गरज नाहीं ! ——हं ! चिलखत आणा इकडे ! संताजी, आपले घोडेस्वार बाहेर जाऊं द्या ! वैद्यबुवा, माझे सगळे सरदार पळून गेले काय !——हं जलदी करा !—— वैद्यबुवा, जर तिच्या या रोगाची नीट चिकित्सा करून तिची प्रकृति तुम्ही पूर्ववत् ताळ्यावर आणून दिली, तर तुमची मोठी वाहवा होईल, आणि चोहोंकडे तुमची कीर्ति पसरेल.——तो बंद सुटत नसला तर तोडून टाका !—— काय हो वैद्यबुवा, हें मगधदेशांतलें सैन्य येथें आलें आहे, तें घालवून लावण्याला तुमच्यापाशीं कांहीं मात्रा, किंवा चूर्ण, किंवा गोळ्या कांहीं आहेत काय ? हें सैन्य आलें आहे, ही बातमी तुमच्या कानावर आली आहे कीं नाहीं ?

**वैद्य**——होय सरकार. आपली ही लढाईची तयारी चालली आहे, ह्यामुळें आमच्या कानावर ह्या बातम्या आल्या आहेत.

**मानाजीराव**——मी पुढें जातों. तुम्ही तें मागून घेऊन या ! जोंपर्यंत बीरबनच्या रानांतील झाडें येथें चालून आलीं नाहींत, तोंपर्यंत मला मरणाची मुळींच भीति नाहीं. ( जातो. )

**वैद्य**—मला आतां येथून पळ काढूं द्या. आपल्याला कोणी लाख रुपये दिले, तरी सुद्धां मी येथें फिरून पाऊल टाकणार नाहीं.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—देवगडच्या किल्याच्या आसपासचा प्रदेश.

( **मल्हारराव, शिवदेवराव**, त्यांचा मुलगा, **मुकुंदराव, माहिपतराव, हैबतराव, अंग्रे, लक्ष्मणसिंग, राणोजी**, आणि शिपाई हातांत निशाणें घेऊन रणवाद्यें वाजवीत प्रवेश करितात. )

**मल्हारराव**—मित्रहो, थोड्याच दिवसांनीं हा जुलूम नाहींसा होऊन चोहोंकडे स्वस्थता होईल.

**महिपतराव**—ह्यांत कांहीं संशय नाहीं.

**शिवदेवराव**—आपल्या समोर हें कसलें अरण्य दिसतें आहे ?

**माहिपतराव**—ह्याला बीरवन असें म्हणतात.

**मल्हारराव**—प्रत्येक शिपायानें येथल्या झाडाची एक एक खांदी तोडून आपल्या समोर धरावी. कारण, असें केलें म्हणजे आपल्या सैन्यांतील लोक झाडाच्या खांद्यांनीं झाकून गेल्यामुळें आपले किती शिपाई आहेत हें शत्रूला मुळींच कळणार नाहीं.

**शिपाई**—ठीक आहे. आपल्या हुकुमाप्रमाणें आम्ही करतों.

**शिवदेवराव**—आपल्याला आतांपर्यंत एवढीच काय ती बातमी लागली आहे कीं, तो जुलमी मानाजीराव आपल्याच ऐटींत देवगड मुक्कामीं तळ देऊन बसला आहे. आणि आपण त्या देवगडाला वेढा दिला, तरीही तेथेंच राहून तो किल्ला लढवायचा त्याचा विचार आहे.

**मल्हारराव**—ह्याच्याशिवाय त्याला दुसरें कांहीं करतांच येत नाहीं. तेवढीच काय ती त्याला आशा बाळगण्याला जागा आहे. कारण, संधि मिळाली कीं लहान थोर त्याला सोडून येत आहेत. ज्यांना कांहीं गत्यंतरच नाहीं, असे लोक मात्र आतां त्याच्या चाकरीला उरले आहेत. आणि त्यांच्या सुद्धां मनांतून आपल्याच पक्षाला जय मिळावा असें आहे.

**मुकुंदराव**—आधीं आपल्या हातून शौर्याचीं कामें होऊं द्या, आणि मग आपण शत्रूच्या कृत्यांची चर्चा करीत बसूं.

**शिवदेवराव**—आपल्या हातून काय काय कामें पार पडतात आणि काय काय पडत नाहींत, हें थोडक्याच वेळांत आपल्याला कळून येणार आहे. आपण असें मनोराज्य करीत बसलों, तर वाटतील त्या कल्पना करतां येतील. पण खरा परिणाम काय होतो, ह्याचा निकाल आपल्या तरवारींचे प्रहारच करतील. तर चला आतां त्याच कामाला निघूं.

( सर्व कूच करून निघून जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—देवगडचा किल्ला.

( **मानाजीराव**, **संताजी**, आणि शिपाई निशाणें घेऊन नगारा वाजवीत येतात. )

**मानाजीराव**—ह्या किल्ल्याच्या अगदीं बाहेरच्या बुरुजावर हें आपलें निशाण नेऊन रोवा. 'शत्रु आले रे आले !' अशी ओरड अजून ऐकूं येत आहे. पण आपला हा किल्ला इतका कांहीं मजबूत आहे कीं, त्यांनीं कितीही दिवस वेढा घातला, तरी हा त्यांच्या हातीं लागायचा नाहीं. अन्नपाण्याची टंचाई आणि तापाची सांथ ह्यांच्या योगानें त्यांच्यांतील सगळे मरून जाई-पर्यंत त्यांना आतां खुशाल किल्ल्याला वेढा देऊन बसूं द्या ! आपल्या बाजूचे लोक त्यांना जाऊन मिळाले नसते, तर आपण त्यांच्या तोंडास तोंड देऊन लढलों असतों. आणि त्यांना येथून पिटाळून लावलें असतें. ही ओरड कसली ऐकूं आली ?

( पडद्यांत बायकांच्या रडण्याचा ध्वनि ऐकूं येतो. )

**संताजी**—धनीसाहेब, हा बायकांच्या रडण्याचा शब्द असावा असें वाटतें. ( जातो. )

**मानाजीराव**—भीति म्हणजे काय असते, ह्याचा सुद्धां आतां मला बहुतेक विसर पडला आहे. पूर्वीं रात्रींची एखादी किंकाळी ऐकिली, तरी देखील माझ्या

सर्वांगाचा थरकांप होत असे. आणि पोथीपुराणांतली एखादी भयंकर गोष्ट वाचली, तरी देखील माझ्या अंगावर शहारे उठत असत. पण ते दिवस गेले. आतां अघोर कर्मांची पुष्कळच संवय झाली आहे. लोकांचे गळे कापण्याचे विचार माझ्या मनांत नेहमीं घोळत असल्यामुळें भयंकर प्रसंगांचें माझ्या मनाला आतां कांहींसुद्धां वाटेनासें झालें आहे. ( **संताजी येतो.**) कशाची ती ओरड होती ?

**संताजी**—महाराज, राणीसाहेब मरण पावल्या !

**मानाजीराव**—ती आणखी कांहीं दिवसांनीं मेली असती, तर बरें झालें असतें ! ही बातमी पुढें केव्हां तरी माझ्या कानावर आली असती, तरी हरकत नव्हती !—पुढें केव्हां तरी !—पुढें—पुढें—पुढें !—मनुष्य मरेपर्यंत दररोज पुढें—पुढें असें म्हणत असतो. पण असें म्हणतां म्हणतां काळ त्याला ओढून नेतो. जाऊं द्या ! आणि ही माझी आतां थोडाच वेळ टिकणारी प्राणज्योतीही जाऊं द्या ! आयुष्य म्हणजे निव्वळ चालती सावली आहे ! रंगभूमीवर येऊन ज्याप्रमाणें एखादा क्षुल्लक नट मोठ्या ऐटीनें छाती काढून चालतो आणि मोठ्या डौलानें थोडा वेळ कांहीं तरी बडबड करून निघून जातो, आणि मग पुढें त्याचा आपल्याला मागमूस देखील लागत नाहीं, त्याप्रमाणें ह्या जगांत मनुष्याची अवस्था आहे.

( एक जासूद प्रवेश करतो. )

तूं कांहीं तरी बातमी सांगण्यासाठीं आला आहेस, असें दिसतें. काय असेल तें सांग पाहूं चटकन्.

**जासूद**—धनीसाहेब, मी जें ह्या डोळ्यांनीं पाहिलें, तें आपल्याला कळविण्याला आलों आहे. पण तें कसें सांगावें हें मला समजत नाहीं.

**मानाजीराव**—चल आटप सांग काय तें !

**जासूद**—मी त्या टेंकडीवर पहारा करीत उभा राहिलों असतां माझी दृष्टि सहज त्या बीरवनच्या रानाकडे गेली. तेव्हां तें सगळें रानच्या रान चालूं लागलेलें माझ्या दृष्टीस पडलें !

**मानाजीराव**—अरे लुच्च्या गुलामा, कांहीं तरी खोटें सांगतोस.

**जासूद**—मी खोटें सांगत असलों, तर तुम्ही खुशाल रागें भरा. पण

मी खरोखर सांगतों कीं, तें रान चालत चालत सुमारें एका कोसावर येऊन ठेपलें आहे.

**मानाजीराव**—जर तूं खोटें सांगत असलास, तर ह्या पलीकडच्या झाडावर भुकेनें तूं मरेपर्यंत तुला टांगून ठेवीन. आणि तूं म्हणतोस तें खरें असेल, तर मग माझे पापाचे घडे भरलेच म्हणायचे ! माझा आतां धीर सुटत चालला. त्या चेटक्यांचें भाकित द्व्यर्थी असलें पाहिजे, असें मला आता वाटूं लागलें आहे. 'बीरबनचें रान देवगडच्या किल्ल्याजवळ चालून येईपर्यंत तुला भीति नाहीं,' असें त्यांनीं मला सांगितलें होतें; आणि आतां हें बीरबनचें रान तर देवगडच्या किल्ल्याजवळ चालून येत आहे.—चला,उठा रे उठा ! किल्ल्यांतून बाहेर पडा ! हा सांगतो आहे हें जर खरें असेल, तर आतां येथून पळूनही जातां येत नाहीं, किंवा किल्ल्याच्या आंत दडून बसूनही भागणार नाहीं ! मला ह्या जगाचा कंटाळा आला आहे. आणि असें वाटतें कीं, ह्याचा ह्या वेळीं प्रळय होऊन जाईल तर फार बरें !—सगळ्यांना इषारा मिळण्याकरतां शिंग फुंका !— वहा ! वाऱ्यांनों, मोठ्या सोसाट्यानें वहा ! आणि एकदां हें सगळें जग उद्ध्वस्त करून टाका !—आपण तर लढाई करीत करीत देह ठेवणार.( सर्व जातात.)

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**—किल्ल्यासमोरील मैदान.

( **मल्हारराव, शिवदेवराव, मुकुंदराव** आणि त्यांचें सैन्य हातांत झाडांच्या खांद्या घेऊन प्रवेश करतात. )

**मल्हारराव**—आतां आपण किल्ल्याच्या बरेच जवळ आलों. आतां, हे शूर शिपायांनों, तुम्ही आपल्या आड धरलेल्या झाडांच्या खांद्या फेंकून द्या. आणि तुम्ही आपलें खरें स्वरूप प्रकट करा.—काकासाहेब, तुम्ही आणि तुमचा मुलगा ह्या उभयतांनीं मिळून आज शत्रूला पाहिला सामना द्यावा. बाकी राहिलेली कामगिरी मुकुंदराव आणि मी असे दोघे मिळून करतों.

**शिवदेवराव**—ठीक आहे. आज शत्रु आमच्या आटोक्यांत तर येऊं द्या, म्हणजे मग त्यांना दाखवितों कसा काय पराक्रम आहे तो.

**मुकुंदराव**—तुम्ही आपलीं सर्व रणवाद्यें वाजवायला हुकूम द्या. रणदुंदुभि म्हणजे रक्तस्राव आणि मृत्यु ह्यांची विनीच आहे.

( रणवाद्यें वाजतात व सर्व जातात. )

## प्रवेश ७ वा.

स्थळ—त्याच मैदानांतील दुसरें एक ठिकाण.

( मानाजीराव प्रवेश करतो. )

**मानाजीराव**—ह्यांनीं मला मोठ्या पेचांत अडकवून धरिलें आहे. आतां मला पळून जातां येत नाहीं. एखाद्या अस्वलाप्रमाणें अखेरपर्यंत आतां मला लढलेंच पाहिजे.—पण मी एवढा भितों कशाला ? ह्यांच्यापैकीं स्त्रीच्या उदरांतून जन्माला आला नाहीं असा कोण असणार ? असा जो कोणी असेल तेवढ्याचीच मात्र मला भीति ! दुसऱ्या कोणाची नाहीं !

( शिवदेवरावाचा मुलगा प्रवेश करतो. )

**मुलगा**—तुझें नांव काय ?

**मानाजीराव**—तूं ऐकलेंस, तर तुला त्या नांवाचें भय वाटेल.

**मुलगा**—छे, छे, तूं मोठा राक्षस असलास, तरीही मी तुला भिणार नाहीं.

**मानाजीराव**—तर मग ऐक. माझें नांव मानाजीराव.

**मुलगा**—दुसरें कोणतेंही नांव ऐकून माझ्या अंगाचा इतका संताप झाला नसता.

**मानाजीराव**—आणि इतकी भीति पण वाटली नसती.

**मुलगा**—अरे जुलमी चांडाळा, मला भीति वाटण्याची गोष्ट तूं सोडूनच दे. आणि तुझी अशानें खात्री होत नसेल, तर ह्या माझ्या तरवारीनें तुझी खात्री करून देतों.

( ते एकमेकांशीं लढतात आणि शिवदेवरावाचा मुलगा मरून पडतो. )

**मानाजीराव**—तूं स्त्रीच्याच उदरांतून जन्माला आला असला पाहिजेस ! स्त्रीच्या उदरांतून जन्मलेल्या माणसानें कितीही गुरकावण्या दाखविल्या, तरी मी त्याला जुमानीत नाहीं. त्याच्या तरवारीची मला मुळींच भीति नाहीं. ( जातो. )

( रणवाद्यें वाजतात आणि **मुकुंदराव** प्रवेश करतो. )

**मुकुंदराव**—ह्या बाजूनें गलबला ऐकूं येत आहे.—त्या जुलमी चांडाळाला हुडकून काढलेंच पाहिजे. कारण, माझ्या शस्त्राचे घाव लागल्यावांचून जर तो मेला, तर मी आपल्या बायकोचा आणि मुलांचा सूड उगविला नाहीं म्हणून तीं भुतें होऊन नेहमीं माझ्या मानेस बसतील. पगार देऊन लढाई करण्याकरितां धरून आणलेल्या गरीबगुरीब शिपुर्ड्यांना—त्या बाजारबुणग्यांना—मारण्यांत काय पुरुषार्थ आहे ! मानाजीराव, ह्या तरवारीला एक तुझा तरी बळी देईन, नाहीं तर ती दुसऱ्या कोणावर न चालवितां म्यानबंद करीन. इकडेच तूं असला पाहिजेस. हा मोठा गलबला कोणा तरी मोठ्याच मनुष्याबद्दल असला पाहिजे. देवा, मानाजीराव माझ्या हातीं लागूं दे आणि मग मला तुझ्यापाशीं दुसरें कांहीं मागावयाचें नाहीं. (जातो.)

( भयसूचक रणवाद्यें वाजतात. )

( **मल्हारराव** आणि **शिवदेवराव** प्रवेश करतात. )

**शिवदेवराव**—धनीसाहेब, इकडून या असे. किल्ला हळुहळु आपल्या हातीं येत चालला आहे. मानाजीरावाचे लोक दोन्ही बाजूंनीं लढत आहेत. आपल्या सरदारांनीं आज खुप निकरानें लढाई चालविली आहे. आणि आतां जय बहुतेक आपल्याच बाजूला मिळाल्यासारखा आहे.

**मल्हारराव**—शत्रु आपल्यावर मारा करीत आहेत खरा; पण तो अगदीं चुकतो आहे.

**शिवदेवराव**—चला आपण किल्ल्यांत शिरूं या. ( जातात. )

( **मानाजीराव** फिरून प्रवेश करतो. )

**मानाजीराव**—एखाद्या वेड्याप्रमाणें मी आपल्याच तरवारीनें आपला गळा कापून घेतला, तर त्यांत काय शहाणपणा ? माझ्या समोर शत्रु लढत असतांना त्याच्यावर वार करायचे टाकून मी आपल्यावरच काय म्हणून करावे ?

( मुकुंदराव फिरून प्रवेश करतो. )

**मुकुंदराव**—फिर, अरे हरामखोरा, मागें फिर! अरे लांडग्या, चाललास कोठें ?

**मानाजीराव**—तुझी आणि माझी गांठ पडूं नये म्हणून मी फार प्रयत्न करित होतों. पण अजून तूं परत जा.— मुकुंदराव, तुझ्या कुळांतील रक्ताची मला अगदीं ओकारी आली आहे.—जा, येथें एक अक्षरसुद्धां बोलायला उभा राहूं नको.

**मुकुंदराव**—मला कांहीं बोलायचें नाहीं. जें बोलायचें तें ही तरवार बोलेल. तुझ्या अघोर कर्माचें वर्णन करण्याला शब्द किती पुरणार आहेत ?

( दोघे लढतात. )

**मानाजीराव**—तुझे हे श्रम व्यर्थ आहेत. तूं आपली तरवार ह्या हवेवर मारलीस, तर तिच्या अंगांतून जितकें रक्त निघेल, तितकेंच माझ्या अंगांतून निघेल, हें तूं पक्कें समज. ज्या शरीराला जखम लागेल, त्याच्यावर तूं आपल्या तरवारीचे पाहिजे तितके घाव खुशाल मार. माझ्यावर तुझें शस्त्र चालणार नाहीं. स्त्रीच्या उदरांतून जन्मलेल्या कोणत्याही मनुष्याच्या हातून मला मरण येणार नाहीं, असा मला वर मिळालेला आहे.

**मुकुंदराव**—तुझा वर बीर आतां एकीकडे ठेव. ज्या कुणी चेटक्यांनीं तुला हा वर दिला, त्यांनींच तुला सांगायला पाहिजे होतें कीं, हा मुकुंदराव आपल्या आईच्या पोटांतून जन्मास आला नाहीं, तर आईचें पोट फाडून तो बाहेर काढलेला आहे.

**मानाजीराव**—हे शब्द ज्या जिभेनें उच्चारले, ती जळून खाक कां झाली नाहीं ! कारण, ह्या शब्दांनीं माझ्या हृदयांतील धीर अगदीं नाहींसा करून टाकिला. आणि ह्या चेटक्या—ज्या द्व्यर्थी भाषणें बोलून मनुष्याला खड्यांत घालतात, ज्या कानाला गोडगोड लागणाऱ्या थापा मारतात आणि परिणामाची वेळ आली म्हणजे निराशा करतात,—त्या ह्या चेटक्यांच्या बोलण्यावर कोणीही भल्या माणसानें इतःपर भरंवसा ठेवूं नये.—मुकुंदराव, मी तुझ्यापाशीं लढणार नाहीं.

**मुकुंदराव**—तर मग, अरे भित्र्या, मला शरण ये; म्हणजे तुझे प्राण वांचतील. आणि मग ज्याप्रमाणें वाघ किंवा सिंह ह्यांना सांपळ्यांत कोंडून लोकांना दाखविण्याकरितां ठेवतात, त्याप्रमाणें तुला ठेवून देऊं आणि 'जुलमी राजा' अशीं अक्षरें त्या सांपळ्यावर लिहून ठेवूं.

**मानाजीराव**—मी कधींही तुला शरण येणार नाहीं. तो कालचा पोर मल्हारराव त्याच्या पायापुढें हें डोकें मी जमीनीला कधीं लावणार नाहीं. जरी बीरबनचें रान देवगडच्या किल्ल्याजवळ चालून आलें आणि स्त्रीच्या उदरांतून जन्मलेला तूं जरी माझ्या समोर सामना देण्याला उभा आहेस, तरीही मी एकदा शेवटचे हातपाय हलवल्यावांचून राहणार नाहीं. ही मी आपल्या-पुढें आपली ढाल धरतों; आणि, मुकुंदराव, तूं आतां माझ्यावर प्रहार कर! पण हें लक्षांत ठेव कीं, 'पुरे, बस पुरे!' असें जो कोणी म्हणेल, तो नरकांत गेल्यावांचून रहाणार नाहीं. (दोघेही लढत लढत निघून जातात.)

(रणवाद्यें वाजतात आणि **मल्हारराव, शिवदेवराव, राणोजी** व दुसरे सरदार आणि शिपाई निशाण घेऊन प्रवेश करितात.)

**मल्हारराव**—जे आपले स्नेही येथें दृष्टीस पडत नाहींत, ते लढाईतून वांचून सुरक्षितपणें परत येऊन आपल्याला भेटोत म्हणजे झालें.

**शिवदेवराव**—एवढ्या लढाईंत कांहीं तरी मरणारच. पण आपले बहुतेक लोक येथें दिसत आहेत. त्या मानानें पाहिलें तर इतके थोडे लोक मरून एवढी मोठी लढाई आपण जिंकली हें फार चांगलें झालें.

**मल्हारराव**—मुकुंदराव कोठें दिसत नाहींत, आणि तुमचा मुलगा—

**राणोजी**—तुमचा मुलगा आपल्या शिपाईगिरीचें सार्थक करून गेला! तुमचा बच्चा नुकतांच जवान होत चालला होता आणि ह्या लढाईंत न डगमगतां खऱ्या जवानमर्दाप्रमाणें त्यानें आपली तरवार गाजवून अखेरीस प्राण सोडला.

**शिवदेवराव**—तर मग तो मेलाच काय!

**राणोजी**—होय. आणि त्याचें प्रेत रणांगणांतून उचलून आम्ही आणिलें आहे. आपल्या मुलाचे एक एक गुण आठवून जर तुम्ही बसलां, तर तुमचा शोक कधींच संपणार नाहीं. कारण त्याचे गुण खरो-अनंत होते.



मानाजीराव:—मी एकदां शेवटचे हात पाय हलवल्यावांचून रहाणार ना

**शिवदेवराव**—बरें, पण त्याला ज्या जखमा लागल्या आहेत, त्या त्याच्या पाठीवर नाहींत ना ?

**राणोजीराव**—छे, छे, पाठीवर एकही नाहीं.

**शिवदेवराव**—मग खुशाल मरूं द्या त्याला. वर गेल्यावर माझा मुलगा देवाला देखील आवडता होईल. आणि तो तेथें देखील देवाच्या शिपाई-गिरीचें काम बजावील. अशा रीतीनें मृत्यु येत असेल तर माझा एक मुलगाचसा काय, पण माझ्या अंगावर जितके केस आहेत तितके मुलगे मला असते, तरी त्या सर्वांनाही मी मृत्यूच्या तोंडीं देण्याला तयार झालों असतों. असो. अशा रीतीनें त्याचा अंत झाला !

**मल्हारराव**—त्याची योग्यता फार मोठी होती. आणि त्या मानानें त्याचें नांव मागें राहण्याची योग्य तजवीज मला केली पाहिजे.

**शिवदेवराव**—कसली फार मोठी त्याची योग्यता आली आहे ! त्यानें आपली तरवार गाजविली, असें चार लोक म्हणत आहेत, हें पुष्कळ झालें. आतां स्वर्गलोकांत त्याला सुख मिळो म्हणजे झालें !—ही पहा केवढी आनंदाची गोष्ट झाली ती !

( **माना**जीरावाचें शिर घेऊन **मुकुंदराव** प्रवेश करतो. )

**मुकुंदराव**—महाराजांचा जयजयकार असो. कारण, आतां तुह्मी खरो-खरच महाराज झालां. हें पहा, त्या चांडाळाचें शिर आपल्यापुढें आणलें आहे. आतां आपण स्वतंत्र झालों. आपल्या राज्यांतील हीं सर्व ठळक ठळक रत्नें आपल्या भोंवतालीं उभीं आहेत. आणि मीं जेव्हां आपल्याला महाराज म्हणून आपला जयजयकार केला, तेव्हां त्यांनींही तो आपल्या मनांत केलाच असेल. परंतु माझी इच्छा आहे कीं, त्या सर्वांनीं मोठ्यानें माझ्याबरोबर आपला जयजयकार करावा. महाराजांचा जयजयकार असो !

**सर्व**—महाराजांचा जयजयकार असो ! ( वाद्यें वाजतात.)

**मल्हारराव**—मित्रहो, तुम्ही जी माझ्याबद्दल तसदी घेतली आहे, त्याबद्दल मी लवकरच तुमचा उतराई होईन. माझे सरदार आणि भाऊ-बंदहो, आपल्या देशांतील जे अतिशय मोठे मानमरातब आहेत, ते सर्व मी तुम्हांला आज देतों. तसेंच जुलूम करण्यासाठीं कोठें कधीं संधि सांपडेल

म्हणून डोळ्यांत तेल घालून बसलेल्या ह्या चांडाळाच्या कचाटींतून सुटून जे आपले इष्टमित्र परदेशीं जाऊन राहिले आहेत, त्यांना आपापल्या घरोघर येऊन रहाण्याकरितां बोलाविलें पाहिजे. ही राणी दर्याबाई—मला वाटतें, हिनें आपल्याच हातानें आपल्या जिवाचा अंत करून घेतला असावा !—ही अवदसा आणि हा गुलाम खाटिक, ह्या दोघांचे साथीदार कोण कोण आहेत ते शोधून काढून त्यांना शिक्षा दिल्या पाहिजेत. पण ह्या आणि दुसऱ्याही कित्येक अवश्य गोष्टी परमेश्वरच्या कृपेनें थोडक्याच वेळांत योग्य स्थळीं आणि योग्य वेळीं आपण करूं. मी तुमच्यापैकीं प्रत्येकाचा फार फार आभारी आहें. आणि उदईक राज्याभिषेकाचा समारंभ साजरा करण्याकरितां आपण सर्वांनीं यावें, अशी मी आपल्याला विनंति करतों.

( वाद्यें वाजतात आणि सर्व जातात. )

**पांचवा अंक समाप्त.**

---

